७० वर्ष

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

गुरुवार, दि. २६ फेब्रुवारी २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०६३ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## वेतन वाढीचा थकीत हप्ता त्यांच्या बँक खात्यात जमा

मुंबई (दै. संध्या) : राज्याच्या कानाकोपऱ्यात धावणाऱ्या ‘लालपरी’ला आपल्या घामाने आणि कष्टाने जिवंत ठेवणाऱ्या सुमारे ८६ हजार एसटी कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर अखेर समाधानाची झळाळी उमटली आहे. एसटी कर्मचाऱ्यांचा वेतन वाढीचा थकीत हप्ता त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आला आहे. एसटी महामंडळाकडे निधीअभावी थकीत वेतन देणे कठीण झाले असताना शासनाने तातडीने १०० कोटी रुपयांची तरतूद केली. परिणामी, फेब्रुवारी महिन्याच्या थकीत वेतनवाढीचा हप्ता कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा झाला. हा केवळ आर्थिक दिलासा नसून, तो शासनाच्या संवेदनशीलतेचा आणि बांधिलकीचा प्रत्यय आहे. असे प्रतिपादन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे. यापूर्वी ऑक्टोबर २०२५ मध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व तत्कालीन उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांच्या सहमतीने कामगार संघटनांच्या बैठकीत दरमहा सुमारे ६५ कोटी रुपयांचे अनुदान देण्याचे घोषित केले होते.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

## राज्यात ‘रोहयो’ मजुरांची संख्या घटली

मुंबई (दै. संध्या) : राज्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे (रोहयो) वाटोळे झाले आहे. थकीत निधीमुळे महाराष्ट्रातील ३ लाख १२ हजार कामे बंद पडली असून मजुरांच्या हाताला काम उरलेले नाही,असा आरोप काँग्रेस विधिमंडळ नेते पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात केला. गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यांसह संपूर्ण राज्यात मजुरांची संख्या घटली आहे. नागपूर विभागात ९९२ कोटी रुपयांचा निधी थकीत आहे. केंद्र सरकार राज्याला पैसे देत नाही आणि राज्य सरकार स्वतःच्या तिजोरीतून पैसे खर्च करण्यास तयार नाही. यामुळे ग्रामीण भागातील गरीब आणि शेतकरी कुटुंबे अडचणीत आली आहे, अस वडेट्टीवार म्हणाले. या मजुरांनी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी आंदोलन केले म्हणून २० वर्षांपासून काम करणाऱ्या रोजगार सेवकांना कामावरून काढून टाकले जात आहे. एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात १९ लोकांना केवळ आंदोलनात सहभागी झाले म्हणून कामावरून कमी करण्यात आले, हा अन्यायकारक निर्णय आहे. ग्रामसभेने निवडून दिलेल्या रोजगार सेवकांना शासन कोणत्या अधिकारात कामावरून काढत आहे? असा प्रश्न वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

## ७ जागांसाठी आठवलेंची जागा निश्चित

मुंबई (दै. संध्या) : महाराष्ट्रातील राज्यसभेच्या सात जागांसाठी 16 मार्च रोजी मतदान होणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी अवघे सहा दिवस उरले असल्याने राजकीय हालचालींना वेग आला आहे. भाजपच्या कोट्यातील चार जागांसाठी नावे ठरवण्याच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी रात्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक झाली. या बैठकीला रविंद्र चव्हाण यांच्यासह सुमारे 12 प्रमुख नेते उपस्थित होते. राज्यातील संख्याबळ आणि सहयोगी पक्षांचा विचार करून संभाव्य उमेदवारांवर सविस्तर चर्चा झाल्याची माहिती समोर येत आहे. गेल्या काही दिवसांपासून भाजपकडून रामदास आठवले आणि विनोद तावडे यांना राज्यसभेत पाठवले जाईल, अशी जोरदार चर्चा होती. तसेच विजया रहाटकर यांचे नावही जवळपास निश्चित मानले जात होते.

# ३६ हजार कोटींच्या ठेवी मोडणार

मुंबई (दै. संध्या)



मुंबई : मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प आज सादर होत आहे. या बजेटमधील सर्वात मोठी घडामोड समोर आली आहे. मुंबई महापालिकेत सत्तापालट झाल्यानंतर आता महापालिका प्रशासनाने मोठा निर्णय घेतला आहे. मुंबई महापालिका ठेवी मोडण्याच्या तयारीत आहे. मुंबई महापालिकेच्या एकूण ठेवी 81 हजार 449 कोटी 32 लाख रुपये शिल्लक आहेत. त्यापैकी 44 हजार 826 कोटी 23 लाख रुपये बांधील दैतवापोटी राखीव असल्यामुळे पालिकेला तोडता येणार नाहीत. मात्र उर्वरित 36 हजार 623 कोटी 09 लाख रुपये पालिका वेगवेगळ्या प्रकल्पासाठी वापरणार असल्याचं अर्थसंकल्पात स्पष्ट झालं आहे. त्यामुळे आतापर्यंत ठाकरेंच्या शिवसेनेची सत्ता असलेल्या मुंबई महापालिकेतील ठेवी आता सत्ताबदलानंतर मोडल्या जातील असा प्रचार ठाकरे सेनेकडून केला होता. तसंच चित्र आता पाहायला मिळत आहे. मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प 80952.56 कोटी इतका असणार आहे. 2025-26 च्या तुलनेत यंदा 8.77% नं वाढ यंदाच्या अर्थसंकल्पात केलेली आहे. 2025-26 चा अर्थसंकल्प 74427.41 इतका अंदाजे अर्थसंकल्प होता. मागच्या वर्षीपेक्षा यंदा 6,525 कोटी रुपयांची वाढ करण्यात आली आहे. मधल्या काळात महापालिका निवडणुका झाल्या नसल्यानं 4 वर्षांनंतर नव्या सत्ताधाऱ्यांचा हा पहिलाच अर्थसंकल्प आहे. दरम्यान, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 2026-27 या आर्थिक वर्षासाठी अंदाजपत्र सादर करण्यात आलं. आयुक्त भूषण गगराणी यांनी स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांच्याकडे अर्थसंकल्प सादर केला. यावेळी ठाकरेंच्या ठेवी महायुती मोडणार असल्याचं अर्थसंकल्पातून स्पष्ट करण्यात आलं आहे. एकूण 81 हजार 449 कोटी 32 लाख रुपयांच्या ठेवी शिल्लक आहेत. त्यापैकी 36 हजार 623 कोटी 09 लाख रुपये पालिका वेगवेगळ्या प्रकल्पासाठी वापरणार असल्याचं अर्थसंकल्पात स्पष्ट करण्यात आलं आहे. मुंबई महापालिका ठेवी मोडण्याच्या तयारीत असून एकूण ठेवी 81 हजार 449 कोटी 32 लाख रुपये शिल्लक आहेत. त्यापैकी 44 हजार 826 कोटी 23 लाख रुपये बांधील दैतवापोटी राखीव असल्यामुळे पालिकेला तोडता येणार नाहीत. मात्र, उर्वरित 36 हजार 623 कोटी 09 लाख रुपये पालिका वेगवेगळ्या प्रकल्पासाठी वापरणार असल्याचं अर्थसंकल्पात स्पष्ट करण्यात आलं आहे. मुंबईत जवळपास एकूण 101 पुलाची कामे हाती घेण्यात आली आहेत. यापैकी 24 कामं पूर्ण झाली असून मार्च 2026 पर्यत 23 कामे पूर्ण होणार आहेत. 2026-27 मध्ये 31 कामे पूर्ण करण्यात येतील. 2028-29 मध्ये 23 पुलांची कामे मुंबई महानगर पालिका पूर्ण करणार आहे.

### ऑक्टोबरपासून करमणूक कर लागू

महाराष्ट्र शासनाकडून करमणूक शुल्कातून दिलेली सूट 30 सप्टेंबरपर्यंतच लागू असणार आहे. त्यानंतर आता महापालिका करमणूक कर वसूल करणार आहे. महाराष्ट्र शासनाकडे याकरता महापालिकेनं शासनाकडे प्रस्ताव पाठवलाय.

### मुंबईतील फेरीवाल्यांकडे QR कोड आधारित प्रमाणपत्र

मुंबईत फेरीवाल्यांचा विषय चर्चेचा मुद्दा आहे. मुंबईतील फेरीवाल्यांना QR Code आधारित प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती अर्थसंकल्पातून देण्यात आली आहे. त्यामुळे यापुढे मुंबईतील फेरीवाल्यांकडे QR कोड आधारित प्रमाणपत्र असतील.

## जरांगे पाटील यांचा पुन्हा अल्टिमेटम; जून महिन्यात पुन्हा उपोषणाला बसणार?

मुंबई (दै. संध्या)



मराठा आरक्षणाच्या संदर्भात सरकारने लवकरात लवकर कार्यवाही केली नाही, तर जून महिन्यात पुन्हा उपोषणाला बसण्याचा इशारा मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द झाले किंवा त्यांना आरक्षणाचा लाभ मिळाला नाही, तर कोणाच्याही विनंतीकडे लक्ष दिले जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. या संदर्भात संबंधित मंत्र्यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घ्यावे, असेही त्यांनी म्हटले. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारने ठोस निर्णय घेणे आवश्यक असून, नव्या समितीच्या माध्यमातून प्रक्रिया वेगाने पूर्ण होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मराठा आरक्षणाच्या संदर्भात हैदराबाद गॅझेटीयरच्या आधारे मराठा समाजाला ओबीसी प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेसाठी राज्य सरकारने अखेर नवी समिती स्थापन केली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या देखरेखीखाली ही समिती काम करणार असून प्रमाणपत्र देण्यासाठी आवश्यक असलेली संपूर्ण कार्यपद्धती निश्चित करण्याची जबाबदारी या समितीकडे देण्यात आली आहे.

## राममोहन नायडूंना पदावर राहण्याचा अधिकार नाही : रोहित पवार

मुंबई (दै. संध्या)



महाराष्ट्राचे नेते अजित दादा यांच्या अपघाती निधनानंतर त्यांच्या चौकशी आणि न्यायाच्या मागणीसाठी जनतेतून आवाज उठत आहे. या पार्श्वभूमीवर, आमदार रोहित पवार यांनी केंद्रीय हवाई वाहतूक मंत्री राममोहन नायडू यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. डीजीसीए ने (नागरी उड्डाण प्राधिकरण) व्हीएसआर व्हेंचर्सला दिलेले सुरुवातीचे क्लीन चिट आणि त्यानंतरच्या विशेष सुरक्षा ऑडिटमधील निष्कर्षांमध्ये मोठी विसंगती असल्याचे रोहित पवार यांनी म्हटले आहे.

विधानभवनात माध्यमांशी बोलताना रोहित पवार यांनी सांगितले की, २८ जानेवारी २०२६ रोजी, अपघातानंतर लगेचच डीजीसीएने एक अहवाल जारी केला होता. या अहवालात व्हीएसआर व्हेंचर्सच्या लियरजेट विमानामध्ये कोणतीही लेव्हल एक त्रुटी आढळली नसल्याचे नमूद करण्यात आले होते. त्याच दिवशी केंद्रीय हवाई वाहतूक मंत्र्यांनीही व्हीएसआर व्हेंचर्समध्ये सुरक्षाविषयक कोणतीही चिंता नसल्याचे म्हटले होते.

मात्र, अलीकडेच झालेल्या व्हीएसआर व्हेंचर्सच्या विशेष सुरक्षा ऑडिटमध्ये अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत. यामध्ये विमान उडण्यायोग्य आहे की नाही, हवाई सुरक्षा आणि उड्डाण कार्यान्वित करण्याच्या प्रक्रियेतील त्रुटींचा समावेश आहे. जनतेच्या दबावामुळेच हा तपास योग्य दिशेने जात असल्याचे रोहित पवार यांनी नमूद केले. या गंभीर विसंगतीमुळे, त्यांनी केंद्रीय मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे, जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत हा लढा सुरूच राहील असे त्यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.

दरम्यान आज आमदार रोहित पवार मुंबईतील मरीन लाईन्स पोलिस स्थानकात दाखल झाले. डीजीसीए आणि व्हीएसआर या विमान कंपनीविरोधात तक्रार दाखल करण्यासाठी ते पोलिस स्थानकात गेले. रोहित पवारांनी पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणाच्या संदर्भात ते आक्रमक भूमिका घेताना दिसले. पोलिसांशी संवाद साधताना रोहित पवारांनी केवळ अर्ज स्वीकारण्याऐवजी थेट एफआयआर नोंदवण्याची मागणी केली. हे केवळ एक निवेदन नाही तर एक तक्रार आहे, ज्यावर त्वरित एफआयआर दाखल व्हायला हवा. आम्हाला ॲप्लिकेशन द्यायची नाही, डायरेक्ट एफआयआर घ्या, असे रोहित पवार यांनी म्हटले. ही घटना “अजित पवार केस” या शीर्षकात नमूद केलेल्या मोठ्या प्रकरणाचा एक भाग मानली जात आहे, ज्यामुळे राजकीय वर्तुळात या घडामोडींना महत्त्व प्राप्त झाले आहे.

## अजितदादांच्या अपघाताप्रकरणी DGCA, VSR वर गुन्हा दाखल करण्यास नकार

मुंबई (दै. संध्या)

अजितदादांच्या विमान अपघातप्रकरणी मरीन ड्राईव्ह पोलिसांनी आज रोहित पवारांचा ‘एफआयआर’ दाखल करून घेतला नाही. कोणाच्या तरी पाठिंब्यामुळेच पोलिस अधिकाऱ्यांची मग्रुरी सुरू आहे. अजितदादा प्रकरणी आमदारांचे असे होत असेल, तर इतरांचे काय, असा सवालही रोहित पवार यांनी केला. रोहित पवार, अमोट मिटकरी यांच्यासह अजितदादा आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे काही आमदार मरीन ड्राईव्ह पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यासाठी गेले होते. मात्र, हा एफआयआर पोलिसांनी दाखल करून घेतला नाही. रोहित पवार म्हणाले की, 'सुरुवातीला आमचा वादविवाद झाला. मात्र, त्यांनी लॅपटॉप आणला. माझं स्टेटमेंट टाइप करायला सुरुवात झाली. मात्र, एक बडे पोलिस अधिकारी आले. त्यांनी एफआयआर करण्यापासून थांबवलं. त्यांनी आम्हाला का थांबवलं? या पोलिस अधिकाऱ्याला कोणाचा फोन आला?, असा प्रश्न असून आमचा संशय बळावत चालला आहे. आम्हाला राज्य सरकारनं आणलेल्या नव्या कायद्यानुसार एफआयआर दाखल करण्याचा अधिकार आहे. रोहित पवार म्हणाले की, 'आता उद्या सकाळी दहा वाजता बारामतीमध्ये 'एफआयआर' दाखल करायचा प्रयत्न करणार आहोत. ती बिल्डिंग दादांनी बांधली आहे. तिथं नाही झालं, तर न्यायालयात जाऊ. ती बिल्डींगही दादांनी बांधलीय.

रोहित पवार म्हणाले की, 'विखे-पाटील, आशिष शेलार, साताऱ्याचे मंत्री, त्यांचे ट्रोलर ट्रोल करतात. आज पोलिस एफआयआर दाखल करून घेत नाहीत. कुणाचा तरी पाठिंबा असल्याशिवाय पोलिस अधिकाऱ्यांना अशी मग्रुरी येत नाही. लाखो लोकांच्या आमदारांची अशी अवस्था असेल, तर इतरांचे काय? कोण अडथळे आणत आहेत, कोण नेते आहेत, बघणार,' असे रोहित पवार म्हणाले. मात्र, मुंबई पोलिसांनी आपण रोहित पवारांनी दिलेली तक्रार स्वीकारली असून, त्यावर योग्य ती कारवाई करणार असल्याचे म्हटले आहे. झारखंडच्या छपरामध्ये झालेल्या अपघातानंतर एआयबीने संबंधित कंपनीच्या कार्यालयावर तात्काळ छापा टाकत चौकशी सुरू केली.


### पोलिस कुणाच्या दबावाखाली?

राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांचा विमान अपघातात मृत्यू झाला आहे आणि आमच्याकडे या प्रकरणात घातपात झाल्याचे स्पष्ट पुरावे असतानाही पोलिस अद्याप एफआयआर दाखल का करत नाहीत? असा संतप्त सवाल रोहित पवार यांनी केला आहे. या दुर्घटनेमागे केवळ तांत्रिक बिघाड नसून घातपाताचा संशय बळावणारे ठोस पुरावे उपलब्ध आहेत. वारंवार मागणी करूनही आणि पुरावे देऊनही पोलिस गुन्हा नोंदवण्यास टाळाटाळ का करत आहेत, असा प्रश्न त्यांनी विचारला. एवढ्या मोठ्या पदावर असलेल्या व्यक्तीच्या बाबतीत जर पोलिस इतकी दिरंगाई करत असतील, तर सामान्य जनतेला न्याय कसा मिळणार? व्हीएसआर' या विमान कंपनीला वाचवण्यासाठी पोलिस प्रशासन राजकीय दबावाखाली काम करत आहे. तपासाची दिशा भरकटवून कंपनीला क्लीन चिट देण्याचा घाट घातला जात असल्याचा दावा त्यांनी केला. पोलिस नक्की कोणाच्या दबावाखाली आहेत आणि कोणाला वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत, हे जनतेला समजले पाहिजे.

## मालेगाव मनपात नमाज कशाला?

### हे तर जिहादचेच रूप

मुंबई (दै. संध्या)



निवडणुकीच्या पूर्वी हे पक्ष जय भीम-जय मीम म्हणतात पण निवडणुकीनंतर फक्त जय मीमच राहते ते आमच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विसरतात. संविधानाच्या कुठल्या पानावर मनपामध्ये नमाज पठण परवानगी आहे हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहलेल्या संविधानात कुठे परवानगी आहे याचे कागद त्यांनी मला दाखवावे, असे म्हणत मंत्री नीतेश राणे यांनी मालेगाव मनपामध्ये नमाज पठणावर टीका केली आहे. नीतेश राणे म्हणाले की, मनपामध्ये तुम्ही विकास करण्यासाठी निवडून गेले आहात की धर्म वाढवण्यासाठी निवडून गेलेले आहात? असा सवाल राणेंनी केला आहे. हे जिहाद नाही का? याचाच विरोध आम्ही करतो आहोत. लोकांनी तुम्हाला विकासासाठी निवडून दिले आहे ना? नमाज पडण्यासाठी तुमच्या मशिदी बंद पडल्या आहेत का? तिथे टाळे लावले आहेत का? मग उद्या आम्ही आमच्या हिंदू राष्ट्रामध्ये प्रत्येक मनपामध्ये भगवतगीता वाचायला सुरुवात करतो ना. मग हिरव्या सापांनी थोबाड उघडू नये. तुम्ही केले तर चालते आणि आम्ही केले तर देखो ये हिंदू-मुस्लीम करतात म्हणायचे. याचे सिलेंडर शुक्रवारीपण वर वर येणार आणि रोज पण येणार हे कुठे लिहले आहे.

# घात डिजिसीएने जाणीवपूर्वक घडवून आणला का?

### अमोल मिटकरी आक्रमक; अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

मुंबई (दै. संध्या)



झारखंडच्या छपरामध्ये झालेल्या अपघातानंतर एआयबीने संबंधित कंपनीच्या कार्यालयावर तात्काळ छापा टाकत चौकशी सुरू केली. मग व्हीएसआर प्रकरणात तशीच तत्परता का दिसून येत नाही, असा संतप्त सवाल राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांनी केला आहे. या प्रकरणात केवळ थातूरमातूर कारवाई करून चालढकल करण्याचा नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाचा प्रयत्न असेल, तर महाराष्ट्रातील जनतेचा रोष आणखी वाढेल, असा इशाराही त्यांनी दिला. अपघातानंतर एक महिन्याने अहवाल देण्यात आला, तर ब्लॅक बॉक्स तीन आठवड्यांनंतर सापडला. सुमित कपूर संदर्भात डिजिसीएने एक शब्दही उच्चारला नाही, अशी टीका त्यांनी केली. या कारवाईवर आम्ही समाधानी नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर या प्रकरणाला वेगळीच दिशा मिळाली आहे. व्हीएसआर व्हेंचअर्सला मोठा धक्का बसला असून, नागरी विमान वाहतूक महासंचालनालय (डीजीसीए) यांनी कंपनीच्या चार लिअरजेट 45 विमानांच्या उड्डाणांवर बंदी घातली आहे. अपघातानंतर या विमानांचे विशेष ऑडिट करण्यात आले होते. त्यामध्ये काही गंभीर उणिवा आढळल्याचे सांगितले जात आहे. त्या पार्श्वभूमीवर सर्व विमानांचे उड्डाण रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, ही कारवाई उशिरा झाल्याचा आरोप करत मिटकरी यांनी सखोल चौकशीची मागणी केली आहे.

मिटकरी यांनी या प्रकरणात केवळ कंपनीवर कारवाई करून थांबू नये, तर डिजिसीएच्या संबंधित अधिकाऱ्यांवरही सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला पाहिजे, अशी मागणी केली. परवानगीशिवाय विमान उड्डाण करू शकत नाही, मग त्या दिवशी नादुरुस्त विमान उड्डाणासाठी कसे देण्यात आले? असा थेट प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

# तरुणीने कोर्टात जबाब बदलला

पुणे (दै. संध्या)




पुणे जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात चर्चेचा विषय ठरलेल्या भिगवण प्रकरणातील मुलीनं तिचा जबाब बदलला आहे. बारामती पोलीस ठाण्यात आणि कोर्टात मुलासोबत राहायचं असल्याच्या भूमिकेवर ठाम असलेल्या मुलीनं आता तिचा जबाब बदलला आहे. भिगवण प्रकरणातील मुलीनं आईकडे जाण्याची इच्छा व्यक्त केली आहे. भिगवण प्रकरणातील मुलगी मुस्लीम समाजातील तरुणासोबत 17 फेब्रुवारी रोजी निघून गेल्यानं मोठा वाद निर्माण झाला होता. भिगवणमधून निघून गेल्यानंतर बारामती पोलीस स्टेशनला 20 फेब्रुवारीला तरुणासह हजर झाली होती. पुण्याच्या भिगवण प्रकरणात मोठी अपडेट समोर येत आहे. भिगवण अपहरण प्रकरणातील तरुणीने इंदापूर अतिरिक्त सत्र न्यायालयासमोर आपल्याला आईकडे आणि मामाकडे जायची इच्छा व्यक्त केली आहे. 20 फेब्रुवारी रोजी बारामती सत्र न्यायालयासमोर या तरुणीने आपण आईसोबत जाणार नसून जहीर शेख सोबतच जाणार असल्याचं म्हटलं होतं. त्यानंतर आज इंदापूर अतिरिक्त सत्र न्यायालयात व्हीसीद्वारे या प्रकरणातील सुनावणी पार पडली. पुन्हा आज इंदापूर अतिरिक्त सत्र न्यायालयाने संबंधित तरुणीला व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे काही प्रश्न विचारले. यावेळी संबंधित तरुणींना आई आणि मामा सोबत जाण्याची इच्छा व्यक्त केली. मुलीची आई बारामती पोलीस स्टेशनला आली होती. मात्र, मुलगी आई सोबत जाण्यास तयार नव्हती. त्यामुळे भिगवण घटनेतील मुलीला महिला पुनर्वसन केंद्रात तिची रवानगी करण्यात आली होती. सुधारगृहात पाच दिवस राहिल्यानंतर आज इंदापूर कोर्टात सुनावणी झाली. त्यावेळी कोर्टाने मुलीला कोणाकडे जायचे असे विचारले असता मुलीने आई आणि मामाकडे जाण्याची इच्छा व्यक्त केली.

## संपादकीय

# निवृत्तीनंतर कामगारांना काम द्यावे का?

भारतातील लोकसंख्येचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. आयुर्मान वाढत आहे, आरोग्यसेवा सुधारत आहेत आणि परिणामी ज्येष्ठ नागरिकांची संख्या मोठ्या वेगाने वाढते आहे. २०११ मध्ये सुमारे १० कोटी असलेली ६० वर्षांवरील लोकसंख्या २०३६ पर्यंत २३ कोटींहून अधिक होण्याचा अंदाज व्यक्त केला जातो. म्हणजेच प्रत्येक सात भारतीयांपैकी एक जण ज्येष्ठ असेल. हा केवळ सामाजिक बदल नाही; तर तो अर्थव्यवस्था, श्रमबाजार आणि सार्वजनिक धोरणांसमोर उभा ठाकलेला मोठा प्रश्न आहे. या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाचा मुद्दा पुढे येतो. निवृत्त झाल्यानंतर कामगारांना पुन्हा कामाची संधी द्यावी का?

पारंपरिक समजुतीनुसार निवृत्ती म्हणजे कामाचा शेवट, निष्क्रियतेची सुरुवात. पण बदलत्या वास्तवात हा दृष्टिकोन कालबाह्य ठरत आहे.

एखादा कामगार आयुष्यभराच्या सेवाकाळात केवळ पगार कमावत नाही; तो कौशल्य, अनुभव, व्यावसायिक नेटवर्क, व्यवस्थापन क्षमता आणि जीवनाचे शहाणपणही मिळवतो. हे सगळे मिळून एक प्रकारचे 'मानवी भांडवल' तयार होते. निवृत्तीनंतर या भांडवलाला पूर्णपणे निष्क्रिय ठेवणे म्हणजे अर्थव्यवस्थेतील एक मौल्यवान साधन वाया घालवण्यासारखे आहे.

आज उद्योग, शेती, सेवा क्षेत्र, शिक्षण, आरोग्य, वित्तीय सेवा किंवा कौशल्य प्रशिक्षण. सर्वच ठिकाणी अनुभवाला मोठे महत्त्व आहे. या क्षेत्रांमध्ये निवृत्त कामगार मार्गदर्शक, सल्लागार, प्रशिक्षक किंवा प्रकल्पाधारित सहकारी म्हणून प्रभावी भूमिका बजावू शकतात. जपान, जर्मनी, अमेरिका आणि युरोपियन देशांनी ज्येष्ठांच्या सहभागाला अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग मानले आहे. जपानमध्ये 'ॲक्टिव्ह एजिंग' धोरणांतर्गत निवृत्त नागरिकांना पार्ट-टाईम कामाच्या संधी दिल्या जातात. जर्मनीत व्यावसायिक पुनःप्रशिक्षण आणि नियोक्त्यांसाठी प्रोत्साहन योजना राबवल्या जातात. युरोपियन देशांमध्ये 'सिल्व्हर इकॉनॉमी' या संकल्पनेद्वारे ज्येष्ठ नागरिकांचा आर्थिक सहभाग वाढवून अब्जावधी युरोंचे योगदान मिळवले जात आहे.

भारतासाठीही ही दिशा महत्त्वाची ठरू शकते. आपल्या देशात ज्ञानाधारित सेवा, सल्लागार क्षेत्र, डिजिटल प्लॅटफॉर्म, कृषी विस्तार, पर्यटन, सामाजिक विकास आणि उद्योजकता या क्षेत्रांत निवृत्त कामगार मोठा वाटा उचलू शकतात.

युवकांच्या रोजगारावर परिणाम होईल का?

निवृत्त कामगारांना पुन्हा काम देण्याबाबत एक महत्त्वाची शंका व्यक्त केली जाते. यामुळे युवकांच्या रोजगाराच्या संधी कमी होतील का?

प्रत्यक्षात तसे होण्याची शक्यता कमी आहे. कारण निवृत्त कामगारांचे कार्यक्षेत्र, भूमिका आणि अपेक्षा या मुख्य प्रवाहातील युवकांच्या नोकऱ्यांपेक्षा वेगळ्या असतात. ज्येष्ठांचा सहभाग हा मार्गदर्शन, सल्लागार, प्रशिक्षण, तात्पुरते किंवा प्रकल्पाधारित काम अशा स्वरूपाचा असतो. उलट त्यांच्या अनुभवामुळे नव्या पिढीला कौशल्य आणि दिशा मिळू शकते.

निवृत्ती हा केवळ आर्थिक बदल नसून मानसिक संक्रमणही असतो. अचानक आलेली निष्क्रियता, सामाजिक अलिप्तता, एकाकीपणा आणि परावलंबित्व यामुळे अनेक ज्येष्ठांमध्ये नैराश्याची भावना वाढते. जर त्यांना अर्थपूर्ण कामाची संधी मिळाली, तर त्यांचा आत्मसन्मान टिकतो, सामाजिक जोडणी मजबूत राहते आणि जीवनात सक्रियतेची जाणीव निर्माण होते.

निवृत्ती ही जीवनातील पूर्णविराम नसून अल्पविराम मानला, तर समाज आणि अर्थव्यवस्था दोन्ही समृद्ध होऊ शकतात. अनुभव आणि ऊर्जेचा संगम साधला, तर भारताला नव्या प्रकारची उत्पादनक्षमता, नव्या रोजगारसंधी आणि सामाजिक स्थैर्य मिळू शकते.

आज गरज आहे ती निवृत्त व्यक्तींना 'लाभार्थी' म्हणून नव्हे, तर 'योगदान देणारे नागरिक' म्हणून पाहण्याची. ज्येष्ठांची क्षमता ओळखून त्यांना अर्थव्यवस्थेत पुन्हा सामावून घेतले, तर 'सिल्व्हर इकॉनॉमी' भारतासाठी नवी ऊर्जा ठरू शकते.

## गुरु वचन

### मृत्यूचे भय नाही

एखदा एका राज्याच्या महाराणीचा हिऱ्यांचा हार हरवला. हा हार राणीचा जीवापेक्षा प्रिय होता. यामुळे तिने त्यास शोधण्यासाठी अनेक प्रयत्न केले परंतु तो कुठेही सापडला नाही. हारासाठी राणी परेशान झाल्याचे पाहून राजाने दवंडी दिली की, ज्या कोणालाही हा हार सापडला असेल त्याने तीन दिवसांच्या आत परत करावा, अन्यथा त्याला मृत्यूदंड देण्यात येईल.

योगायोगाने तो हार एका साधूला मिळाला. त्याच्या मनात हाराविषयी कसलेही आकर्षण नव्हते. परंतु त्याने या विचाराने तो हार स्वत:कडेच ठेवला की, हा हार शोधत-शोधत कुणीतरी त्याच्याकडे येईल आणि नंतर त्यास तो हार देवून टाकेल. दुसऱ्या दिवशी त्याने राज्याची दवंडी ऐकली परंतु तो हार देण्यास न जाता तपश्चर्येत तल्लीन राहिला. राजाच्या दवंडीनुसार तीन दिवस उलटले होते.

चौथ्या दिवशी तो साधू हार घेऊन राजादरबारात पोहोचला. तेव्हा राजाला माहीत झाले की हार तीन दिवसांपासून साधूच्या जवळ होता तरीही तो देण्यास आला नाही. त्यामुळे राजाला राग आणि त्याने साधूला प्रश्न केला तू माझी दवंडी ऐकली नव्हतीस. त्यावर साधून उत्तर दिले, ऐकली होती परंतु मी हार परत करण्यास पूर्वीच आलो असतो तर लोकांनी विचार केला असता की, साधू असतानाही मरणाला घाबरून हार देण्यास आला आहे. तेव्हा राजाने विचारले आज चौथ्या दिवशी का आलास. त्यावर साधू म्हणाला मृत्यूची भीती नाही, परंतु कुणा दुसऱ्यांची संपत्ती मी आपल्याजवळ ठेवणे पाप समजतो. हारासारख्या छोट्या गोष्टीशी मला काहीही घेणेदेणे नाही. साधूचे हे बोलणे एकून राजाने शर्मेने मान खाली केली. सोबतच राणीला आपल्या चुकीची कल्पना झाली आणि तिने तो हार विकून त्यापासून मिळालेले पैसे गरीबांना वाटून टाकले.

## उपदेशकथा

### नादिरशाही

नादिरशहा हा इराणचा बादशहा. १७३९ मध्ये त्याने भारतावर स्वारी केली. त्याने दिल्ली जिंकली नि त्याच्या सैनिकांनी शिरकाण आरंभले. तीस हजार प्राणांना मुकले. परत फिरताना त्याने लूट किती न्यावी? तीस कोटी रुपये खंडणी, कोहिनूरसहित अगणित जडजवाहीर, मयूर सिंहासन, एक हजार हत्ती सात हजार घोडे, दहा हजार उंट, मुघल जनानखान्यातील सुंदर स्त्रिया, दोनशे कारागीर, शंभर मिस्त्री व दोनशे सुतार एवढी लूट त्याने नेली. असे तवारिखा लिहितात. इराणमध्ये या लुटीमुळे अर्थव्यवस्था एवढी सुधारली की त्याने राज्यात सारे कर, सारा वसुली इत्यादी रद्द केली. दिल्लीत त्याने कत्ले आम चा हुकूम दिला. त्याच्या सैनिकांनी मुंडक्यांचे मिनार उभारले. राजधानी दिल्ली रक्ताने रंगून निघाली. त्याच्या वजिराचे पत्थरदिलही द्रवले; पण नादिरशहाच्या काळजाला पाझर फुटेना. वजीरसाहेब सोनेरी मशिदीकडे धावले. तेथे शहेनशाह बंदगी करण्यात मग्न होते. नमाज संपताच वजिराने काकुळतीने विनंती केली. कत्तल थांबवा म्हणून रदबदली केली. यावर बादशहा खवळला. दिल्ली उद्ध्वस्त झाल्याखेरीज हुकमाची तामिळी चालूच राहील, असे त्याने फर्मावले. वजिराने धीर न सोडता खाविंदांना एक फारसी वचन सुनावले - कस न मान्द कि दीगर ब तेंगे नाज कशी। मग कि जिन्दा कुनी खत्क राव बाजी कुशी।। (आपल्या पराक्रमी समशेरीपुढे साऱ्यांनी माना टाकल्या. नावाला कुणी उरलं नाही. आपल्या कृपादृष्टीनं मेलेल्यांना जिवंत तरी करा, म्हणजे कत्तल अशीच चालू ठेवता येईल) या शब्दांनी शहा भानावर आला व त्याने बीजन बंद करण्याचे फर्मान काढले. पुढे इराणात गेल्यावर तो भ्रमित झाला. त्याच्याच दरबाऱ्यांनी त्याच्या तलवारी चालवल्या.

कथा उपदेश : याच जन्मात आपल्याला कृतकर्माचे फळ भोगावे लागतेच.

## पंचांग

२६ फेब्रुवारी २०२५
गुरूवार
विक्रम संवत्- २०८२
फाल्गुन शके
संवत्- १९४७
संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- उत्तरायणारंभ
मास- फाल्गुन
ऋतु- सौर शिशिर
शुक्ल पक्ष
तिथि:दशमी २४:३३:४२+
नक्षत्र:मृगशिर्षा
१२:११:०९
योग:प्रीति २२:३२:५८
करण:तैतिल १३:३६:५०

करण:गर २४:३३:४२+
सूर्य:कुम्भ
चन्द्र:मिथुन००:५४:२७
हिजरी सन् - १४४६
मुस्लिम मास - रमजान
तारीख - ८
विशेष
स्वात्रत्र्यवीर सावरकर
पुण्यतिथी
मलकुजीनाथ महाराज
यात्रा - अजंती दारव्हा

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८७१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | | | | 8 | | | 6 | |
| | 6 | | | 5 | 9 | 2 | | |
| 4 | | 8 | | | | 5 | | 9 |
| | 3 | 7 | | 2 | | 9 | | 6 |
| 6 | | 4 | | | | 1 | | 8 |
| 9 | | 5 | | 1 | | 4 | 2 | |
| 8 | | 3 | | | | 6 | | 1 |
| | | 6 | 1 | 7 | | | 9 | |
| | 1 | | | 3 | | | | 5 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

- उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. ८७० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 1 | 7 | 2 | 8 | 6 | 3 | 4 | 5 |
| 5 | 4 | 6 | 1 | 3 | 7 | 2 | 9 | 8 |
| 8 | 2 | 3 | 9 | 5 | 4 | 6 | 1 | 7 |
| 2 | 5 | 4 | 6 | 9 | 3 | 7 | 8 | 1 |
| 6 | 8 | 1 | 7 | 4 | 2 | 9 | 5 | 3 |
| 7 | 3 | 9 | 5 | 1 | 8 | 4 | 2 | 6 |
| 3 | 9 | 5 | 4 | 6 | 1 | 8 | 7 | 2 |
| 1 | 6 | 2 | 8 | 7 | 9 | 5 | 3 | 4 |
| 4 | 7 | 8 | 3 | 2 | 5 | 1 | 6 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९०७ - रॉयल ऑईल आणि शेल यांनी संयुक्तपणे ब्रिटीश पेट्रोलियमची स्थापना केली.
- १९३० - वेस्ट इंडिजने इंग्लंडला २८९ धावांनी नमवून आपला पहिला कसोटी सामना जिंकला.
- १९७७ - अवकाश यान बोईंग ७४७ ने पहिली उड्डाण घेतली.

### राष्ट्रीय

- २००८ - रेल्वे अर्थसंकल्पात विद्यार्थिनी, ज्येष्ठ महिला नागरिक, अशोक चक्र विजेत्यांना रेल्वे भाड्यात सवलती देण्यात आल्या.
- २००८ - हमालांना गँगम नपदी निवड करण्यात येणार असल्याची घोषणा रेल्वेमंत्री लालूप्रसाद यादव यांनी रेल्वे अर्थसंकल्पात केली.
- २००८ - भारताचा कर्णधार महेंद्रसिंग धोनी एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात १०० झेल टिपणारा भारताचा दुसरा व जगातील १७ वा यष्टीरक्षक बनला.

### जन्म

- १८७६ - अर्जेंटिनीयाचे राष्ट्रपती अगस्टीन पी.जस्टो यांचा जन्म.
- १८८७ - यूएन सेक्युरिटी कॉन्सीलचे अध्यक्ष सर बेनेगल नरसिंग राव यांचा जन्म.
- १९२४ - जपानचे पंतप्रधान नोबोरू तकेशीता यांचा जन्म.

### निधन

- ११५४ - सीसीलेचे राजा रुगीअर दुसरा यांचे निधन.
- १५७७ - स्वीडनचे राजा इरीक सोळावा यांचे निधन.
- १९६१ - मोरोक्कोचे राजा मोहम्मद बीन युसुफ यांचे निधन.
- २००८ - सरल, महान गायक मुकेश यांची पत्नी यांचे निधन.

## : SMS :

3 sardar picnic par gaye,wahan ja kar yad aya k "PEPSI" to ghar bhul gaye,decide kia ki sab se chota sardar ja kar pepsi le aey, chota sardar:mai is shart par jata hu k tum mere ane tak smose nai khaoge,dono ne kaha thik hai, 2din guzar gaye sardar nahi aya, 4din guzar gaye sardar nahi aye, 2no ne socha k ab smosa kha line chahye,jse hi smosa uthaya chota sardar ped k peche se nikal k bola..Aisa karoge to mai nai jaunga..

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| पुणे | २९ | २२.१ |
| पंढरपूर | ३२.३ | २५.४ |
| औरंगाबाद | २९.३ | २१.३ |
| अहमदनगर | २९.५ | २२.६ |
| अकोला | ३३.२ | २३.३ |
| अमरावती | ३१.७ | २३.७ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : पश्चिम कलेकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलेल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका.

**तुळ :** शुभ रंग : जांभळा, अनुकूल दिशा : पश्चिम स्वत:च्या योजनांनूसार कामे होतील. तक्रार होऊ शकते.

**वृषभ :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : दक्षिण कुटुंबातील वातावरण तणावपूर्ण राहील. आज आपणास उत्साह वाटणार नाही.

**वृश्चिक :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा:दक्षिण कौटूंबिक वातावरण आनंदी राहिल्याने कार्यकौशल्य वाढेल. संपत्ती संबंधी कामात यश मिळण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : दक्षिण जीवनसाथीच्या व्यवहारात सुधारणा होईल. केलेल्या कामाचे चांगले फळ मिळेल.

**धनु :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पुर्व फायद्याच्या मार्गात विस्तार होईल. ध्येय समोर ठेवून काम केल्यास यश मिळेल.

**कर्क :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पश्चिम बुद्धीचा वापर केल्यास कामात प्रगती होण्याचे योग आहेत. मनाजोगे लाभ मिळू शकतील.

**मकर :** शुभ रंग : नीळा, अनुकूल दिशा : पश्चिम नशिबाने प्रगती, धार्मिक लाभ व मार्गदर्शन आपल्यासाठी भविष्यवर्धक राहतील.


**सिंह :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पश्चिम पूर्वी केलेल्या कामाचे शुभ परिणाम आज पहावयास मिळेल. संपत्तीत वाढ होईल. घरासंबंधी समस्या राहू शकते.

**कुंभ :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : उत्तर कामात अडथळे, तणाव यासारख्या समस्या वाढतील. मनाचा संयम ढासळू न देता कामे करा.

**कन्या :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पश्चिम प्रतिष्ठित लोकांशी भेटी हातील ज्याचा फायदा भविष्यात आपल्याला मिळेल.

**मीन :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : दक्षिण महत्वपूर्ण गोष्टींचा विचार कराल. आळस सोडून देऊन सक्रीय व्हावे लागेल. भेट वस्तू मिळेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८७१



### आडवे शब्द

१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

### उभे शब्द

१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार ओळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

### जम्बो शब्दकोडे क्र. ८७० चे उत्तर

१.विदूषक ३.बातमीदार ७.जमापावती ९.नाही १०.जांभया ११.वेगवान १३.शतावरी १६.कुंदा १७.चाकरचुकर २१.रीत २३.रटाळ २५.चकटफू २७.सरहद्द २९अ.अवसर ३१.हरामखोर ३२.कटाप ३३.पालव ३४.टपणे ३६.सटरफटर ३९.नवलाई ४२.कावा ४२अ.रफ ४४.राकट ४५अ.पट ४६.एकाटक ४८.चराचर ५०.फणकारा ५२.कणेर ५३.कबरा ५४.रक्तदान ५६अ.मोहक ५७अ.कसेल त्याची जमीन ६१.तडकफडक ६४.सम ६६.बालंट ६८.पदोपदी ६९.जर्नादन ७१.किक ७२.सर ७३.मोती ७४.कपटी ७५.रसातळ ७६.मत

उभे उत्तर : १.विनाशक २.दुहिता ३.बाभळी ४.तया ५.दावेदार ६.राग ७.जनक ८.पाल चुकचुकणे १२.वाचाळ १४.वरी १५.रीतसर १८.रच १९.कट २२.जिद्द २४.टालमटोला २६.घाव २८.हद्दपार २९.खारट २९अ.अवस ३०.समीर ३१.हवन ३२अ.पळवाट ३५.पलटण ३७.टरकणे ३८.फरक ३८अ.टफ ४०.वनचर ४१.ईरा ४२.कापरा ४३.कचरा ४५.कफन ४६.एक ४७.टरफल ४९.रक्तपात ५१.काडीमोड ५३.कपची ५५.चीक ५६.सनसनाटी ५७.हक ५८.सेनापती ५९.त्यागपत्र ६०.जड ६१अ.डबा ६२.कलंकित ६३.फटकळ ६५.मर्द ६७.भारत ६९.जप ७०.नर ७२.सर

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




## 'तेजस्वी'मधून शनिवारी (ता. 28) उलगडणार स्वातंत्र्यवीर सावरकरांची स्फूर्तिदायी गाथा

■ वंचित विकास संस्थेतर्फे आयोजन; दुर्मिळ छायाचित्रे, गीतांतून दृकश्राव्य अनुभूती

पुणे (दैनिक संध्या) : स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या अष्टपैलू जीवनाची स्फूर्तिदायक गाथा उलगडणाऱ्या 'तेजस्वी' या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. वंचित विकास संस्थेतर्फे येत्या शनिवारी (ता. २८) सायंकाळी ५ वाजता लेडी रमाबाई हॉल, स. प. महाविद्यालय, टिळक रोड पुणे येथे होणाऱ्या कार्यक्रमात सावरकरांच्या दुर्मिळ छायाचित्रे आणि गीतांमधून दृकश्राव्य अनुभूती पुणेकरांना घेता येणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला आहे, अशी माहिती संस्थेच्या कार्यवाह मीना कुर्लेकर यांनी दिली. "प्रखर राष्ट्रभक्त, क्रांतिकारकांचे मुकुटमणी, प्रतिभावान लेखक, संवेदनशील कवी, विद्वान व्याख्याते, उत्कृष्ट नाटककार, कठोर विज्ञाननिष्ठ, भाषाप्रेमी, समाजसुधारक, हिंदू संघटनासाठी नावीन्यपूर्ण संकल्पना राबवणारे कृतिशील हिंदुत्ववादी असे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विविध पैलू या कार्यक्रमातून उलगडून दाखवले जाणार आहेत. या कार्यक्रमाची निर्मिती, संकल्पना आणि लेखन सुधांशु नाईक यांनी केले असून, प्रसाद नातू, आरती परांजपे, चैत्राली अभ्यंकर आणि सुधांशु नाईक हे सादरीकरण, तर व्हायोलिनवर गोविंद कुलकर्णी साथसंगत करणार आहेत," असे मीना कुर्लेकर यांनी नमूद केले.



## रोजगाराभिमुख कौशल्य विकास उपक्रमास प्रारंभ

पुणे (दैनिक संध्या) : युवा सक्षमीकरण, शिक्षण,रोजगाराद्वारे आर्थिकदृष्ट्या वंचितांना सक्षम बनविणे,आरोग्य,पर्यावरण संवर्धन,आपत्ती प्रतिसाद अशा विविध क्षेत्रात गेली१० वर्षे कार्यरत असणाऱ्या पुण्यातील वाय फोर डी फौंडेशन ही गैर-सरकारी संस्था व महापारेषण (महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसिटी ट्रान्स्मिशन कंपनी)यांच्या सहकार्याने ग्रामीण युवकांसाठी रोजगाराभिमुख कौशल्य विकास उपक्रम सुरु केला आहे. ग्रामीण भागातील युवकांना तांत्रिक कौशल्यांच्या माध्यमातून स्वावलंबी बनविणे, त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि उद्योगांच्या गरजेनुसार कुशल मनुष्यबळ तयार करणे या उदेश्याने दोन्ही संस्थांमध्ये नुकताच एक सामंजस्य करार करण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत सातारा जिल्ह्यातील विविध गावांमधून निवडलेल्या १६३ युवकांना उद्योगमान्य व प्रात्यक्षिक-आधारित प्रशिक्षण दिले जाणार आहे. पीसीबी असेंब्ली ऑपरेटर आणि ऑटोमोटिव्ह असेंब्ली ऑपरेटर या अभ्यासक्रमांचा समावेश असून, तांत्रिक कौशल्यांसोबत सॉफ्ट स्किल्स, व्यक्तिमत्व विकास आणि मुलाखत तयारी यांवरही विशेष भर दिला जाणार आहे. सध्या खंडाळा तालुक्यातील विंग येथे ५५ युवकांसाठी निवासी प्रशिक्षणास सुरुवात झाली असून, दोन महिन्यांत प्रशिक्षण पूर्ण होणार आहे. प्रशिक्षणानंतर पात्र उमेदवारांना नामांकित उद्योगांमध्ये प्लेसमेंटची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. हा उपक्रम ग्रामीण युवकांना स्वावलंबन, स्थिर रोजगार आणि सामाजिक सक्षमीकरणाचा मार्ग उपलब्ध करून देणारा महत्त्वपूर्ण टप्पा ठरत आहे.

## पैसे घेऊनही सदनिकांचा ताबा न देणाऱ्या व्यावसायिकांच्या मालमत्तांचे लिलाव

पुणे (दैनिक संध्या) : सदनिका खरेदीसाठी ग्राहकांकडून पैसे घेऊनही त्यांना वेळेत सदनिकांचा ताबा न देणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांच्या मालमत्तांचा लिलाव करण्यात येणार आहे. यामध्ये पुणे, पिंपरी-चिंचवडसह जिल्ह्यातील अन्य तालुक्यांतील बांधकाम व्यावसायिकांचा समावेश आहे. जिल्हा प्रशासनाने तसा निर्णय घेतला असून, येत्या २० एप्रिलपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करून लिलावाच्या रकमेतून ग्राहकांना त्यांचे पैसे दिले जाणार आहेत. सदनिका खरेदीवेळी पैसे घेऊनही वेळेत सदनिका न देणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांविरोधात 'महारेरा'कडे तक्रारी करण्यात आल्या होत्या. या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर बांधकाम व्यावसायिकांनी एकूण १८६ प्रकरणांमध्ये १४६ कोटी ५० लाख रुपयांची रक्कम स्वीकारल्याचे पुढे आले होते. ही रक्कम ग्राहकांना तातडीने देण्याचे आदेश 'महारेरा'ने दिले होते. दरम्यान, 'महारेरा'च्या आदेशानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने बांधकाम व्यावसायिकांवर कारवाई करण्याचे निश्चित केले आहे. गेल्या वर्षी मार्च अखेरपर्यंत जिल्ह्यात २४६ प्रकरणांमध्ये १९५ कोटी ४९ लाख रुपयांची वसुली करण्याचे उद्दिष्ट होते. त्यात नव्याने ५९ प्रकरणांचा समावेश झाला. त्यामुळे ५३ कोटी २८ लाख रुपयांची आणखी रक्कम वसूल करण्याचे उद्दिष्ट होते. त्यामुळे आतापर्यंत ३०४ प्रकरणे प्रलंबित होती. त्यापोटी २४८ कोटी ७७ लाख रुपयांची थकबाकी होती. गेल्या वर्षी एप्रिल ते जानेवारी या दरम्यान ११८ प्रकरणे निकाली काढण्यात जिल्हा प्रशासनाला यश आले. त्यापोटी १०२ कोटी रुपयांची वसुली करण्यात आली. त्यामुळे जानेवारी महिन्याच्या अखेरीस १८६ प्रकरणे शिल्लक राहिली आहेत. त्यापोटी १४६ कोटी ५० लाख रुपयांची रक्कम बांधकाम व्यावसायिकांकडून वसूल करणे बाकी आहे.

# पुंछमध्ये उभा राहणार छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा

### शिवस्वराज्य यात्रेने ग्रंथदिंडीने होणार सुरुवात ; आम्ही पुणेकर संस्थेचा स्मारकासाठी पुढाकार : महाराष्ट्रातील गड किल्ल्यांचे पाणी व माती स्मारकासाठी नेणार

पुणे (दै. संध्या) :




छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य, शौर्य, कीर्ती जगमान्य आहे. त्यामुळे त्यांचे स्मारक भारतीय जवानांसाठी स्फूर्ती आणि प्रेरणादायी ठरणार आहे. आम्ही पुणेकर संस्थेच्या वतीने ९ मराठा रेजिमेंट पुंछ जम्मू कश्मीर येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात येणार आहे. मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात अश्वारूढ पुतळ्याचे उद्घाटन होणार आहे, अशी माहिती आम्ही पुणेकर संस्थेचे अध्यक्ष हेमंत जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला आम्ही पुणेकर चे विश्वस्त अखिल झांजले, विपुल कांबळे, अँड मिलिंद पवार, अभयराज शिरोळे, श्याम दौडकर, ज्येष्ठ शिल्पकार विवेक खटावकर आदी उपस्थित होते.

युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत महाराष्ट्रातील ११ किल्ले आहेत. साल्हेर, शिवनेरी, लोहगड, रायगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, खांदेरी, राजगड, प्रतापगड आणि तामिळनाडू येथील जिंजी अशा १२ किल्ल्यांचा समावेश आहे. त्यामुळे स्मारकाच्या भूमिपूजनासाठी महाराष्ट्रातील अकरा गड किल्ल्यांची माती आणि पाणी नेण्यात येणार आहे.

आम्ही पुणेकर चे विश्वस्त संदीप मते म्हणाले, गुरुवार, दिनांक २६ फेब्रुवारी रोजी मुंबईमध्ये शिव स्वराज्य यात्रेने सुरुवात होत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या हस्ते मूर्तीचे पूजन होणार आहे. त्यानंतर दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक येथे सावरकरांच्या पुण्यतिथीनिमित्त रथयात्रेचे स्वागत सावरकरांनी रचलेल्या शिवरायांच्या आरतीचे गायन करून होणार आहे. त्यानंतर बडोदा, अहमदाबाद येथील राजभवन, उदयपूर, जयपूर येथील राजभवन, दिल्ली येथील नवीन महाराष्ट्र सदन, पठाणकोट, जम्मू राजभवन अशा विविध ठिकाणी स्वागत व पूजन झाल्यानंतर प्रत्यक्ष पुंछ येथे या स्मारकाचे उद्घाटन होईल.

श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ संचलित श्री शिवशंभू विचार मंच यांचे याकरिता विशेष सहकार्य मिळाले आहे. या पुतळ्याची निर्मिती पुण्यातील प्रसिद्ध शिल्पकार विवेक खटावकर यांचे चिरंजीव विपुल आणि विराज खटावकर यांनी केली आहे. खटावकर यांची तिसरी पिढी शिल्पाचे काम करीत आहे.

मागील वर्षी नोव्हेंबर २०२३ मध्ये जम्मू-काश्मीरमधील कुपवाडा येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा आम्ही पुणेकर संस्थेच्या वतीने उभारण्यात आला होता. त्यावेळचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुधीर मुनगंटीवार, राज्यपाल मनोज सिन्हा यांच्या उपस्थितीत भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच जपानची राजधानी टोकियो येथे मार्च महिन्यात गोविंद गिरी महाराज यांच्या हस्ते स्मारकाचे उद्घाटन झाले होते. त्याच पार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रेरणा देणारे स्मारक भारतीय जवानांसाठी अभिमानाने उभे राहणार आहे.

## 'समूह साधन समन्वयक' पदासाठी चुरस... परीक्षेचा निकाल कधी?

पुणे (दै. संध्या) :

राज्यातील केंद्र शाळांतील केंद्रप्रमुख अर्थात समूह साधन समन्वयक पदासाठी चुरस होणार आहे. एका पदासाठी पंधरा शिक्षक असून, परीक्षा दिलेल्या शिक्षकांचे परीक्षेच्या निकालाकडे लक्ष लागले आहे.

दरम्यान, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल मार्चच्या पहिल्या आठवड्यात जाहीर होण्याची शक्यता आहे. राज्यातील समूह साधन केंद्रातील (केंद्रशाळा) समूह साधन केंद्र समन्वयकांच्या (केंद्रप्रमुख) २ हजार ४१० पदांसाठी राज्य परीक्षा परिषदेतर्फे 'समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०२५' ही परीक्षा घेण्यात आली. परीक्षा परिषदेने २०२३ मध्येही केंद्रप्रमुख पदासाठी ही परीक्षा आयोजित केली होती. त्यावेळीही शिक्षक उमेदवारांनी अर्ज भरून नोंदणी केली होती. मात्र, तांत्रिक कारणास्तव त्यावेळीही परीक्षा होऊ शकली नव्हती. त्यानंतर पुन्हा एकदा नोव्हेंबरमध्ये परीक्षेसाठी नोंदणी प्रक्रिया राबवून ३ आणि ४ फेब्रुवारी रोजी ही परीक्षा घेण्यात आली. २ हजार ४१० पदांपैकी पुणे जिल्ह्यात १५१, नाशिक जिल्ह्यात १२२, रत्नागिरी जिल्ह्यात १२५, अहिल्यानगर जिल्ह्यात १२३, रायगड जिल्ह्यात ११४ पदे उपलब्ध आहेत. त्याशिवाय अन्य जिल्ह्यांमध्येही पदे उपलब्ध आहेत. त्यामुळे राज्यभरातील शिक्षकांचे या परीक्षेकडे लक्ष लागले होते. परीक्षा परिषदेने दिलेल्या माहितीनुसार, एकूण ४६ हजार ६८ शिक्षकांनी या परीक्षेसाठी नोंदणी केली होती. दोन सत्रांत झालेली ही परीक्षा ३८ हजार ५५९ शिक्षकांनी दिली. तर ७ हजार ५०९ शिक्षक अनुपस्थित राहिले. मात्र, या परीक्षेसाठी मोठ्या प्रमाणात नोंदणी झाल्यामुळे निवडीसाठी चुरस होणार असल्याचे दिसून येत आहे.

## 'वंदे मातरम् 'द्वारे वीररस, भक्तिरसाची अनुभूती

### स्वरमयी गुरुकुल आयोजित 'चित्रपटातील वंदे मातरम् ' दृकश्राव्य कार्यक्रम

पुणे (दै. संध्या) :




राष्ट्रभक्ती जागविणाऱ्या वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताद्वारे वीररस, भक्तिरसाची निर्मिती करणाऱ्या पारंपरिक रागातील दृकश्राव्य सादरीकरणामुळे पुणेकरांमध्ये चैतन्य निर्माण झाले. निमित्त होते चित्रपटातील वंदे मातरम् या कार्यक्रमाचे.

डॉ. प्रभा अत्रे फाऊंडेशन संचालित स्वरमयी गुरुकुलच्या वतीने 'चित्रपटातील वंदे मातरम् ' या कार्यक्रमाचे आयोजन जंगली महाराज रस्त्यावरील स्वरमयी गुरुकुलमध्ये करण्यात आले होते. प्रसिद्ध चित्रपट संगीत आस्वादक धनंजय सप्रे यांनी हा कार्यक्रम सादर केला. स्वरमयी गुरुकुलचे कार्यक्रम निर्देशक प्रसाद भडसावळे यांच्यासह अनेक मान्यवर रसिक उपस्थित होते.

सप्रे यांनी वेगवेगळ्या काळातील चित्रपटामध्ये वंदे मातरम् शब्द किंवा गीत कशा पद्धतीने उपयोगात आणण्यात आले आहे, गीताचे गायक, संगीतकार कोण होते, कोणत्या रागात वंदे मातरम् सादर करण्यात आले आहे आदी वैशिष्ट्यांसह विश्लेषण केले.

आकाशवाणीवर सादर होणारे राष्ट्रीय गीत वंदे मातरम् ऐकवून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यावेळी उपस्थित रसिकांनी गीताच्या सन्मानार्थ उभे राहून मानवंदना दिली. वंदे मातरम् या गीताच्या निर्मितीचा इतिहास तसेच गुरुदेव बंकिमचंद्र चटर्जी यांच्या कार्याला उजाळा देण्यात आला.

१९३५ मध्ये वंदे मातरम् या चित्रपटाची निर्मिती झाली. त्यात वंदे मातरम् हे गीत होते. २०१५ मधील 'नीलकंठ मास्तर' या चित्रपटात वंदे मातरम् हे गीत थीम साँग म्हणून वापरण्यात आले. २०१३ मध्ये आलेल्या हुतात्मा अनंत कान्हेरे यांच्यावरील '१९०९' या चित्रपटात क्रांतिकारकांसाठी प्रेरणागीत म्हणून या गीताचा अंतर्भाव करण्यात आला. अत्यंत वेगळ्या चालीत आणि वेगळ्या प्रकारे हे गीत सादर झाले आहे. १९९६ मध्ये आलेल्या 'मेकिंग ऑफ महात्मा' या महात्मा गांधी यांच्यावरील चित्रपटात, २००० मध्ये आलेल्या 'भारती' या तामिळ चित्रपटात वंदे मातरम् हे गीत आहे. १९७१ मध्ये आलेल्या 'महविप्लव अरविंद' तसेच १९७९ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'सबुज द्विपेर राजा' या एका बंगाली चित्रपटांमध्ये हे गीत ऐकायला मिळते.

१९५१ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'आंदोलन' या चित्रपटातील वंदे मातरम् हे गीत अजून वेगळ्या धाटणीचे आहे. याचे संगीतकार पन्नालाल घोष होते. १९५१ मध्ये बंगाली सिनेमा आनंदमठ यातही हे गीत वेगळ्याच धाटणीत अनुभवायला मिळते.

या शिवाय पंकज मलिक, मास्टर कृष्णराव, वसंत देसाई, गीता रॉय, पं. ज्ञानदत्त, सुधीर फडके, ए. आर. रहमान यांनी देखील या गीताला वेगवेगळ्या चाली दिल्या आहेत, या विषयी धनंजय सप्रे यांनी अवगत केले.

## कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी शासन कटिबद्ध

पुणे (दै. संध्या) :

■ विधान परिषदेत प्रशासकीय दिरंगाईवर आमदार अमित गोरखे यांचे ताशेरे

■ पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीत डिजिटल 'ई-नाम' प्रणाली टाळून 'मॅन्युअल' नोंदीं करण्याच्या पद्धतीवर आमदार अमित गोरखे यांची नाराजी



पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कामकाजात अधिक पारदर्शकता आणण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. मात्र, प्रशासकीय स्तरावर होणारी दिरंगाई आणि प्रलंबित निर्णयांबाबत विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्ष वेधले. गैरव्यवहार प्रकरणात सात दिवसांच्या आत सविस्तर कारवाईचा अहवाल सादर करण्याचे निर्देश असतानाही, अद्याप त्यावर अपेक्षित प्रगती का झाली नाही? असा वस्तुनिष्ठ प्रश्न उपस्थित करत त्यांनी पणन विभागाच्या कार्यपद्धतीत अधिक गती आणण्याची गरज व्यक्त केली. बाजार समितीचा कारभार पूर्णतः दोषमुक्त करण्यासाठी आणि दोषींवर नियमानुसार कारवाई करण्यासाठी आमदार गोरखे यांनी प्रशासनाला आवश्यक त्या सुधारणांच्या सूचना केल्या.

यावेळी बोलताना आमदार अमित गोरखे यांनी प्रशासकीय दिरंगाई आणि नियमांच्या पायमल्लीवर बोट ठेवले. ते म्हणाले की, पुणे बाजार समितीच्या तत्कालीन संचालक मंडळाच्या कार्यकाळात स्टॉल्स, टपऱ्या, दुकाने, गाळे, मोकळ्या जागा आणि महत्त्वाचे म्हणजे पेट्रोल पंपाचे जे वाटप करण्यात आले, त्यात मोठे गैरव्यवहार झाले आहेत. यासंदर्भात तक्रारी असूनही आणि मंत्री महोदयांचे निर्देश असतानाही पणन खात्याने हे वाटप रद्द करण्याचे आदेश आजपर्यंत का दिले नाहीत?

केंद्र आणि राज्य सरकार 'नॅशनल ॲग्रीकल्चर मार्केट' (e-NAM) या डिजिटल प्रणालीद्वारे पारदर्शक व्यवहारांसाठी आग्रही आहे. असे असताना पुणे बाजार समितीमध्ये आजही 'मॅन्युअल' (हस्ते) पद्धतीने नोंदी का केल्या जातात? या पद्धतीमुळे त्रुटी राहण्याची शक्यता असून, सर्व व्यवहार तातडीने ऑनलाइन प्रणालीवर आणणे गरजेचे असल्याचे आमदार अमित गोरखे यांनी नमूद केले.

नियमानुसार, बाजार समितीच्या एकूण उत्पन्नातील किमान ३० टक्के रक्कम ही थेट शेतकऱ्यांच्या पायाभूत सुविधांवर खर्च करणे बंधनकारक आहे. मात्र, तशी 'बजेटरी प्रोव्हिजन' (अर्थसंकल्पीय तरतूद) सक्तीची का केली जात नाही? असा सवाल करत त्यांनी शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशावर डल्ला मारला जात असल्याचे सुचित केले.

जोपर्यंत या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी होऊन दोषींवर कडक कारवाई होत नाही, तोपर्यंत बाजार समितीतील भ्रष्टाचार थांबणार नाही. शासनाने केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष कृती करावी, अशी मागणी आमदार अमित गोरखे यांनी केली.

### ठोस कारवाई अपेक्षित

सलग तीन अधिवेशनांमध्ये हा विषय सभागृहात उपस्थित करण्यात आला असला, तरी आजवर त्यावर कोणतीही ठोस व परिणामकारक कारवाई झालेली नसल्याने शेतकरी, व्यापारी तसेच बाजार समितीतील परवानाधारक घटकांमध्ये तीव्र असंतोष आहे. शेतमालाच्या खरेदी-विक्रीसाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या बाजार समितीच्या कारभारात पारदर्शकता, शिस्त आणि जबाबदारी असणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे येणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात या प्रकरणाचा चौकशी अहवाल प्रत्यक्ष सभागृहात मांडून निर्णायक निर्णय घेतला जाणार की केवळ आश्वासनांची पुनरावृत्ती होणार, याकडे संबंधित सर्व घटकांचे लक्ष लागले आहे.

## सोशल मीडियावर बहिणीसाठी लिहिलेली खास पोस्ट व्हायरल

पुणे (दै. संध्या) :



येक नंबर, तानाजी या चित्रपटांमध्ये झळकलेला मराठमोळा अभिनेता धैर्य घोलप सध्या चर्चेत आला आहे. धैर्यच्या लाडक्या बहिणीने मानाच्या फोर्ब्स इंडिया २०२६ च्या '४० अंडर ४०' या यादीत स्थान मिळवलं आहे. तसेच धैर्यला ही त्याच्या येक नंबर या त्याच्या पहिल्याच मराठी चित्रपटासाठी 'फिल्म फेअर' अवार्ड मिळालं. त्याने त्याच्या बहिणीसाठी सोशल मीडियावर नुकतीच भावूक पोस्ट शेअर केली आहे. त्या पोस्टमध्ये धैर्यने लिहिलय की, "फोर्ब्स ४० अंडर ४० च्या प्रतिष्ठित लिस्ट मधे माझ्या बहिणीचं नाव झळकलं व पुरस्कार घरी आला आणि माझ्या डोळ्यासमोरून इतक्या वर्षांचा फ्लॅशबॅक गेला. माझे बाबा बोर्डात आले होते त्यामुळे साहजिकपणे त्यांच्या माफक अपेक्षा अशा होत्या की त्यांच्या दोन्ही मुलांनी अभ्यासात कधी मागे पडू नये. त्यामुळे ते आमच्या लहानपणापासून आम्हाला जमेल त्या पद्धतीने अभ्यासात गुंतवून ठेवायचा प्रयत्न करायचे. त्यात आमची ताई कायम त्यांनी सांगितलेल्या गोष्टी ऐकायची आणि पुस्तकांमध्ये हरवलेली असायची. (आजदेखील तसंच चित्र आहे म्हणा) आम्ही शाळा-कॉलेज मध्ये असताना बाबा सकाळी ५ वाजता उठायचे आम्हाला ड्रायफ्रूट्स आणि गरम दूध करून ठेवायचे मग आम्हाला उठवायचे आणि अभ्यासाला बसवायचे आणि मग ऑफिस ला जायचे. एखाद्या गोष्टीची तपश्चर्या आणि कठोर मेहनत करत नाही तोपर्यंत यश साध्य होणे नाही. जे करायचं आहे ते प्रचंड प्रामाणिकपणे करा . जीव तोडून मेहनत केली तर सगळं साध्य होऊ शकतं होत नाही, जमत नाही म्हणजे काय ? लात मारीन तिथे पाणी काढीन असं असावं.

# नव्या पिढीतील दिग्दर्शकांचा शोध घेण्यासाठी 'झी' तर्फे नॅशनल झी शॉर्ट फिल्म कॉन्टेस्टची घोषणा

पुणे (दै. संध्या) :

संस्कृती, सर्जनशीलता आणि व्यापकतेवर आधारित भविष्योन्मुख कॉन्टेन्ट इकोसिस्टम उभारण्याच्या आपल्या वचनबद्धतेला अधिक बळकटी देत 'झी' तर्फे झी शॉर्ट फिल्म कॉन्टेस्ट – या आपल्या प्रकारच्या अशा पहिल्याच, उद्योगांची व्याख्या करणाऱ्या संपूर्ण भारतभर राबवल्या जाणाऱ्या ओम्नीचॅनेल उपक्रमाच्या शुभारंभाची घोषणा करण्यात आली आहे. देशभरातील नवोदित चित्रपट निर्मिती प्रतिभेचा शोध घेऊन त्यांचे संगोपन करणे आणि त्यांची कला साजरी करणे हा या स्पर्धेचा उद्देश आहे. देशातील विविध क्षेत्रांमध्ये आपली वेगळी ओळख प्रस्थापित केलेले फिल्ममेकर्स एकाच राष्ट्रीय व्यासपीठावर एकत्र आणत, ही स्पर्धा भारतीय मनोरंजन क्षेत्रातील सर्वांत महत्त्वाकांक्षी बहुभाषिक कलागुण शोध उपक्रमांपैकी एक ठरत आहे. खरोखरच सर्वसमावेशक दृष्टीकोनातून राबवलेल्या या उपक्रमात हिंदी, मराठी, बंगाली, तेलुगू, तामिळ, मल्याळम आणि कन्नड अशा सात प्रमुख भाषांचा समावेश असून विविध सांस्कृतिक पार्श्वभूमी आणि चित्रपट परंपरांतील कथाकथनकारांना ह्या उद्योगातील दिग्गजांच्या पाठबळासह राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाणार आहे. झी शॉर्ट फिल्म कॉन्टेस्टच्या केंद्रस्थानी विविध चित्रपट उद्योगांतील कथाकथनाला नवी दिशा देणाऱ्या दिग्गज दिग्दर्शकांचे प्रभावी परीक्षक पॅनल आहे. या परीक्षकांमध्ये हिंदीतील 'गँग्स ऑफ वासेपूर'सारख्या धाडसी आणि वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या चित्रपटांसाठी ओळखले जाणारे अनुराग कश्यप (हिंदी); मराठीतील 'नटरंग'सारख्या सांस्कृतिकदृष्ट्या प्रभावी चित्रपटांसाठी प्रसिद्ध असलेले रवि जाधव (मराठी); बंगालीतील 'ऑटोग्राफ' आणि 'जातिश्वर' सारख्या आशयघन चित्रपटांचे दिग्दर्शक सृजित मुखर्जी (बंगाली); तेलुगूतील 'कल्की 2898 एडी'सारख्या भव्य चित्रपटामागील द्रष्टे दिग्दर्शक नाग अश्विन (तेलुगू); सामाजिक विषयांवर आधारित परिणामकारक चित्रपटांसाठी ओळखले जाणारे दिग्दर्शक समुथिरकणी (तामिळ); 'जल्लिकट्टू'सारख्या आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरवलेल्या, दृश्यदृष्ट्या धाडसी चित्रपटांचे दिग्दर्शक लिजो जोस पेलिसेरी (मल्याळम); तसेच 'गोधी बन्ना साधारण मायकट्टू'सारख्या भावनिक आणि सूक्ष्म कथाकथनासाठी ओळखले जाणारे दिग्दर्शक हेमंत राव (कन्नड) यांचा समावेश आहे.

प्रथमच आपापल्या प्रादेशिक चित्रपट चळवळीचे नेतृत्व करणारे आणि स्वतंत्र कथाकथन शैली घडवणारे दिग्गज दिग्दर्शक एका व्यासपीठावर एकत्र आले असून नवोदित प्रतिभेला मार्गदर्शन व संधी देण्यासाठी हा उपक्रम राबवला जात आहे. त्यांच्या सहभागामुळे या स्पर्धेला भक्कम विश्वासार्हता लाभतेच आणि त्याचसोबत भारतातील खऱ्या भाषिक व सर्जनशील विविधता प्रतिबिंबित करणारा, संस्कृतीशी जोडलेला आणि भविष्यासाठी सज्ज असा टॅलेंट इन्क्युबेटर उभारण्याचा 'झी'चा धोरणात्मक हेतूही स्पष्ट होतो. या देशव्यापी कलागुण शोध उपक्रमाच्या माध्यमातून 'झी' तरुण, महत्त्वाकांक्षी आणि उत्कट फिल्ममेकर्सना आधुनिक भारतीय चित्रपटसृष्टी घडवणाऱ्या दिग्गज कथाकथनकारांसमोर आपली कला सादर करण्यासाठी सर्वसमावेशक संधी उपलब्ध करून देण्याचा उद्देश ठेवत आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या फिल्ममेकर्सना व्यावसायिक चित्रपटसृष्टीत ओळख मिळवण्याची संधी मिळणार असून त्यांच्या सर्जनशील प्रवासाला पाठबळ देणारी रोख बक्षिसेही जिंकता येणार आहेत. तसेच 'झी'च्या व्यापक कॉन्टेन्ट इकोसिस्टममधील विविध सहकार्याच्या संधीही त्यांच्यासाठी खुल्या होणार आहेत. आजच्या डिजिटल युगात विविध माध्यमांवर कथा सहजपणे पोहोचत असताना हा उपक्रम निर्मात्यांना केवळ एका फॉरमॅटपुरते मर्यादित न राहता विचार करण्यास प्रोत्साहित करतो. डिजिटल, टेलिव्हिजन आणि चित्रपटगृह अशा तिन्ही माध्यमांवर सहजपणे सादर करता येतील अशा प्रभावी कथा घडवण्यावर या उपक्रमाचा भर आहे.

# पुढील तीन वर्षांत देशातील प्रत्येक शहरात 'भारत टॅक्सी' उपलब्ध होईल

नवी दिल्ली (दै. संध्या) :

- 'भारत टॅक्सी' सारथींच्या सर्व चिंता दूर करेल.
- 'भारत टॅक्सी' चालकांना आता ड्रायव्हर म्हटले जाणार नाही, तर सन्मानाने "सारथी" म्हटले जाईल.
- भारत टॅक्सीमध्ये, सारथीं नफ्याचे मालक देखील असतील



नवी दिल्लीच्या त्या दुपारी एक वेगळीच ऊर्जा जाणवत होती. देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या टॅक्सी चालकांमध्ये एक साधा पण मोठा विचार पुढे येत होता – जो मेहनत करतो तोच नफ्याचा खरा हक्कदार असावा. ही केवळ साधी बैठक नव्हती, तर नव्या विचारांच्या बदलाची सुरुवात होती. सहकारी संस्थांचे खरे योद्धा अमित शहा यांच्या दृष्टीकोनाच्या केंद्रस्थानी एक सरळ प्रश्न होता – रस्त्यावर दिवस-रात्र कष्ट करणारा माणूस फक्त कमिशनवरच का जगावा? तोच मालक का होऊ नये? आणि इथूनच 'ड्रायव्हर'पासून 'सारथी' होण्याची कहाणी सुरू होते. अमित शहा यांनी मांडलेल्या विचारांमध्ये 'ड्रायव्हर' या शब्दाऐवजी 'हा शब्द वापरण्याचा निर्णय होता. हा केवळ शब्द बदल नव्हता, तर चालकांना सन्मान, स्वाभिमान आणि भागीदारी देण्याचा सकारात्मक प्रयत्न होता. रस्त्यावर घाम गाळणारा व्यक्ती केवळ सेवा देणारा नसून, तो व्यवस्थेचा भागीदार आणि स्वाभिमानाने उभा असलेला मालक असावा – हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

अंत्योदयाची भूमिका मांडणारे अमित शहा यांच्या परिकल्पनेतील 'भारत टॅक्सी' ही कोणत्याही खासगी कंपनीप्रमाणे जास्तीत जास्त नफा कमावण्यावर आधारित नाही. तिच्या केंद्रस्थानी तो व्यक्ती आहे, जो दररोज रस्त्यावर घाम गाळतो. 'भारत टॅक्सी'ची रचना अशी करण्यात आली आहे की फक्त 500 रुपयांचा शेअर घेऊन कोणताही सारथी मालकी हक्काचा भागीदार होऊ शकतो. येत्या तीन वर्षांत ही सेवा देशातील प्रत्येक महानगरपालिकेपर्यंत पोहोचवण्याची आखणी करण्यात आली आहे. हे केवळ एक सेवा नसून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मजबूत झालेल्या राष्ट्रीय सहकारी चळवळीचा एक भाग आहे.

देशातील प्रत्येक शेवटच्या व्यक्तीला सक्षम बनवण्याचे अमित शहा यांचे स्वप्न या योजनेच्या उत्पन्न रचनेतही दिसून येते. या योजनेचा पुढचा भागही तितकाच महत्त्वाचा आहे. एकूण कमाईपैकी 80 टक्के रक्कम थेट सारथींच्या खात्यात जाईल – जितके काम, तितकी कमाई. उर्वरित 20 टक्के भविष्यासाठी राखीव ठेवले जातील, जेणेकरून व्यवस्था मजबूत आणि टिकाऊ राहील. पहिल्या तीन वर्षांत विस्तारावर लक्ष दिले जाईल आणि त्यानंतर नफ्याचे समान वाटप केले जाईल. यावरून स्पष्ट होते की उद्दिष्ट बाजारावर वर्चस्व मिळवणे नाही, तर मजबूत आणि दीर्घकाळ टिकणारी सहकार व्यवस्था उभी करणे आहे.

सहकारी चळवळीचे धोरणात्मक शिल्पकार अमित शहा यांनी संचालक मंडळात सारथी चालकांसाठी राखीव जागा असतील अशी रचना तयार केली आहे. दररोज प्रवाशांना त्यांच्या ठिकाणी पोहोचवणारे लोक जेव्हा धोरण ठरवण्याच्या टेबलावर बसतील, तेव्हा निर्णयही त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित असतील. हीच ती प्रशासनिक दृष्टी आहे, ज्यामुळे सहकार मंत्रालयाला नवी ऊर्जा मिळाली आणि ज्याला मोदी सरकारच्या कार्यकाळात संस्थात्मक बळकटी मिळाली.

पारदर्शकतेचे रक्षक म्हणून अमित शहा यांचे दृष्टिकोन डिजिटल पायाभूत सुविधांमध्येही दिसून येते. 'भारत टॅक्सी' ही जगातील सर्वात पारदर्शक कॅब सेवा बनवण्याचा दावा हा केवळ एक नारा नाही, तर डिजिटल पायाभूत सुविधांप्रती असलेली वचनबद्धता आहे.

सर्व माहिती सूचनांद्वारे सारथी चालकांपर्यंत पोहोचेल. किलोमीटरचा दर किमान व्यवहार्यतेवर आधारित निश्चित केला जाईल, ज्यामध्ये ऑटो/कारचा खर्च, इंधन खर्च आणि किमान नफा विचारात घेतले जाईल.

या दरापेक्षा कमी दरात सेवा चालवली जाणार नाही – हा संदेश शोषणाविरोधात स्पष्ट आणि ठाम भूमिका दर्शवतो.

महिला सक्षमीकरणाचे प्रणेते अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली, "सारथी दीदी" वैशिष्ट्य महिला सारथी चालकांना स्वावलंबी आणि महिला प्रवाशांना अधिक सुरक्षितता देण्याची संकल्पना मांडण्यात आली आहे. ॲपमध्ये अशी सोय असेल की एकटी महिला प्रवासी सहजपणे महिला सारथीची निवड करू शकेल. हा केवळ तांत्रिक बदल नाही, तर विश्वास आणि सुरक्षिततेवर आधारित सामाजिक व्यवस्था आहे, जी महिला स्वावलंबनाला आर्थिक संधींशी जोडते.

संवाद हा देखील या उपक्रमाचा महत्त्वाचा भाग आहे. तक्रार नोंदविण्याची सुविधा, ऑनलाइन प्लॅटफॉर्म आणि कॉल सेंटरच्या माध्यमातून सारथी आपली मते मांडू शकतील, आणि त्यांच्याच अनुभवांच्या आधारे धोरणांमध्ये सुधारणा केली जाईल.

कामगार प्रतिष्ठेचे समर्थक असलेल्या शाह यांच्या या उपक्रमाचा सर्वात मोठा संदेश म्हणजे मानसिकतेत बदल. " ड्रायव्हर" नाही तर "सारथी" - हे संबोधनच सामाजिक प्रतिष्ठेचे प्रतीक बनू शकते. समाजाचा दृष्टिकोन बदलावा, सारथींनी स्वतःकडे सन्मानाने पाहावे आणि ग्राहकांनाही तो सन्मान जाणवावा – याच भावनेत 'भारत टॅक्सी'ची आत्मा दडलेली आहे. अशा प्रकारे 'भारत टॅक्सी' ही केवळ वाहतूक सेवा नसून, श्रमावर आधारित मालकी हक्काची जिवंत आणि प्रेरणादायी कहाणी बनून समोर येते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सहकार क्षेत्राला मिळालेल्या नव्या दिशा आणि अमित शहा यांच्या रणनीतिक दृष्टीकोनामुळे या उपक्रमाला राष्ट्रीय मॉडेलचे रूप मिळाले आहे.

रस्त्यावर धावणारी प्रत्येक टॅक्सी आता भागीदारी, सन्मान आणि स्वाभिमानाचे जिवंत उदाहरण बनू शकते – जिथे नफा एखाद्या एकट्या कंपनीचा नसून, स्टीयरिंग हातात धरून सेवा देणाऱ्या त्या सारथीचाच असेल.

## एअरटेल एक उच्च-दर्जाचे एनबीएफसी व्यासपीठ निर्माण करण्यासाठी मोठे प्रमाणात प्रयत्न

नवी दिल्ली (दै. संध्या) :

भारतातील आघाडीच्या दूरसंचार सेवा पुरवठादारांपैकी एक असलेल्या भारती एअरटेलने आज त्यांच्या गैर-बँकिंग वित्तीय कंपनी (एनबीएफसी) एअरटेल मनी लिमिटेडसाठी प्रमुख योजना जाहीर केल्या, ज्या भारतातील क्रेडिट गॅप कमी करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहेत.

एनबीएफसी उपकंपनी पुढील काही वर्षांत ₹20,000 कोटी भांडवलीकरणासह विकसित होईल. एअरटेल, भारती एंटरप्रायझेस लिमिटेड द्वारे, प्रमोटर गटासह 70% योगदान देईल आणि उर्वरित 30% आणेल. मजबूत डिजिटल मालमत्ता, 500+ डेटा शास्त्रज्ञांचे पाठबळ असलेले मोठे डेटा आणि विश्लेषण इंजिन आणि सखोल ऑपरेशनल कौशल्यासह, एअरटेलचे उद्दिष्ट संपूर्ण भारतात सुलभ, सुरक्षित आणि नाविन्यपूर्ण डिजिटल वित्तीय सेवांमध्ये जलद प्रवेश वाढवणे आहे.

एअरटेलने गेल्या दोन वर्षांत त्याच्या डिजिटल व्यासपीठाचा आणि खोलवर एकात्मिक चॅनेलचा वापर करून, उच्च-कार्यक्षमता असलेले क्रेडिट इंजिन तयार केले आहे, परिणामी भारतातील सर्वात मजबूत कर्ज सेवा प्रदात्या (एलएसपी) मॉडेलपैकी एक बनले आहे.

या व्यासपीठाला आधीच ₹9,000 कोटींहून अधिक रकमेचे वितरण करून उच्च स्वीकार्यता मिळाली आहे - ज्याला सर्वोत्तम श्रेणीतील दोषपूर्ण परिणाम, मजबूत अंडररायटिंग मॉडेल्स, शिस्तबद्ध पोर्टफोलिओ व्यवस्थापन आणि वास्तविक वेळ जोखीम देखरेखीद्वारे समर्थित केले आहे.

"गेल्या दोन वर्षांत आमच्या एलएसपी व्यासपीठाचे यश हे सिद्ध करते की आम्ही तंत्रज्ञान, डेटा आणि ग्राहकांचा विश्वास एकत्रित करून देशव्यापी प्रभाव पाडू शकतो. भारती एअरटेलचे कार्यकारी उपाध्यक्ष गोपाल विठ्ठल म्हणाले, "आम्ही भारतातील सर्वात विश्वासार्ह आणि मोठ्या प्रमाणात डिजिटल क्रेडिट इंजिनपैकी एक तयार केले आहे - उद्योगाच्या सर्वोत्तम कामगिरीच्या मापदंडांच्या आधारे लाखो लोकांना उच्च-गुणवत्तेचे क्रेडिट प्रदान करत आहोत." आमचा एनबीएफसी विस्तार हा पाया मजबूत करतो आणि एक वेगळा, भविष्यासाठी तयार डिजिटल कर्ज व्यवसाय उभारण्याचे आमचे उद्दिष्ट प्रदर्शित करतो - जो विश्वास, नावीन्य आणि आर्थिक समावेशनाचे प्रतीक आहे."

एअरटेल मनीला 13 फेब्रुवारी, 2026 रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) कडून एनबीएफसी परवाना मिळाला. भारतातील वेगाने वाढणाऱ्या वित्तीय सेवा क्षेत्रात हा धोरणात्मक विस्तार एअरटेलच्या वित्तीय समावेशनाला अधिक खोलवर नेण्यासाठी आणि वंचित ग्राहकांना सक्षम करण्यासाठीच्या वचनबद्धतेचे प्रदर्शन करतो. केअर एज रेटिंग्जनुसार, भारताचे औपचारिक क्रेडिट ते जीडीपीचे प्रमाण 53% आहे, जे देशाच्या कर्ज देण्याच्या व्याप्तीवर प्रकाश टाकते.

हा विस्तार देखील एक नैसर्गिक भर आहे जो एअरटेलच्या मोठ्या ग्राहक आधाराचा फायदा घेऊन कंपनीसाठी पुढील वाढीचे इंजिन तयार करेल आणि तिच्या पोर्टफोलिओमध्ये आणखी वैविध्य आणेल. एनबीएफसीचा वितरण प्रवास एलएसपी व्यासपीठासह अखंडपणे एकत्रित केला जाईल आणि दोघांमधील ऑपरेशनल पृथक्करण स्पष्ट असेल, ज्यामुळे ग्राहकांना सर्वोत्तम अनुभव मिळेल. तंत्रज्ञान, डेटा आणि ग्राहकांच्या अंतर्दृष्टी मोठ्या प्रमाणात एकत्रित करून, एअरटेल भारतातील डिजिटल वित्तीय सेवांसाठी एक नवीन बेंचमार्क स्थापित करण्याचे उद्दिष्ट ठेवते. कंपनी, प्रमाणपत्र देताना, आरबीआयने दिलेल्या सल्ल्यानुसार एअरटेल मनी लिमिटेडला खालील अस्वीकरण/विधान देखील देत आहे: "कंपनीकडे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायदा, 1934 च्या कलम 45 आयए अंतर्गत रिझर्व्ह बँकेने जारी केलेले 13/02/2026 रोजीचे वैध नोंदणी प्रमाणपत्र आहे. तथापि, भारतीय रिझर्व्ह बँक कंपनीच्या सध्याच्या आर्थिक स्थितीबद्दल किंवा कंपनीने केलेल्या कोणत्याही विधानाची, प्रतिनिधित्वाची किंवा मताची शुद्धता आणि कंपनीने ठेवींची परतफेड/दायित्वांची पूर्तता याबद्दल कोणतीही जबाबदारी किंवा हमी स्वीकारत नाही."



## iQOO 15R लाँच

नवी दिल्ली (दै. संध्या) : 24 फेब्रुवारी 2026: उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड iQOO ने आज iQOO 15R लाँच केला. हा स्मार्टफोन फ्लॅगशिप-लेव्हल पॉवर आणि परफेक्ट-फिट डिझाइन एकत्र करतो जो दैनंदिन वापरासाठी संपूर्ण आराम प्रदान करतो. तरुण व्यावसायिकांना लक्षात घेऊन डिझाइन केलेले, iQOO 15R हे अशा लोकांसाठी डिझाइन केले आहे जे काम, गेमिंग आणि मनोरंजनामध्ये सहजतेने स्विच करतात, शक्तिशाली कामगिरी, दीर्घकाळ टिकणारी बॅटरी लाइफ आणि एक आश्चर्यकारक दृश्य अनुभव देतात. त्याचा 6.59-इंचाचा डिस्प्ले एका हाताने वापरण्यासाठी देखील अंतर्ज्ञानी आणि आरामदायी आहे. iQOO च्या उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन पोर्टफोलिओला आणखी बळकटी देत, iQOO 15R मध्ये स्नॅपड्रॅगन 8 Gen 5 प्रोसेसर आहे, जो जलद गती, सहज प्रतिसाद आणि दिवसभर सातत्याने उच्च कार्यक्षमता प्रदान करतो.

## एचडीएफसी बँकने डिजिटल फॅक्टरीचे केले उद्घाटन

गुवाहाटी (दै. संध्या) :





भारतातील खासगी क्षेत्रातील अग्रगण्य बँक एचडीएफसी बँकेने गुवाहाटीत आपले नवे टेक आणि डिजिटल फॅक्टरी सुरू केले आहे. हे केंद्र प्रगत तंत्रज्ञान विकास, नवोन्मेष आणि प्रतिभा संवर्धनासाठी कार्य करणार असून, आसाममध्ये AI, डिजिटल आणि सायबरसिक्युरिटी क्षेत्रातील कौशल्यवृद्धीला चालना देणार आहे. ही सुविधा आसाममधील पहिली तर राष्ट्रीय स्तरावर चौथी आहे. यापूर्वी बँकेच्या अशा सुविधा मुंबई, बेंगळुरू आणि गुरुग्राम येथे आहेत. इमारतीचे उद्घाटन आसामचे मुख्यमंत्री आदरणीय डॉ. हिमंत बिस्वा सरमा यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी एचडीएफसी बँकेचे डेप्युटी मॅनेजिंग डायरेक्टर श्री. कैझाद भरुचा, एचडीएफसी बँकेचे मुख्य माहिती अधिकारी श्री. रमेश लक्ष्मीनारायण, आसाम सरकारचे मान्यवर, सहभागी शैक्षणिक संस्थांचे सदस्य आणि एचडीएफसी बँकेचे अधिकारी उपस्थित होते. ही सुविधा राज्यातील कुशल व्यावसायिकांना करिअरच्या संधी उपलब्ध करून देईल, ज्यामुळे ते थेट पुढील पिढीच्या तंत्रज्ञान विकासात योगदान देऊ शकतील. स्थानिक तंत्रज्ञान प्रतिभेचा उपयोग करून बँक टेक आणि डिजिटल फॅक्टरीसाठी क्षमता अधिक मजबूत करणार आहे. उद्दिष्ट म्हणजे AI, क्लाउड, डेटा आणि कोर इंजिनिअरिंग या क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञानाची प्रगती साधणे, ज्यामुळे राज्यात डिजिटल उत्पादन निर्मितीची क्षमता खुली होईल. एचडीएफसी बँकेने आसाम सरकारसोबत ॲडव्हान्टेज आसाम 2.0 या उपक्रमांतर्गत भागीदारी केली आहे, ज्याचे नेतृत्व आसामचे आदरणीय मुख्यमंत्री करत आहेत. या संयुक्त उपक्रमांतर्गत, एचडीएफसी बँक आणि आसाम सरकार BFSI आणि फिनटेक क्षेत्राशी संबंधित संरचित कौशल्य-विकास अभ्यासक्रमाद्वारे शैक्षणिक ज्ञान आणि उद्योगातील तज्ज्ञता यांचा संगम साधण्याचा मानस बाळगतात. हा कार्यक्रम कॅम्पस-टू-कॉर्पोरेट क्षमता या संकल्पनेवर आधारित असून, बँकिंग आणि फिनटेक उद्योगातील नोकरीच्या गरजांशी सुसंगत आहे. अभ्यासक्रमात पारंपरिक बँकिंग ज्ञानासोबतच नव्या IT क्षेत्रांचा समावेश आहे. हा कार्यक्रम सप्टेंबर 2025 मध्ये सुरू झाला असून सध्या 150 हून अधिक विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांना एचडीएफसी बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून उद्योगसंबंधित ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव मिळणार आहे. या कार्यक्रमाचा भाग असलेल्या विद्यार्थ्यांना एचडीएफसी बँकेत 2 – 4 महिन्यांच्या कालावधीसाठी इंटर्नशिपची संधी मिळेल. यामुळे त्यांना शैक्षणिक व तंत्रज्ञानाशी संबंधित संकल्पना प्रत्यक्ष कॉर्पोरेट वातावरणात वापरण्याचा अनुभव मिळेल. या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना कोणताही अतिरिक्त खर्च करावा लागणार नाही.

## आयडीएफसी फर्स्ट बँकेने सरकारी देयकातून कर्तव्याप्रति राखला विश्वास

मुंबई (दै. संध्या) :

आयडीएफसी फर्स्ट बँकेने चंदीगडमधील आपल्या एका शाखेत घडलेल्या घटनेच्या खुलाशा संदर्भात आपली तत्वनिष्ठ भूमिका आणखी स्पष्ट केली आहे. सदर घटना हरियाणा सरकारच्या काही विभागांच्या खात्यांशी संबंधित असून त्याबाबत बँकेने अलीकडेच माहिती जाहीर केली होती. प्राथमिक निष्कर्षांनुसार असे दिसून आले आहे की, शाखेतील काही कर्मचाऱ्यांनी बनावट दस्तऐवज आणि पेमेंट सूचना मंजूर करून फसवणूक केली आहे. या प्रकारामध्ये बाह्य व्यक्तींशी संगनमत असण्याची शक्यता आहे आणि संबंधित विभागांकडून सध्या या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. सध्या या प्रकरणाचा तपास सुरू असतानाही बँकेने हरियाणा सरकारच्या संबंधित विभागांनी दावा केलेली १०० टक्के मुद्दल आणि व्याजाची रक्कम त्वरित अदा केली आहे. ही एकूण रक्कम ५८३ कोटी रुपये आहे. अदा करण्यात येणाऱ्या अंतिम रकमेत भविष्यातील कोणताही दावा किंवा ताळमेळ यानुसार फेरबदल होऊ शकतो. सदर प्रकरणाचे निराकरण करताना बँकेने अवलंबलेला तत्त्वनिष्ठ दृष्टिकोन, त्वरित केलेली कारवाई आणि व्यावसायिक वर्तणुकीबद्दल हरियाणा सरकारच्या संबंधित विभागांनी बँकेचे आभार मानताना कौतुक केले आहे. हरियाणा सरकार आणि पोलीस तसेच तपास यंत्रणेच्या पूर्ण सहकार्याच्या आधारे आयडीएफसी फर्स्ट बँक या फसवणुकीतील गुन्हेगारांविरुद्ध लढण्यासाठी आणि त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करुन शिक्षा देण्यासाठी कटिबद्ध आहे. आयडीएफसी फर्स्ट बँक आर्थिकदृष्ट्या अतिशय भक्कम असून भांडवलाची पातळी अतिशय योग्य आहे.

३१ डिसेंबर २०२५ पर्यंत, 'क्रिसिल'ने बँकेच्या मुदत ठेवींसाठी 'एएए' दर्जा दिलेला आहे, तसेच क्रिसिल, इक्रा, इंडिया रेटिंग्स आणि केअरकडून दीर्घकालीन श्रेणीसाठी 'एए+' दर्जा मिळालेला आहे. बँकेचा एकूण ग्राहक व्यवसाय (कर्ज आणि ठेवी) ५,६२,०९० कोटी रुपये आहे आणि तो मागील वर्षाच्या तुलनेत २२.६ टक्क्यांनी वाढला आहे. बँकेच्या कर्जाची गुणवत्ता उत्तम आहे. 'ढोबळ एनपीए' (जीएनपीए) १.६९ टक्के आणि 'निव्वळ एनपीए' (नेट एनपीए) केवळ ०.५३ टक्के आहे. बँकेचे भांडवल पर्याप्तता गुणोत्तर १६.२२ टक्के आहे, तर 'कासा' गुणोत्तर (बचत आणि चालू खात्यातील ठेवींचे प्रमाण) ५१.६ टक्के इतके उच्च आहे.



## झेनडेस्कने पुण्यात उभारले इनोव्हेशन हब

पुणे (दै. संध्या) : झेनडेस्कने आज पुण्यात संशोधन आणि विकासासाठी (आर अँड डी) 'इनोव्हेशन हब'च्या उद्घाटनाची घोषणा केली. ही घोषणा कंपनीच्या भारतातील विस्ताराच्या तसेच जागतिक उत्पादन विकास टीमच्या वाढीतील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. प्रतिभेचे नवीन स्रोत वाढवणे आणि जागतिक टीम्समधील समन्वय बळकट करणे, या झेनडेस्कच्या धोरणाचा एक भाग म्हणून झेनडेस्क पुणे इनोव्हेशन हब ('पुणे हब' किंवा 'हब') स्थापन करण्यात आले आहे. पुणे आता कंपनीच्या जागतिक विकास केंद्रांपैकी एक बनले असून, जगभरातील कामकाजाचा भाग म्हणून या टीमचा आकार आणि महत्त्व अधिक वाढणार आहे.

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**कार्यकारी अभियंता,**
**प्रशासन संगणकीकरण विभाग, कोथरूड,**
**जि. पुणे, यांचे कार्यालय**

ई-मेल - eeacd.punewrd@maharashtra.gov.in | दूरध्वनी क्र.- ०२०-२५४४०३८३,०२०-२५४४०३९५

**ई-निविदा सूचना क्र./11/2025-26**
**द्वितीय वेळ**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरिता ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवीत आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई- निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे. निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| कामाचे नाव | :- | "Design, Development, Implementation, Hosting, Operations, Maintenance of CMS based New WRD portal for Maharashtra water Resources Department, Government Of Maharashtra" |
| जिल्हा | :- | पुणे |
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | :- | दिनांक २७/०२/२०२६ ते दिनांक ०६/०३/२०२६ |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक | :- | दिनांक ०९/०३/२०२६ |
| काम पूर्ण करण्याचा कालावधी | :- | ७२ महिने |

जा.क्र.प्रसंवि/२०८/२०२६
कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग
जलसंपत्ती भवन, कोथरूड, पुणे
दि. २४/०२/२०२६

सही/-
कार्यकारी अभियंता,
प्रशासन संगणकीकरण विभाग जलसंपत्ती भवन,
कोथरूड, पुणे- ४११०३८

क्रमांक : आरओसी-2025-26/क्र-5/C6155

**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांचे कार्यालय**
**मतदान केंद्रावर व इतर आवश्यक ठिकाणी वेबकास्टिंग (Webcasting enabled) कार्यान्वित करणेकामी**
**सी.सी.टि.व्ही कॅमेरे व इतर अनुषांगिक साहित्य भाडेतत्त्वावर पुरवठा करणेकरीता ई- निविदा**

जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
निवडणूक शाखा
पीईई-1A/कावि/137/2026
दि. 24/02/2026

पुणे जिल्ह्यातील आगामी कालावधीमध्ये मा. निवडणूक आयोग, भारत सरकार व मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचे निर्देशानुसार होणाऱ्या सर्व आगामी निवडणूक कामकाजाकरीता, तसेच सदर निवडणूकीच्या पूर्व तयारीकरीता जिल्हा निवडणूक कार्यालय, पुणे व जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघ, मुख्यालय अथवा सक्षम अधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी वेवकास्टिंग (Webeasting enabled) कार्यान्वित करणेकामी सी.सी.टि.व्ही कॅमेरे व इतर अनुषांगिक साहित्य भाडेतत्वावर पुरवठा करणेकामी अनुभवी व योग्य अभियंत्यांकडुन विहीत नमुन्यातील दरपत्रके ई-निविदेद्वारे मागविण्यात येत आहे.

**ई- निविदेतील कामाचा तपशील :-**

पुणे जिल्ह्यातील आगामी कालावधीमध्ये मा. निवडणूक आयोग, भारत सरकार व मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचे निर्देशानुसार होणाऱ्या सर्व आगामी निवडणूक कामकाजाकरीता, तसेच सदर निवडणूकीच्या पूर्व तयारीकरीता जिल्हा निवडणूक कार्यालय, पुणे व जिल्हयातील सर्व विधानसभा मतदार संघ, मुख्यालय अथवा सक्षम अधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी वेबकास्टिंग (Webeasting enabled) कार्यान्वित करणेकामी सी.सी.टि.व्ही कॅमेरे य इतर अनुषंगिक साहित्य भाडेतत्त्वावर पुरवठा करणेसाठी खालील प्रमाणे आवश्यकत्ता आहे.

1. पुणे जिल्हयातील मतदानाचे दिवशी सर्व मतदान केंद्राकरीता (8500 अंदाजे) आणि FLC चे वेळी वेबकास्टिंग (Webcasting enabled) करणे,
2. इतर ठिकाणी अंदाजे 1000 वेबकास्टिंग (Webcasting enabled) कार्यान्वित करणे.

वरील 1 व 2 येथे नमूद केल्यानूसार अंदाजे 8500 मतदान केंद्रांवर आणि FLC चे वेळी बेवकास्टिंग कार्यान्वित करावयाचे आहे. सदरबाब विचारात घेऊन निविदाधारकांनी निविदा दर भरावयाचे आहे.
सदर निविदेची कार्यक्रम पत्रिका खालीलप्रमाणे राहील.:-

| | |
|---|---|
| निविदा अंदाजित रक्कम रुपये | 6,25,00,000/- (रु. सहा कोटी पंचवीस लाख फक्त) |
| कोऱ्या ई निविदा फॉर्मची किंमत रक्कम रुपये (ऑनलाईन भरणा केलेली पावती जोडावी) | 20,000/- (रु. वीस हजार फक्त) (विना परतावा) |
| बयाणा EMD रक्कम रुपये (ऑनलाईन भरणा केलेली पावती जोडावी) | 12,50,000/- (रु. बारा लाख पन्नास हजार फक्त) |
| सुरक्षा अनामत रक्कम रुपये (ई-निविदा मंजूर झालेनंतर राष्ट्रीयकृत बँकची बँक गॅरंटी) | 31,25,000/-(रु. एकतीस लाख पंचवीस हजार फक्त) |
| ई-निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | 26/2/2026 दुपारी 2.00 वाजता |
| ई-निविदा ऑनलाईन स्वीकृतीचा दिनांक व वेळ | 26/2/2026 ते 4/3/2026 दुपारी 2.00 वाजता |
| निविदा पुर्व बैठक Pre- Tender Conference (PTC) दिनांक व वेळ | 2/3/2026 दुपारी 3.00 वाजता |
| ई-निविदा लिफाफा क्र. १ (निविदा तांत्रिक लिफाफा) उघडण्याचा दिनांक व वेळ | 5/3/2026 दुपारी 1.00 वाजता |
| ई-निविदा लिफाफा क्र. २ (व्यवसायिक/दराबायतचा लिफाफा) उघडण्याचा दिनांक व वेळ | तांत्रिक निविदा उघडण्यात आल्यानंतर व्यवसायिक दराच्या लिफाफा उघडण्याबाबत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सुचित केली जाईल. |
| ई-निविदा उघडण्याचे ठिकाण | तांत्रि जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे निवडणूक शाखा, बी. विंग. चौथा मजला, पुणे येथे राहील. |
| निविदा करार कालावधी | 2 वर्ष |
| ई-निविदा संपर्क अधिकारी | श्रीमती. शर्मिला गोसावी (दूरध्वनी क्र. 8983535483) |

टिप :-

1. ज्या निविदाधारकांचे निविदा अर्ज http://mahatenders.gov.in या संकेस्थळावर निर्धारीत मुदतीत सादर केली जातील. केवळ त्याच निविदा विचारा घेण्यात येतील. सदर निविदेची वैद्यता 120 दिवसांकरीता राहील. तसेच आवश्यकतेनुसार अतिरिक्त 60 दिवसांची मुदतवाढ देण्याचा अधिकार मा. जिल्हाधिकारी, तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांना राहील.
2. प्राप्त झालेल्या निविदा कारणाशिवाय स्वीकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी पुणे यांनी स्वतः राखून ठेवले आहे.
3. सदरची निविदा काम प्राप्त करुन देण्याची कोणतीही हमी देत नाही.
4. निविदेत भाग घेणाऱ्या निविदाधारकांनी क्लास III डिजिटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर विहीत नाव नोंदणी करून घेणे आवश्यक आहे.
5. निविदाधारकाने/प्राधिकृत प्रतिनिधीने निविदा Pre- Tender Conference (PTC) उपस्थित रहाणे आवश्यक आहे.
   निविदेबाबतची पुर्व बैठक वरीलप्रमाणे निर्धारित दिवशी उपजिल्हा निवडणूक पुणे यांचे जिल्हाधिकारी कार्यालय, पूणे नवीन इमारत बी विंग, चौथा मजला, पुणे येथे राहील.
6. निविदाधारकांनी अथवा त्यांनी नामनिर्देशीत केलेल्या प्रतिनिधीने निविदा उघडण्याचे वेळी जिल्हाधिकारी कार्यालय. पुणे येथे उपस्थित रहावे.
7. सदर निविदेच्या अटी व शर्ती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

सही/-
(जितेंद्र डुडी)
जिल्हाधिकारी तथा
जिल्हा निवडणूक, अधिकारी, पुणे

क्रमांक : आरओसी-2025-26/क्र-5/C6168

## थोडक्यात पण महत्वाचे...




### कॅम्प एज्यू सोसायटीच्या हॉटेल मॅनेजमेंट कॉलेजमध्ये खाद्य महोत्सव

पिंपरी (दैनिक संध्या) : कॅम्प एज्यू.सोसायटी संचालित चिंचवड येथील डॉ. अरविंद बी. तेलंग इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट मध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'फार्म टू फोर्क' या खाद्य महोत्सवाला खाद्य प्रेमीचा प्रतिसाद मिळाला. या यावेळी निशिता घाटगे आणि कॅम्प एजुकेशन सोसाटीचे अध्यक्ष वालचंद संचेती, प्राचार्य डॉ. अजयकुमार एम. राय, सोसायटीचे खजिनदार एस. डी. अग्रवाल, सदस्य जे.जी. बोथरा आदी मान्यवर उपस्थित होते. प्राचार्य डॉ. राय "स्थानिक आणि हंगामी अन्नाला समर्थन देणे हा आहे त्याचबरोबर शुद्ध आहाराचे महत्व , पौष्टिक समृद्ध अन्न, आणि निरोगी खाण्याच्या सवयी अंगीकारणे गरजेचे आहे.या थिम डिनर मध्ये मोरिंगा सूप, अमृतम कॉर्न सूप, मसालेदार दही सॉससह भाजलेले पनीर, ग्रील्ड शाले भाजीपाला टिक्का कढीपत्त्यासह टेम्पर्ड कोळंबी घोटाळा पुदिना चिकन नरमीश आलू ,बगरा बैंगन,चेट्टीनाड चिकन करी, मालवणी फिश करी,चाट काउंटर (हंगामी हुरडा आणि क्विनोआ भेळ, कचोरी चाट),पास्ता काउंटर (पेने, स्पेगेटी, मॅक्रोनी),कोस्टल फ्लेवर्स काउंटर (श्रीलंकेचा करी, मऊ अप्पम सोबत),ब्रेड काउंटर (फुलका, भाकरखणी, बाजरीची रोटी) ,राईस काउंटर (लेमन राईस, स्टीम राईस}, मुरादाबादी डाळ हे सर्व पदार्थ पारंपारिक शैलीत बनविण्यात आले होते. यामध्ये महाराष्ट्रीयन, गुजराती आणि राजस्थानी नृत्य, फ्लायरिंग आणि तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी रॅम्प वॉक सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा . वैष्णवी हर्डे यांनी केले. सूत्रसंचालन संजना बिरादर, शीतल भुजबळ, श्रीनिकेत सावटकर, अदिती भालेराव या विद्यार्थ्यांनी केले. तर आभार गौतम धिवरे यांनी मानले.

### बनावट भरती प्रक्रियेपासून सावध राहण्याचे पिंपरी चिंचवड महापालिकेचे आवाहन

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत सध्या कोणत्याही पदासाठी भरती प्रक्रिया सुरू नसल्याची स्पष्ट माहिती प्रशासन विभागाने दिली आहे. अलीकडे समाजमाध्यमांवर महानगरपालिकेत विविध पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू असल्याचे भासवणारी खोटी व दिशाभूल करणारी माहिती प्रसारित केली जात आहे. तसेच महापालिकेच्या नावाने बनावट नियुक्तीपत्रे, उमेदवारांची यादी देखील प्रसिद्ध केली जात आहे. परंतु महानगरपालिकेकडून भरती प्रक्रियेबाबत अद्याप कोणतेही अधिकृत आदेश अथवा सूचना जारी करण्यात आलेल्या नाहीत, अशी माहिती प्रशासन विभागाच्या वतीने देण्यात आली आहे. तथापि, बनावट जाहिराती व संदेशांच्या माध्यमातून नागरिकांची फसवणूक करण्याचा प्रयत्न होत असल्याच्या तक्रारी प्रशासन विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे नागरिकांनी अशा अप्रमाणित माहितीवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन महापालिकेच्या प्रशासन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. भरती प्रक्रियेबाबतची सर्व अधिकृत माहिती वेळोवेळी महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यामुळे इतर कोणत्याही माध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या माहितीवर विश्वास न ठेवता नागरिकांनी अधिकृत संकेतस्थळावर भेट देऊनच तिची खातरजमा करावी, असे आवाहन प्रशासन विभागाचे सहआयुक्त मनोज लोणकर यांनी केले आहे.




### तुकाराम महाराज बीज सोहळ्यानिमित्त पाणी वापराबाबत प्रतिबंधात्मक आदेश लागू

पिंपरी (दैनिक संध्या) : श्रीक्षेत्र देहू येथे ०३ ते ०५ मार्च २०२६ या कालावधीत संत तुकाराम महाराज बीज सोहळा २०२६ आयोजित करण्यात आला आहे. या कालावधीत महाराष्ट्रासह इतर राज्यांतून मोठ्या संख्येने भाविक व वारकरी उपस्थित राहणार असल्याने इंद्रायणी नदीचे पाणी वापराबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्यानुसार जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डुडी यांनी मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम ३३ (१)(ड) अन्वये प्राप्त अधिकारांनुसार खालील आदेश लागू केले आहेत. देहू येथील इंद्रायणी नदीच्या दोन्ही तीरांवरील पाणी पिण्यासाठी व स्वयंपाकासाठी वापरण्यास सक्त मनाई राहील.नदीचे पाणी पिण्यास वापरू नये. भाविकांनी सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या नळांचा वापर करावा. नदीपात्रात कपडे धुणे किंवा पाणी दूषित होईल असे कोणतेही कृत्य करू नये. या आदेशाचे उल्लंघन केल्यास मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम १३१ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही आदेशात स्पष्ट केले आहे.

### बनावट भरती प्रक्रियेपासून सावधान.. पिंपरी चिंचवड महापालिकेचे आवाहन

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत सध्या कोणत्याही पदासाठी भरती प्रक्रिया सुरू नसल्याची स्पष्ट माहिती प्रशासन विभागाने दिली आहे. अलीकडे समाजमाध्यमांवर महानगरपालिकेत विविध पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू असल्याचे भासवणारी खोटी व दिशाभूल करणारी माहिती प्रसारित केली जात आहे. तसेच महापालिकेच्या नावाने बनावट नियुक्तीपत्रे, उमेदवारांची यादी देखील प्रसिद्ध केली जात आहे. परंतु महानगरपालिकेकडून भरती प्रक्रियेबाबत अद्याप कोणतेही अधिकृत आदेश अथवा सूचना जारी करण्यात आलेल्या नाहीत, अशी माहिती प्रशासन विभागाच्या वतीने देण्यात आली आहे. तथापि, बनावट जाहिराती व संदेशांच्या माध्यमातून नागरिकांची फसवणूक करण्याचा प्रयत्न होत असल्याच्या तक्रारी प्रशासन विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे नागरिकांनी अशा अप्रमाणित माहितीवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन महापालिकेच्या प्रशासन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. भरती प्रक्रियेबाबतची सर्व अधिकृत माहिती वेळोवेळी महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यामुळे इतर कोणत्याही माध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या माहितीवर विश्वास न ठेवता नागरिकांनी अधिकृत संकेतस्थळावर भेट देऊनच तिची खातरजमा करावी, असे आवाहन प्रशासन विभागाचे सहआयुक्त मनोज लोणकर यांनी केले आहे.

# पिंपरीत काँग्रेस आणि पुरोगामी संघटनांकडून भाजपचा तीव्र निषेध

पिंपरी (दै. संध्या) :




भाजपच्या गुंडांकडून पुण्यातील काँग्रेसभवन तसेच जनप्रबोधक नेते, कार्यकर्त्यांवर द्वेष भावनेतून होत असलेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ (दि.२४) पिंपरी चौकात आंदोलन करण्यात आले.

काँग्रेसचे प्रांतातध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्याचा विपर्यास करत सपकाळ यांना विरोध करण्यासाठी पुण्यात भाजपच्या कार्यकर्त्यांनी काँग्रेस भवन वर हल्ला केला दगडफेक केली आणि काल भाजपच्या विरोधात सातत्याने आणि सत्याने बाजू मांडणारे हनुमंत पवार यांच्यावर भाजपच्या गुंडांकडून हल्ला करण्यात आला या दोन्ही घटनांच्या निषेधार्थ आज भीमसृष्टी स्मारका समोर पिंपरी चौक येथे काँग्रेस पक्ष आणि शहरातील विविध पुरोगामी संघटनांनी संयुक्तरित्या भाजप विरोधी निषेध आंदोलन केले.

याप्रसंगी भाजप विरोधी जोरदार घोषणा देण्यात आल्या, हातामध्ये विविध आशयाचे मथळे बॅनर्स घेऊन कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले. हम सब हनुमंत पवार, विचारांची लढाई विचारांनी लढा, विचाराला हिंसेने थांबवता येत नाही, जेवढे हल्ले तेवढा आवाज बुलंद, अशा आशयाचे मथळे कार्यकर्त्यांच्या हातामध्ये होते.

याप्रसंगी अपना वतन संघटनेचे सिद्दिक शेख, जितेंद्र छाबडा, संभाजी ब्रिगेडचे पुणे जिल्हा अध्यक्ष प्रवीण कदम, ॲड. अशोक धायगुडे, संदेश पीटर जगताप, समरीन कुरेशी, शिक्षण मंडळाचे माजी सभापती अभिमन्यु दहितुले, मारुती भापकर, काँग्रेसचे प्रदेश सचिव अशोक मोरे आणि मानव कांबळे यांनी मनोगते व्यक्त केली.

याबाबत बोलताना काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष नरेंद्र बनसोडे म्हणाले, या भ्याड आल्यांवरून भाजपची घबराट उघड झाली आहे, काँग्रेस नेत्यांच्या वक्तव्यावर आणि काँग्रेस प्रवक्तांवर होत असलेल्या हल्ल्याने हे स्पष्ट दिसून येते आहे की भाजप ही आपली सत्ता जाईल परिवर्तन होईल या भीतीने घाबरून गेली आहे, म्हणून अशा परिवर्तनाची ताकत असलेल्या आणि सत्य समोर आणून भाजपचा खरा चेहरा उघड करणाऱ्या गोष्टींना ते तीव्र स्वरूपाचा विरोध करत आहेत वास्तविक पाहता भाजप आरएसएस आणि त्यांच्या मनुवादी संघटना कधीच सरळ सरळ लढाई लढू शकत नाहीत, ते कपटाने, धोक्याने, दग्याने, दिशाभूलीने कायम काम करतात, हनुमंत पवार यांच्याशी चर्चेमध्ये टिकण्याची हिंमत भाजपचे नेत्यांमध्ये नसल्याने त्यांची मुस्कटदाबी करण्यासाठी त्यांना घाबरवण्यासाठी हा प्रकार केला असल्याचे, तसेच अशा हल्ल्याने खचून न जाता उलट अजून जोमाने पवार आणि काँग्रेसचे कार्यकर्ते कामाला लागतील असे बनसोडे यांनी सांगितले.

मारुती भापकर म्हणाले, या शहरातील सामाजिक चळवळ अतिशय सक्रिय आहे या ठिकाणी महापुरुषांच्या बाबत चुकीचे वक्तव्य केल्या बाबत मंत्री चंद्रकांत पाटील यांना शाही फेक आंदोलनां द्वारे निषेध केला होता, या प्राप्त परिस्थितीत लातो के भूत बातो से नहीं मानते ही भूमिका देखील घेतली गेली पाहिजे, भाजप विरोधी राहुल गांधी सक्षम पणे लढत आहेत सर्वांनी त्यांना साथ देण्यासाठी एकत्र यावे अशी गरज सध्या देशात निर्माण झाली आहे. यापुढील काळात जसास तसे उत्तर देण्याची तयारी ठेवा, या प्रकरणी भाजपाचा जाहीर निषेध करतो असे ते म्हणाले.

ज्येष्ठ समाजसेवक आणि पुरोगामी चळवळीचे नेते मानव कांबळे म्हणाले, काँग्रेस भवन आणि हनुमंत पवार हल्ला या घडलेल्या घटना अतिशय अन्यायकारक आणि चीड निर्माण करणाऱ्या आहे की सत्य समोर आणले म्हणुन जीवघेणा हल्ला करायचा आणि दुसऱ्या बाजूला लहान लहान मुलींना शोषणासाठी वापरले जाते जीव घेतला जातो. त्या ठिकाणी एपस्टीन फाईल्स मध्ये अशा लोकांच्या बरोबर या नरेंद्र मोदी चे नाव आहे आणि हा नरेंद्र मोदी यांचा नेता आहे. त्या विषयावर ही सर्व गप बसतात हे मानवता शून्य कृती आहे. या अशा माणुसकी हीन काम करणाऱ्या लोकांची संघटना संस्था तिला भारतीय जनता पक्ष असं नाव दिलेला आहे. महात्मा गांधींच्या खुनाच्या कटा मध्ये सहभाग घेतला. त्यांचे आम्ही विरोध करणारच, आम्ही शिवराय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुलेंना मानतो आम्ही राजश्री शाहूंना मानतो म्हणून आमची वैचारिक लढाई आहे मात्र त्यात पराभव होत असल्याने ते दहशतीचा मार्ग घेत आहेत मात्र हेच त्यांना अधिक जोमाने संपुष्टात आणेल संविधान जिंकेल मनुवाद हरेल.

आंदोलनाचे आयोजन आणि प्रास्ताविक नरेंद्र बनसोडे यांनी केले. याप्रसंगी पुरोगामी चळवळीचे नेते ज्येष्ठ समाज सेवक मानव कांबळे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव अशोक मोरे, मारुती भापकर, काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष नरेंद्र बनसोडे, अल्पसंख्याक विभागाचे शहर अध्यक्ष शहाबुद्दीन शेख, महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे शहर अध्यक्ष संजय बारी, मनीषा पवार, NSUI च्या प्रदेश सचिव शितल उबाळे, अपना वतन संघटनेचे अध्यक्ष सिद्दिक शेख, हिराचंद जाधव, नीरज कडू, प्रदीप पवार, जितेंद्र छाबडा, उमेश बनसोडे, वीरेंद्र गायकवाड, शय्यान अन्सारी, गिरीश वाघमारे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## भोसरी येथे नागरिकांच्या सतर्कतेमुळे घरफोडी करणारा आरोपी जेरबंद

पिंपरी (दै. संध्या) :



घरफोडी करून पळ काढण्याच्या प्रयत्नात असलेल्या सराईत गुन्हेगाराला नागरिकांच्या सतर्कतेमुळे भोसरी पोलिसांनी अटक केली. ही कारवाई (दि.२२) रोजी सकाळी भोसरी परिसरात करण्यात आली. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, सागर सिंह सुरजसिंह उर्फ फंट्यासिंग बावरी (वय २७, रा. गुरू गोविंदसिंग नगर, जालना) याने त्याच्या साथीदारासह साईदर्शन सोसायटी, इंद्रायणीनगर येथील एका घराचे लॉक तोडून आत प्रवेश केला. घरातून सुमारे ५७,५०० रुपयांचा ऐवज चोरून ते दोघे पसार होत असताना काही नागरिकांना संशय आल्याने त्यांनी तत्काळ पोलिसांना कळविले. भोसरी पोलीस स्टेशनच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत आरोपी सागर सिंह याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून चोरीचा मुद्देमाल, घरफोडीसाठी वापरलेली साधने तसेच चोरीसाठी वापरलेली मोटारसायकल जप्त करण्यात आली. त्याचा साथीदार फरार असून त्याचा शोध सुरू आहे. या प्रकरणी भोसरी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता व महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक आरोपीवर यापूर्वीही जालना व नागपूर येथे अनेक घरफोडीचे गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. नागरिकांच्या तत्परतेमुळे घरफोडीचा गुन्हा उघडकीस येऊन आरोपी जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुहास खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## त्रिवेणी नगर सिग्नल परिसरात बेकायदेशीर रिक्षा थांब्यामुळे वाहतूक कोंडी

### तातडीने कारवाईची मागणी

पिंपरी-चिंचवड (दै. संध्या) :

त्रिवेणी नगर सिग्नल ते स्पाईन रोड दरम्यानच्या मुख्य चौकात बेकायदेशीर रिक्षा थांबा उभारण्यात आल्यामुळे परिसरात तीव्र वाहतूक कोंडी होत असल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात आली आहे. लोखंडी बोर्ड व फ्लेक्स लावून अनधिकृतपणे रिक्षा थांबा तयार करण्यात आला असून त्या ठिकाणी दररोज दहा ते पंधरा रिक्षा उभ्या राहत असल्याने रस्त्याची रुंदी कमी झाली आहे.

याशिवाय संबंधित चौकात टपरीधारक आणि हातगाडी धारकांनी रस्त्यावर अतिक्रमण केल्याने परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. परिणामी वाहनचालकांना तसेच पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असून वाहतूक व्यवस्थेवर ताण वाढला आहे. या संदर्भात सारथी हेल्पलाईन तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाकडे तक्रार दाखल करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. मात्र, अद्याप महानगरपालिका प्रशासन आणि वाहतूक पोलिसांकडून ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते सचिन काळभोर यांनी प्रशासनाकडे लेखी निवेदन देत तात्काळ कारवाईची मागणी केली आहे. "मुख्य चौकात बेकायदेशीर रिक्षा थांबा आणि अतिक्रमणामुळे नागरिकांना विनाकारण त्रास होत आहे. वाहतूक कोंडीमुळे अपघाताचा धोका निर्माण झाला असून प्रशासनाने तातडीने अतिक्रमण हटवून वाहतूक सुरळीत करावी," अशी मागणी त्यांनी केली आहे.



दरम्यान, परिसरातील नागरिकांनीही संबंधित अधिकाऱ्यांनी पाहणी करून बेकायदेशीर रिक्षा थांबा व अतिक्रमण हटवावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. प्रशासनाकडून लवकरच योग्य ती कारवाई होईल का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## अवैध गुटखा विक्रीबाबत आमदार शंकर जगताप यांनी केली विधानसभेत 'पोलखोल'

पिंपरी (दै. संध्या) :

■ आमदार जगताप यांच्या विधानसभेतील तारांकित प्रश्नानंतर धक्कादायक माहिती उघड

■ २०२५ मध्ये २३९ कोटी १० लाखांचा मुद्देमाल जप्त; ५ वर्षांत १८ हजार आरोपी गजाआड



राज्यात गुटखा, पानमसाला आणि सुगंधित तंबाखूवर कडक कायदेशीर बंदी असतानाही छुप्या मार्गाने विक्री आणि उत्पादन जोरात सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव आमदार शंकर जगताप यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नामुळे समोर आले आहे. गेल्या पाच वर्षांत पोलीस प्रशासनाने १३ हजार ७८३ गुन्हे दाखल करत तब्बल १८ हजार ५०१ आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. एकट्या २०२५ या वर्षात तब्बल २३९ कोटी १० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आमदार जगताप यांनी हा मुद्दा उपस्थित केल्यामुळे नाशिक, ठाणे आणि अहिल्यानगरमधील कोट्यवधींच्या गुटखा तस्करीचे धागेदोरे समोर आले आहेत. दरम्यान नाशिक आणि ठाणे जिल्ह्यात मोठ्या कारवाया करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. राज्यात २० जुलै २०१२ पासून दरवर्षी गुटखाबंदीचे आदेश नूतनीकरण केले जातात. सध्याच्या अधिसूचनेनुसार, राज्यात गुटखा उत्पादन, साठा, वितरण आणि वाहतुकीवर पूर्णतः बंदी आहे. मात्र तरीही मुंबई ,ठाणे, पालघर, छत्रपती संभाजीनगर, जालना, नांदेड, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यात अवैधरीत्या गुटख्याचे उत्पादन व विक्री सुरु असल्याचे आमदार शंकर जगताप यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले. दरम्यान याचे लोन अनेक शहरांमध्ये देखील पसरत आहे. याचा धागा जोडत आमदार जगताप यांनी तारांकित प्रश्नांच्या (क्रमांक २३१२७) माध्यमातून गुटखाबंदीचा ढिसाळपणा शासनाच्या निदर्शनास आणून दिला. गुटखाबंदी संदर्भात राज्य शासनाकडून कोणती उपाययोजना केली जात आहे. याची विचारणा देखील त्यांनी केली. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या पाच वर्षांतील पोलीस कारवाईची सांख्यिकी सादर केली. अन्न सुरक्षा व मानके कायद्या'नुसार दोषींवर कारवाई सुरू आहे यात सातत्य राखले जाईल असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

## डॉ. राम पाटील यांच्या सेवाभावी कार्याचा 'अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन' कडून गौरव

पिंपरी (दै. संध्या) :

वैद्यकीय क्षेत्रात आपल्या कौशल्यपूर्ण उपचार पद्धतीसह माणुसकीची जपणूक करत रुग्णांच्या मनात विश्वास निर्माण करणारे केअर क्युब कॅन्सर सेंटरचे डायरेक्टर डॉ. राम पाटील यांचा 'अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन' (AMS), पुणे यांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. "यश केवळ पदव्यांनी मिळत नाही, तर ते रुग्णांच्या डोळ्यांतील समाधानाने मिळते," या विचारांची प्रचिती डॉ. पाटील यांनी आपल्या सेवाभावी कार्यातून दिली आहे. कॅन्सरग्रस्त रुग्णांना योग्य मार्गदर्शन, अत्याधुनिक उपचार आणि मानसिक आधार देत त्यांनी अनेक कुटुंबांना आशेचा किरण दिला आहे. त्यांच्या या निस्वार्थ रुग्णसेवेची दखल घेत फाउंडेशनच्या वतीने त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट देऊन सन्मानित करण्यात आले. याच कार्यक्रमात फाउंडेशनच्या वतीने कॅबिनेट मंत्री भरणे (मामा) यांच्या पत्नी सौ. सारिकाताई दत्तात्रय भरणे (मामी) यांची सदिच्छा भेट घेण्यात आली. त्यांनाही शिवप्रतिमा भेट देऊन सन्मानित करण्यात आले. या भेटीदरम्यान 'अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन'च्या विविध सामाजिक उपक्रमांवर सविस्तर चर्चा झाली. सौ. सारिकाताई भरणे यांनी फाउंडेशनच्या कार्याचे मनापासून कौतुक करत समाजातील गरजू घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांना भविष्यात पूर्ण सहकार्य व मदत करण्याचे आश्वासन दिले.

# सांगवीत भरली भव्य 'पवनाथडी' जत्रा..!

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या वतीने महिला बचत गटांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'पवनाथडी' जत्रेचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम २५ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. या जत्रेचे उद्घाटन २५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. महापालिकेच्या समाज विकास विभागाच्या वतीने सांगवी येथील पी.डब्ल्यू.डी. मैदानावर आयोजित या उपक्रमात नागरिकांना खरेदीसोबतच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी अनुभवता येणार आहे. महिला बचत गटांनी तयार केलेल्या खाद्यपदार्थांचे तसेच विविध उपयुक्त वस्तूंचे स्वतंत्र स्टॉल्स येथे उभारण्यात आले असून, या माध्यमातून महिला उद्योजकतेला चालना मिळणार आहे. यासोबतच स्थानिक उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. या उपक्रमात महिला बचत गटांनी निर्मित केलेल्या विविध वस्तू, खाद्यपदार्थ आणि पारंपरिक हस्तकलेचे प्रदर्शन नागरिकांसाठी खुले राहणार आहे. शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले आहे.




या कार्यक्रमास केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. तसेच राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

याशिवाय खासदार मेधा कुलकर्णी, सुप्रिया सुळे, श्रीरंग आप्पा बारणे, डॉ. अमोल कोल्हे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, महेश लांडगे, शंकर जगताप, शंकर मांडेकर, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे, महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्यासह महापालिकेच्या उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर तसेच नगरसदस्य,नगरसदस्या आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, समाज विकास विभागाच्या उपायुक्त ममता शिंदे , शहरातील नगरसदस्य, नगरसदस्या तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहणार आहेत.

### पवनाथडी जत्रेत होणारे सांस्कृतिक कार्यक्रम

(सर्व कार्यक्रम सायंकाळी ६ वाजता सुरु होणार आहेत.)
२५ फेब्रुवारी – 'महाराष्ट्राची मराठी बाणा'
२६ फेब्रुवारी – सुप्रसिद्ध होम मिनिस्टर कार्यक्रम
२७ फेब्रुवारी – ऑर्केस्ट्रा म्युझिकल स्टार्स,
२८ फेब्रुवारी – 'फोक संस्कृती'
१ मार्च – द फोक लावणी'

## थोडक्यात पण महत्वाचे...

### अबॅकसच्या राष्ट्रीय स्पर्धेत हृदया आहेरकर उपविजेती




चाकण (दैनिक संध्या) : आंतरराष्ट्रीय अबॅकस गणित महामंडळ, तैवान व भारत, सारा अबॅकस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या अबॅकसच्या अठराव्या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये येथील हृदया अनिल आहेरकर ही देश पातळीवर विभागीय स्तरावर उपविजेती ठरली. भारत देशातून ५० विभागांमध्ये चार हजार पेक्षा अधिक विद्यार्थी या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते. चाकण येथील सारा अबॅकस अकॅडमी मधून या स्पर्धेमध्ये ८४ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यामध्ये हृदया उपविजेती ठरली. त्याबद्दल तिचा आंतरराष्ट्रीय अबॅकस गणित महामंडळाच्या अध्यक्षा डॉ. अर्चना प्रविण आघाव व प्राचार्य प्रवीण आघाव यांच्या हस्ते सन्मानपत्र व गौरवचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. हृदया ही वासुली फाटा येथील सामाजिक कार्यकर्ते अनिल आहेरकर व पूजा आहेरकर यांची कन्या आहे. आई वडिलांची प्रेरणा, चिकाटी, मेहनत शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे मला हे उत्तुंग यश मिळाले असल्याचे हृदया हिने आवर्जून सांगितले. हृदया हिच्यावर चाकण पंचक्रोशीतून सर्वच स्तरातून कौतुकांचा वर्षाव होत आहे.

### महाळुंगे इंगळे एमआयडीसीत गांजा विक्री करणाऱ्यास अटक

चाकण (दैनिक संध्या) : चाकण औद्योगिक वसाहतीतील महाळुंगे इंगळे येथे गांजा व अमली पदार्थाची विक्री करणाऱ्या एका परप्रांतीय तरुणाला महाळुंगे पोलिसांनी अटक केली. चंदन मंजीत सिंह (वय - २२, मूळ रा. बलिया, उत्तर प्रदेश) असे अटक करण्यात आलेल्या परप्रांतीय गांजा विक्रेत्याचे नाव आहे. अधिक माहिती अशी की, चंदन हा कोणाला कसलाच थांगपत्ता लागू न देता महाळुंगे इंगळे येथील सदगुरू मिसळ हॉटेल जवळील मोकळ्या जागेत संशयास्पदरित्या वावरत असल्याची माहिती पोलीस जवान महेश गायकवाड यांना एका खबऱ्याकडून मिळाली होती. पोलिसांनी संबंधित ठिकाणी सापळा रचून चंदन याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे ४४ हजार ५०० रुपये किमतीचा ८८४ ग्रॅम वजनाचा गांजा मिळून आला. चंदन याला अमली पदार्थांसह ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे. सिंह याने हा माल कोणाकडून आणला आणि तो कोणाला विकणार होता याचा अधिक तपास महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस करत आहेत.

### कुरुळी येथील गावठी दारूचा अड्डा उध्वस्त

चाकण (दैनिक संध्या) : ग्रामीण भागात अवैध धंद्यांविरोधात पोलिसांनी मोहीम तीव्र केली असून खेड तालुक्यातील कुरुळी येथील घाडगे वस्ती परिसरात असलेल्या ओढ्याकाठी पोलिसांनी मोठी कारवाई केली. झाडाझुडपांच्या आडोशाने रोहित राठोड हा इसम गावठी हातभट्टी दारू तयार करत आल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तिथे छापा टाकून गावठी दारूचा अड्डा उध्वस्त केला. पोलिसांनी घटनास्थळावरून ५ हजार ५०० लिटर कच्चे रसायन आणि १०५ लिटर तयार दारू असा एकूण २ लाख ८५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांना पाहताच राठोड हा घटनास्थळावरून गायब झाला आहे. अधिक तपास सुरू आहे.

### खराबवाडी येथे गुरुवारी बाधित शेतकऱ्यांची समन्वय बैठक

चाकण (दैनिक संध्या) : चाकण तळेगाव रस्ता हिंगणे (सारा) चौक खराबवाडी ते चाकण औद्योगिक वसाहत टप्पा क्रमांक ३ येथील प्रस्तावित रस्त्याची भूसंपादन प्रक्रिया पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सुरू आहे. या रस्त्याच्या जागेच्या मोजणी दरम्यान काही बाधित शेतकऱ्यांनी हरकती उपस्थित केल्या आहेत. त्या समस्या जाणून घेण्यासाठी व शेतकऱ्यांचे समुपदेशन करण्याकरिता खराबवाडी ग्रामपंचायतीच्या वतीने खराबवाडी येथे गुरुवारी (दि.२६) सकाळी ११ वाजता येथील हनुमान मंदिरात समन्वय बैठक आयोजित करण्यात आली आहे, तरी या बैठकीला हरकती घेतलेल्या बाधित शेतकऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन ग्रामपंचायत अधिकारी नीलिमा जाधव व प्रशासक एस. एस. साळुंके यांनी केले आहे.

### चाकण नगरपरिषदेच्या अर्थसंकल्पास मंजुरी

चाकण (दैनिक संध्या) : चाकण नगरपरिषदेच्या सन २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पास तसेच २०२५-२०२६ च्या सुधारित अर्थसंकल्पास मंजुरी देण्यासाठी नगराध्यक्षा मनीषा सुरेशभाऊ गोरे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. सदर अर्थसंकल्प मुख्याधिकारी डॉ.अंकुश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली लेखा विभागामार्फत सादर करण्यात आला व तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला. नगर परिषदेमार्फत नागरिकांना सुविधा देण्याकरिता शासनाचे भांडवली योजना तसेच सर्व विभागांमार्फत प्राप्त सूचना लक्षात घेऊन सदर अर्थ संकल्प सादर करण्यात आला. नाली दुरुस्ती, नवीन रस्ते व विद्युत व्यवस्था यावर तत्परतेने कार्यवाही करण्याच्या सुचना संबंधित विभागांना देण्यात आल्या. तसेच जिल्हा वार्षिक योजनांच्या प्रलंबित कामांवर चर्चा करण्यात आली. चाकण नगरपरिषदेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा संबंधित शुल्क वाढीसाठी प्रस्ताव ठेवण्यात आले आहेत. सदर शुल्कवाढ नगर परिषदेच्या उत्पन्न वाढीसाठी अत्यंत आवश्यक असले तरी प्रस्तावित शुल्कवाढ जास्त असल्या कारणाने त्यात उचित वाढ करावी असे सर्वानुमते चर्चेअंती ठरले. वरील सर्व सूचनांना अध्यक्षांनी सकारात्मक प्रतिसाद देत सन २०२६-२०२७ च्या शिलकी अर्थसंकल्पास तसेच २०२५-२०२६ च्या सुधारित अर्थसंकल्पास सर्वानुमते मान्यता देण्यात आली आहे.



# राष्ट्रीय शिष्यवृत्ती परीक्षेत जिजामाता विद्यालयाची उज्ज्वल कामगिरी

**जेजुरी (दै. संध्या)**

**३७ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली राष्ट्रीय शिष्यवृत्ती परीक्षा (NMMS) दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी पार पडली होती. या परीक्षेचा अंतरिम निकाल नुकताच जाहीर झाला असून, त्यामध्ये जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जेजुरी या विद्यालयाचे ३७ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी झाले आहेत.

या उल्लेखनीय यशामध्ये केतन भगत (१४५ गुण) याने प्रथम क्रमांक पटकावला असून त्यानंतर सान्वी गाढवे (१२०), पुशाम अवंती (११४), विश्वराज पवार (११३), आर्या राणे (११३), प्रेमराज बांदल (१११), असद शेख (१०६), सई राणे (१०४), स्नेहल शेरे (१०४), अलिशा शेख (१०३), पवार प्रज्ञा (१०३), आर्यन ताकवले (१०३) व पृथ्वीराज कांबळे (१००) यांच्यासह एकूण ३७ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. या विद्यार्थ्यांना विद्यालयाचे राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त प्राचार्य मा. नंदकुमार सागर सर, पर्यवेक्षिका लीना पायगुडे, माध्यमिक विभाग प्रमुख बाळासाहेब जगताप, शाळा समन्वयक प्रल्हाद गिरमे, तसेच शिष्यवृत्ती परीक्षा विभाग प्रमुख पांडुरंग आटोळे (गणित व बुद्धिमत्ता), सारिका कामथे (विज्ञान) आणि सागर चव्हाण (सामाजिक शास्त्र) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा मा. श्रीमती आनंदीकाकी जगताप, सचिव आमदार संजय जगताप, डॉ. राजेंद्र (बापूसाहेब) जगताप, संस्थापक सचिव सी.ए. डॉ. एम. एस. जाधव, सहसचिव डी. एन. गवळी, व्यवस्थापक कानिफनाथ आमराळे व रवींद्र पंत जगताप यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.




## छोटी गुंतवणूक भविष्यात मोठी स्वप्ने पूर्ण करू शकते : पवन चरेजा

**शिरूर (दै. संध्या)**

वेळेत सुरू केलेली छोटी गुंतवणूक भविष्यात मोठी स्वप्ने पूर्ण करू शकते. मात्र गुंतवणूक करताना स्वतःची आर्थिक क्षमता, उद्दिष्टे आणि जोखमीची तयारी लक्षात घेऊन एकाच पर्यायात पैसे न गुंतवता विविध पर्यायांचा समतोल साधणे आवश्यक आहे, असा सल्ला कंपनी सेक्रेटरी पवन चरेजा यांनी दिला. येथील सनशाईन सॅटर्डे क्लबच्या वतीने ‘ आर्थिक नियोजन व गुंतवणुकीचे पर्याय’ या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष तथा क्लबचे अध्यक्ष किशोरराजे निंबाळकर, माजी मुख्य अभियंता ज्ञानेश्वर जामदार, पोलीस निरीक्षक संदेश केंजळे,नगरसेविका पूजा पोटावळे, प्रा. चैतन्य वाघ, माजी ग्रंथपाल राजाभाऊ वाघ आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन कृषी अधिकारी झालेल्या अपूर्वा ज्ञानदेव चव्हाण यांचा सन्मान निंबाळकर यांच्या हस्ते करण्यात आला. चरेजा यांनी सांगितले की, कोणतीही गुंतवणूक करताना महागाईच्या दरापेक्षा अधिक परतावा मिळणे अत्यावश्यक आहे. केवळ बचत करून भागत नाही, तर त्या बचतीवर योग्य परतावा मिळेल याची दक्षता घ्यावी लागते. गुंतवणूक ही अल्पकालीन नव्हे तर दीर्घकालीन दृष्टीकोनातून करावी लागते. त्यासाठी संयम, सातत्य आणि नियोजन या तीन बाबी महत्त्वाच्या आहेत, असे त्यांनी नमूद केले.

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात ‘निर्भय कन्या’ कार्यशाळा संपन्न

**बारामती (दै. संध्या)**

प्रत्येकाच्या जीवनात योगाला अनन्यसाधारण महत्व आहे. सर्व समस्यांवर योग हे सोल्युशन आहे. श्वास, शरीर, विचार, मन यांची सांगड घालून निर्माण केलेली कृती म्हणजे योग. योगामुळे आपले आयुष्य सुंदर बनते असे प्रतिपादन शितल पराडे जगदाळे, योग प्रशिक्षक मिड ब्रेन ॲक्टिव्हेशन ट्रेनर, बारामती यांनी केले. त्यांनी प्रात्यक्षिकाद्वारे योगाचे महत्व सांगितले. 'आपण जसे आहोत तसे स्वीकारणे करणे' या मंत्र देखील त्यांनी 'योग आणि मी' या विषयावर बोलताना दिला. सबलीकरणाच्या टप्प्यावर समाजात महिला व मुली सुरक्षित असल्या पाहिजेत. ज्या समाजात महिला सुरक्षित असतील, तो समाज निकोप असल्याचे ते एक लक्षण असते असे प्रतिपादन त्यांनी केले. ही कार्यशाळा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या, विद्यार्थी विकास मंडळ व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. मुलींची सुरक्षितता हा कार्यशाळेचा विषय होता.




उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत कार्यशाळा समन्वयक डॉ.सुनंदा शेळके यांनी केले. यावेळी त्यांनी या कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका मांडली. विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. भगवान माळी हे आवर्जून उपस्थित होते. पाहुण्यांचा परिचय सौ.सुषमा संगई, व प्रा.प्राजक्ता कुलकर्णी यांनी करून दिला. आभार प्रा.प्रीती भोसले यांनी मानले तर सूत्रसंचालन डॉ.मेघा बडवे यांनी केले. ही कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश जगताप यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. तर समितीतील सर्व सदस्य यांनी कार्यशाळा आयोजित करण्यासाठी सहकार्य केले. या कार्यशाळेत सुमारे १५० विद्यार्थिनींनी आपला सहभाग नोंदवला.

या कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.सचिन गाडेकर यांनी केले. अध्यक्षीय भाषणात बोलतांना ते म्हणाले की, विद्यार्थिनींनी आपल्या आजूबाजूच्या सर्व परिस्थिती बद्दल जागरूक असणे आवश्यक आहे. धैर्य बाळगले पाहिजे, अविरत संघर्ष करण्याची तयारी देखील असली पाहिजे. शारीरिकदृष्ट्या सुदृढ असणे, साक्षर असणे, अनुभव इ. बाबी निर्भय बनण्यासाठी गरजेच्या आहेत, धाडसाने खंबीरपणे, कोणाच्याही मदतीशिवाय सामोरे जाण्याचे बळ येणे गरजेचे आहे. त्यांनी स्वतःला कधीही कमी समजू नये. स्वतःसाठी वेळ दिला पाहिजे असे मत त्यांनी मांडले. मुली जोपर्यंत न्याय आणि समता यांचे अर्थ व महत्व समजून घेत नाहीत, तोपर्यंत त्यांचा आत्मविश्वास वाढणार नाही. मुली अथवा महिलांवर होणारे अत्याचार, हिंसा यामध्ये आपल्याच जवळची, विश्वासातली अथवा ओळखीची व्यक्ती असते. त्यामुळे मुलींनी सजग असणे गरजेचे आहे.

या कार्यशाळेसाठी शिवानी गणेश कदम, मुख्य प्रशिक्षक, बारामती गैंसीयु, कराटे, बारामती बारामती यांनी संकट प्रसंगी कशा पद्धतीने स्वसंरक्षण करावे कराटे ची प्रात्यक्षिके विद्यार्थी विद्यार्थिनींच्या मदतीने करून दाखवली. विद्यार्थिनींशी संवाद साधला. यावेळी बोलतांना त्या म्हणाल्या की, स्त्रीला तिच्या स्त्रीत्वावर हल्ला होईल याची सर्वाधिक भीती असते. मुली जोपर्यंत निर्भय होणार नाहीत, तोपर्यंत त्यांचा आत्मविश्वास वाढणार नाही. त्यांनी यावेळी सांगितले.

## राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धेत पूर्वी शिंदे हिचा प्रथम क्रमांक

**चाकण (दै. संध्या)**

पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय पुणे विभाग आणि किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने चाकण येथे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत एस. पी. देशमुख शिक्षण संस्थेच्या येथील विद्याव्हॅली इंटरनॅशनल स्कूल मधील इयत्ता सहावी मधील विद्यार्थिनी पूर्वी विकास शिंदे हिचा प्रथम क्रमांक आला.

आंतरशालेय वकृत्व स्पर्धेत सांगली, सातारा, पुणे, अहिल्यानगर आदी जिल्ह्यांतील सुमारे ७० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी व राष्ट्रभक्तीपर विषय देण्यात आले होते. त्यामध्ये भारतीय संस्कृती संजीवक छत्रपती शिवाजी महाराज, शहाजी महाराज एक ध्येयवादी पिता, आई तू जिजाऊ हो, उज्वल उद्यासाठी दुर्गसंवर्धन व शौर्यभूमी श्री संग्रामदुर्ग शिवसंस्कार केंद्र व्हावे, या विषयांचा स्पर्धेत समावेश होता, असे अॅड. किरण झिंजुरके यांनी सांगितले.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे: -प्रथम क्रमांक पूर्वी विकास शिंदे, विद्याव्हॅली इंटरनॅशनल स्कूल, चाकण हिचा आला आहे.

द्वितीय क्रमांक सक्षम संजय मानकर अॅड. बापूसाहेब भोंडे हायस्कूल, लोणावळा यांचा आला आहे. तृतीय क्रमांक प्रणव शशिकांत जाधव, छत्रपती शिवाजी विद्यालय, दुधोंडी, ता. पलूस, जि. सांगली याचा आला आहे. उत्तेजनार्थ पारितोषिक श्रावणी कैलास तीवरासे, आर्या निलेश शिवेकर व आराध्य विजय कराळे यांना देण्यात आले. सर्वोत्कृष्ट मार्गदर्शक शिक्षक म्हणून गणेश राघू जाधव, मंगळेश्वर विद्यालय, मंगळापूर आणि सर्वोत्कृष्ट मार्गदर्शक मुख्याध्यापक म्हणून सुप्रिया रोहिदास गुंजाळ, मा. रु. दा. मालपाणी विद्यालय, संगमनेर यांना सन्मानित करण्यात आले. एका शाळेच्या दोन्ही स्पर्धकांचे मिळून एकूण गुण सर्वाधिक असलेल्या शाळेसाठी असलेला कै. दशरथराव अर्जुनराव झिंजुरके यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा श्री संग्रामदुर्ग चषक श्री शिवाजी विद्यामंदिर, चाकण या शाळेला प्रदान करण्यात आला. विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण धर्मवीर संभाजी महाराज प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ हिंदुत्ववादी मिलिंद एकबोटे, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, पुणे विभागाचे सहाय्यक संचालक डॉ. विलास वाहणे, किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानचे अध्यक्ष अॅड. किरण झिंजुरके यांच्या हस्ते करण्यात आले. सर्व विजेत्यांचे स्वागत एस. पी. देशमुख शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष साहेबराव देशमुख, संस्थेचे अध्यक्ष शामराव देशमुख, खजिनदार रोहिणी देशमुख आदींनी केले. स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानचे अध्यक्ष अॅड. किरण झिंजुरके व सर्व किल्लेदारांनी विशेष परिश्रम घेतले.



# माहूर विद्यालयात सौरऊर्जा प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा

**काळदरी (दै. संध्या)**

■ अक्षय ऊर्जेचा स्वीकार करणे काळाची गरज - अॅड. वृषाली दातार




स्नेहांकूर द रे ऑफ होप पुणे व रिम्यूनन्स सर्व्हीसेस प्रा. लि. पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने माहूर माध्यमिक विद्यालय माहूर, ता. पुरंदर जि पुणे या माध्यमिक विद्यालयात आज मंगळवार दि. 24/02/2025 रोजी सौरऊर्जा प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात व जल्लोषपूर्ण वातावरणात संपन्न झाला. पर्यावरणपूरक ऊर्जा वापर आणि ऊर्जा स्वावलंबनाचा संदेश देणारा हा उपक्रम विद्यालयासाठी तसेच परिसरासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे. या प्रकल्पामुळे विद्यालयाच्या वीज गरजा मोठ्या प्रमाणात भागविण्यात येणार असून पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने ठोस पाऊल उचलण्यात आले आहे.कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री हनुमंत पवार यांनी प्रास्ताविकातून सौरऊर्जा प्रकल्पाची संकल्पना, त्यामागील उद्दिष्टे आणि भविष्यातील फायदे यांची सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, विद्यालयाच्या इमारतीवर बसविण्यात आलेल्या सौर पॅनेलद्वारे दररोज लक्षणीय प्रमाणात वीज निर्मिती होणार असून त्यामुळे वीज खर्चात बचत होईल. बचत झालेला निधी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सोयीसुविधांसाठी वापरण्यात येणार आहे.प्रकल्पाबद्दल अॅड . वृषाली दातार यांनी सौरऊर्जा प्रणालीची तांत्रिक माहिती सादर करताना पॅनेलची क्षमता, इन्व्हर्टर प्रणाली, सुरक्षा उपाययोजना आणि देखभाल प्रक्रिया याविषयी मार्गदर्शन केले. या माध्यमातून विद्यार्थ्यांना अक्षय ऊर्जेबाबत प्रत्यक्ष ज्ञान मिळणार असून विज्ञान व पर्यावरण विषयांबाबत अधिक जागरूकता निर्माण होणार आहे.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते फीत कापून सौरऊर्जा प्रकल्पाचे औपचारिक लोकार्पण करण्यात आले. आपल्या मनोगतात त्यांनी सौरऊर्जेचे वाढते महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, आजच्या काळात शाश्वत विकासासाठी अक्षय ऊर्जेचा स्वीकार करणे अत्यंत गरजेचे आहे. विद्यालयाने घेतलेला हा पुढाकार इतर संस्थांसाठीही प्रेरणादायी ठरेल, असे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी ऊर्जा बचत, पर्यावरण संरक्षण आणि स्वच्छतेचा संदेश समाजात पोहोचवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमात शिक्षकवृंद, पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षणावर आधारित घोषवाक्ये सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

विद्यालयाने राबविलेल्या या सौरऊर्जा प्रकल्पामुळे केवळ वीज निर्मितीच नव्हे, तर पर्यावरणाबद्दलची जबाबदारी आणि ऊर्जा बचतीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचा प्रयत्न केला आहे. हा उपक्रम भविष्यातील पिढ्यांसाठी स्वच्छ, सुरक्षित आणि शाश्वत पर्यावरण निर्माण करण्याच्या दिशेने एक आदर्श पाऊल ठरला आहे. कार्यक्रमासाठी प्रमूख पाहुणे म्हणून स्नेहांकूर द रे ऑफ होप पुणे या संस्थेच्या अध्यक्षा अॅड. वृषाली दातार, जयप्रकाश दातार, अभिजित दातार व श्रीराम फडके उपस्थित होते .विद्यालयातील शिक्षक इंद्रभान पठारे, विकास राऊत, स्नेहलता टिळेकर, लता गायकवाड, रामचंद्र जगताप, मंगल जगताप, श्रीकांत खोमणे, श्रीकांत गव्हाणे, रामभाऊ कुंभार व विद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेंद्र भोसले यांनी तर आभार स्नेहांकुर द रे ऑफ होप या संस्थेचे समन्वयक व पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष रामप्रभू पेटकर यांनी मानले शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा शेवट करण्यात आला.



# ग्रेट निकोबार : निर्णायक प्रकल्प

(दै. संध्या)

ग्रेट निकोबार मेगा इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्प हा भारताच्या सागरी शक्ती, आर्थिक वाढ आणि भूराजकीय धोरणांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. राष्ट्रीय हरित लवादाने (NGT) अलीकडेच या प्रकल्पाविरोधातील याचिका फेटाळून लावल्याने त्याच्या अंमलबजावणीचा मार्ग अधिक मोकळा झाला आहे. पर्यावरणीय मंजुरी प्रक्रियेत आवश्यक खबरदारी घेतल्याचे निरीक्षण नोंदवत लवादाने या प्रकल्पाच्या धोरणात्मक महत्त्वाचीही दखल घेतली. अंदाजे ८० ते ९० हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा हा प्रकल्प भारतासाठी दीर्घकालीन दृष्टीने गेमचेंजर ठरण्याची शक्यता व्यक्त केली जाते.

**प्रकल्पाचा व्यापक आवाका**

सुमारे १६६ चौरस किलोमीटर क्षेत्रात उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पामध्ये आंतरराष्ट्रीय ट्रान्सशिपमेंट बंदर, नागरी व लष्करी वापरासाठी विमानतळ, एकात्मिक टाऊनशिप आणि ४५० मेगावॅट क्षमतेचा सौर व वायूऊर्जेवर आधारित ऊर्जा प्रकल्प यांचा समावेश आहे. या सर्व सुविधांमुळे ग्रेट निकोबार बेटाचे रूपांतर जागतिक दर्जाच्या लॉजिस्टिक आणि सागरी केंद्रात होण्याची अपेक्षा आहे.

या प्रकल्पाचा केंद्रबिंदू म्हणजे गॅलाथिया बे येथील आंतरराष्ट्रीय कंटेनर ट्रान्सशिपमेंट पोर्ट. जागतिक जहाज वाहतुकीमध्ये भारताची भूमिका मजबूत करणे, परदेशी बंदरांवरील अवलंबित्व कमी करणे आणि हिंद महासागरातील महत्त्वाच्या सागरी मार्गांवर भारताचे स्थान बळकट करणे हे या बंदराचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**भौगोलिक स्थानाची रणनीतिक ताकद**

ग्रेट निकोबार बेटाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे स्थान. पोर्ट ब्लेअरपासून सुमारे ५२० किलोमीटर अंतरावर असलेले हे बेट मलक्का सामुद्रधुनीपासून अवघ्या ४० समुद्री मैलांवर आहे. मलक्का सामुद्रधुनी हा हिंद महासागर आणि पॅसिफिक महासागराला जोडणारा जगातील सर्वात व्यस्त सागरी मार्गांपैकी एक आहे. जागतिक व्यापाराचा मोठा हिस्सा आणि चीनसारख्या देशांची ऊर्जा आयात या मार्गावरून होते.

कोलंबो, सिंगापूर आणि पोर्ट क्लांग यांसारख्या प्रमुख बंदरांपासून जवळ असल्याने भारताला या मार्गावर स्वतःची मजबूत उपस्थिती निर्माण करण्याची संधी मिळते. सध्या भारतातील बहुतांश ट्रान्सशिपमेंट माल परदेशी बंदरांवरून हाताळला जातो. ग्रेट निकोबार प्रकल्पामुळे हा प्रवाह भारताकडे वळवता येऊ शकतो.

**आर्थिक आणि लॉजिस्टिक फायदे**

भारताच्या उत्पादन आणि निर्यात क्षेत्राला स्पर्धात्मक बनवण्यासाठी मजबूत लॉजिस्टिक व्यवस्था आवश्यक आहे. मोठ्या कंटेनर जहाजांना थेट भारतात थांबता येईल, अशी बंदरे कमी आहेत. गॅलाथिया बेची नैसर्गिक खोली २० मीटरपेक्षा अधिक असल्यामुळे जगातील मोठ्या जहाजांना येथे सहज थांबता येईल.

यामुळे मालाची वाहतूक वेळ आणि खर्च कमी होईल, तसेच बंदर शुल्क आणि संबंधित महसूल भारतातच राहील. पुढील काही दशकांत या बंदराची क्षमता लाखो कंटेनर हाताळण्यापर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे भारत जागतिक पुरवठा साखळीत अधिक प्रभावी भूमिका बजावू शकतो.

**राष्ट्रीय सुरक्षेचा महत्त्वाचा पैलू**

ग्रेट निकोबार प्रकल्प केवळ आर्थिक नाही, तर राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचा आहे. नागरी आणि लष्करी वापरासाठीचे विमानतळ, सागरी निरीक्षण क्षमता आणि हिंद महासागरातील रणनीतिक उपस्थिती यामुळे भारताची सुरक्षा प्रणाली अधिक मजबूत होईल. चीनसारख्या देशांनी सागरी पायाभूत सुविधांच्या माध्यमातून आपले वर्चस्व वाढवले आहे. त्याच धर्तीवर भारतही सागरी रणनीती मजबूत करण्याच्या दिशेने पावले उचलत आहे.

**'अ‍ॅक्ट ईस्ट' धोरणाला चालना**

भारताचे 'अ‍ॅक्ट ईस्ट' धोरण दक्षिण-पूर्व आशियाशी व्यापार आणि सहकार्य वाढवण्यावर आधारित आहे. ग्रेट निकोबार बंदर या धोरणाचा महत्त्वाचा दुवा ठरू शकतो. भारताला प्रादेशिक व्यापार केंद्र म्हणून उभे राहण्यासाठी आणि जागतिक पुरवठा साखळीत स्वतःचे नियंत्रण वाढवण्यासाठी या प्रकल्पाची मोठी भूमिका असेल.

**पर्यावरणीय चिंता आणि आव्हाने**

या प्रकल्पाविरोधातील सर्वात मोठा मुद्दा म्हणजे पर्यावरण. अंदाजे लाखो झाडे तोडली जाण्याची शक्यता असून हे क्षेत्र पावसाळी जंगलांनी समृद्ध आहे. गॅलाथिया बे हे लेदरबॅक कासवांच्या प्रजननाचे महत्त्वाचे ठिकाण आहे. तसेच प्रवाळ भिंती, दुर्मीळ वन्यजीव आणि स्थानिक जैवविविधता यावरही परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जाते.

सरकारने प्रवाळांचे संरक्षण, पर्यायी वृक्षारोपण आणि जैवविविधतेचे संवर्धन यांसाठी उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले आहे; मात्र पर्यावरणवाद्यांच्या मते, मूळ जंगलांची हानी भरून काढणे शक्य नाही.



# पुढच्यास दंड, मागचा शहाणा!

(दै. संध्या)

शिस्त वा नियम पाळणे हा संस्कारांचा सुद्धा भाग असतो. परंतु, कधी कधी ती लावण्यासाठी कठोर नियमावली आवश्यकच असते.

रस्त्यावर आणि विशेषतः सिग्नलवर नियमभंग करणाऱ्यांना 'तिसऱ्या डोळ्या'ने आवर घालायला सुरुवात केली अन् नाशिकमध्ये एकच गहजब उडाला. 'ई-चलान' ठोठावण्याचा प्रायोगिक तत्त्वावरील प्रकल्प ठराविक सिग्नल्सवर सुरू झाल्यानंतर पहिल्या आठ तासांत सुमारे १७ हजार वाहनचालकांनी सिग्नल 'ब्रेक' केल्याचे आढळले. म्हणजे ताशी दोन हजारपेक्षा अधिक, तर दर मिनिटाला सुमारे तेहतीस लोकांनी वाहतूक नियमांना बगल दिली. आठ दिवसांत असे अडीच लाख वाहनचालक हुडकून काढले गेले. एकट्या नाशिक शहरात अवघ्या काही तासांत अशी स्थिती दिसत असेल, तर राज्याचा आकडा किती मोठा असू शकेल? सविनय कायदेभंग चळवळीचा देशाला मोठा इतिहास असल्याने की काय, लोक आजही असा 'कायदेभंग' करीत असावेत! वाहनधारकांच्या विनयाबद्दल मात्र अधिक न बोललेलेच बरे!!

महापालिका निवडणुकीपूर्वी 'नाशिक जिल्हा, कायद्याचा बालेकिल्ला' या मोहिमेने अचानक प्रसिद्ध पावलेल्या नाशिक पोलिसांचा आत्मविश्वास उंचावलेला दिसतो. आता त्यांनी बेशिस्त वाहनचालकांना वठणीवर आणण्याचा विडा पुन्हा एकवार उचलला आहे. शहरात सिग्नल्सवर बसविलेल्या बाराशे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा 'फीड' थेट पोलिस मुख्यालयातील वाहतूक विभागाला मिळू लागल्याने नियमभंग करणाऱ्यांना शोधणे सहज शक्य होत आहे. तसा हा प्रकल्प मागील कुंभमेळ्यातच उभा राहणार होता. परंतु, कॅमेऱ्यांच्या अनुपलब्धतेमुळे तो प्रत्यक्षात येऊ शकला नव्हता. आता स्मार्ट सिटी योजना व पोलिस दल अशा दोहोंचे कॅमेरे बेशिस्तांवर नजर ठेवून आहेत. मुंबई-पुण्यानंतर नाशिकमध्ये 'लाइव्ह फीड'चीही व्यवस्था सुरू झाली असली, तरी अनेक महत्त्वाच्या शहरांत ती आजही नाही. नागपूरमध्ये कॅमेरे लावले असले, तरी त्यातले सुमारे पन्नास टक्के बंद अवस्थेत आहेत.

नाशिकचा खडकाळी सिग्नल जगप्रसिद्ध आहे. तेथील बेशिस्तीचे दाखले अगदी दुबईतसुद्धा दिले जातात. येथून जाणारे लोक दुबईत मात्र काटेकोरपणे नियम पाळतात. हे असे का, याचे उत्तर ज्याने-त्याने शोधायला हवे. वास्तविक, शिस्त वा नियम पाळणे हा संस्कारांचा सुद्धा भाग असतो. परंतु, कधी कधी ती लावण्यासाठी कठोर नियमावली आवश्यकच असते. राज्यभरात मिळून पाच-दहा हजार सिग्नल सहज असतील. तरी राजधानी मुंबई असो, की नाशिक-सोलापूरसारखी शहरे; प्रत्येक ठिकाणी शिस्तभंगाची प्रथाच पडली आहे. वाहतुकीचा बोजवाराही ठरलेला. एकाने सिग्नल तोडला की दुसरा तोच कित्ता गिरवतो आणि मग नियम मोडण्यासाठी जणू रांगच लागते. या वृत्तीनुसार एकावर कारवाई झाले की बाकीचे सरळ होतात, हे खरेच. म्हणून या मोहिमेला पाठिंबाच; पण खोदलेले रस्ते, त्यातले खड्डे, वाढलेली अतिक्रमणे, संयमाचा अंत पाहणारी वाहतूक कोंडी या सगळ्यांवर मात करीत माणसे जगण्याच्या लढाईसाठी रस्त्यांवर धावत असतात, याचेही भान पोलिसांनी ठेवावे म्हणजे झाले!

लोकांना वाहतुकीचे नियम पाळण्यास भाग पाडणाऱ्या आणि रस्ते अपघातांना आळा घालून लोकांचे जीव वाचवू पाहणाऱ्या या मोहिमेचे स्वागतच. परंतु, यानिमित्ताने रस्त्यांवरचे खड्डे आणि कडेला ठाण मांडून असलेल्या अतिक्रमणांचे काय, यांसारखे काही प्रश्नही जनमानसाचा आरसा असलेल्या समाजमाध्यमांवर उपस्थित होत आहेत. पार्किंगसाठी जागा नसल्याने वाहने रस्त्यावर लागतात. त्यामुळे अपघात घडून काही जखमी होतात, तर काही जिवानिशी जातात. या पार्श्वभूमीवर वाहतूक पोलिसांनी ऑनलाइन कारवाईच्या प्रसृत केलेल्या दृश्यफितीवर लोक अक्षरशः तुटून पडले. लाखोंचा दंड गोळा करण्याचे नव्हे, तर वाहतुकीला शिस्त लावण्याचे 'टार्गेट' ठेवा, असे खडे बोल सुनावले गेले. 'भर रस्त्यातल्या खोदकामासाठी कंत्राटदारांना दंड करण्याचे धारिष्ट्य दाखविणार का'; 'आधी पार्किंगची सुविधा द्या, मग खुशाल कॅमेरे लावून दंडाच्या पावत्या फाडा', अशा प्रतिक्रिया चुकीच्या तरी कशा म्हणायच्या? हेल्मेट कारवाई तीव्र झाल्यानंतरही असेच सवाल उपस्थित करण्यात आले होते. त्यामुळे पोलिसांना नमते घ्यावे लागले होते.

# लाचखोरांना कठोर अद्दल घडवणे हाच मार्ग

मुंबई (दै. संध्या)

मुंबई महापालिकेतील लाचखोर कर्मचाऱ्यांच्या अटकेचे प्रमाण वाढले आहे. लाचखोरीकरिता निलंबित झालेल्या अनेकांना प्रशासनाने पुन्हा कामावर घेतले. परंतु कठोर कारवाई करून त्यांना अद्दल घडवणे गरजेचे आहे. मुंबई महापालिकेत नोकरी मिळाली म्हणजे पैसे कमावण्याची खाण हाती लागली, असा सार्वत्रिक समज आहे, महापालिकेत काम आहे म्हणजे कुणाचे तरी हात ओले करावेच लागणार हा जसा सामान्यांचा दृढ विश्वास आहे तसाच कुणीही अडलानडला कामाकरिता आला म्हणजे आता त्याला कापलाच पाहिजे, अशी मयुरी महापालिकेत टेबला टेबलांवर बसलेल्या कर्मचारी, अधिकाऱ्यांत आहे. या वास्तवाला पुष्टी देणारी आकडेवारी आता उघड झाली. गेल्या पाच वर्षात भ्रष्टाचाराच्या प्रकरणात ७७कर्मचाऱ्यांना अटक झाली. २०२५ या केवळ एका वर्षात २० कर्मचाऱ्यांचे भ्रष्टाचाराकरिता निलंबन झाले. महापालिकेच्या एकूण कर्मचारी, अधिकारी वर्गाच्या संख्येशी तुलना करता ही संख्या कदाचित काहींना कमी वाटेल. मात्र हे हिमनगाचे वरचे टोक आहे. जो पकडला गेला तो दोषी ठरला. मात्र वर्षानुवर्षे भरपूर पैसे कमावल्यानंतर निवृत्त होणारे महापालिकेत अनेक आहेत. लोकांचा दैनंदिन संबंध हा महापालिकेशीच येतो. गटार तुंबले, इमारतीचे प्लास्टर पडले, दोन दिवस झाले कचरा उचलला गेला नाही, पाणी आले नाही तर लोक धावत वॉर्ड ऑफिसात जातात.

# समीर देसाई लिखित 'व्हिएतनाम-अ नेशन ऑफ मेमरीज' पुस्तकाचे प्रकाशन

मुंबई (दै. संध्या)

व्हिएतनामचा सांस्कृतिक वारसा समृद्ध असून, इतिहासाच्या अनेक स्मृतींना या देशाच्या भेटीदरम्यान उजाळा देता येतो. भारत आणि व्हिएतनाम यांचा अनेक वर्षांचा संबंध आहे. व्हिएतनाम हे केवळ पर्यटनस्थळ नसून, आठवणी निर्माण करणारा देश आहे," असे मत व्हिएतनामचे मुंबईतील कौन्सिल जनरल ली क्वांग बिएन यांनी व्यक्त केले.

व्हिएतनामच्या सांस्कृतिक वारशाचा व इतिहासाच्या स्मृतींचा मागोवा घेणाऱ्या 'व्हिएतनाम अ नेशन ऑफ मेमरीज' या पुस्तकाचे प्रकाशन ली क्वांग बिएन यांच्या हस्ते झाले. कोरेगाव पार्क येथील मलाका स्पाइस हॉटेलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात हा कार्यक्रम झाला. त्यावेळी ते बोलत होते. ब्रँड स्ट्रॅटेजिस्ट व ' सीगल'चे संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक सरीर देसाई यांनी हे पुस्तक लिहिले आहे.



गेल्या काही वर्षांत दोन्ही देशांमध्ये आणखी जवळीक आली आहे. देसाई यांनी लिहिलेल्या पुस्तकाचा वापर येथील नागरिकांनी व्हिएतनाम समजून घेताना होणार आहे, असा विश्वास बिएन यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात पुस्तकाच्या निर्मितीमागील प्रेरणा, संकल्पना आणि अभ्यासप्रक्रियेबाबत समीर देसाई यांनी मनोगत व्यक्त केले. व्हिएतनाम हे केवळ भौगोलिक राष्ट्र नसून, स्मृतींचे राष्ट्र आहे. त्या स्मृतीच्या प्रवासात वाचकांना सहभागी करून घेण्याचा प्रयत्न या पुस्तकातून केला आहे, " असे ते म्हणाले. देसाई यांच्यासह व्हिएतनाममध्ये सहप्रवासी असलेल्यांनी या वेळी अनुभव मांडले. सूत्रसंचालन अवनी मुळे यांनी केले .

पुस्तक प्रकाशनानंतर सोनम श्रीवास्तव यांनी देसाई यांच्याशी संवाद साधला. या वेळी पुस्तकाचा प्रवास त्यांनी उलगडला. "व्हिएतनामच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक प्रवासाचे चित्रण या पुस्तकातून करण्यात आले. एका राष्ट्राच्या जडणीघडणीतील स्मृती, परंपरा, संघर्ष आणि आधुनिकतेकडे झालेली वाटचाल यांचे समग्र दर्शन यात घडते राष्ट्राची ओळख, त्यामागील भावविश्व उलगडण्याचा प्रयान मी यातून केला आहे." असे ते म्हणाले.

# स्वातंत्र्यपूर्ण नातेसंबंधांना परिपक्वतेची जोड हवी

(दै. संध्या)

देशभरातील न्यायालयात सध्या हजारो खटले प्रलंबित आहेत. अनेक प्रकरणांत तक्रार अशी असते की एखाद्या पुरुषाने लग्नाचे आश्वासन दाखवून शारीरिक संबंध प्रस्थापित केले आणि नंतर विवाहास नकार दिला. अशा तक्रारींमध्ये बलात्काराच्या कलमांचा समावेश करणे आता अपवाद राहिलेला नाही. काही वेळा प्राथमिक चौकशीपूर्वी अटकही केली जाते. गेल्या काही वर्षात विविध उच्च न्यायालयांनी वारंवार विचारले आहे की, दीर्घकाळ परस्पर संमतीने टिकलेल्या संबंधांना केवळ विवाह न झाल्यामुळे बलात्कार ठरवता येईल का? अलीकडे सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठाने केलेली निरीक्षणे या संदर्भात महत्त्वाची ठरतात. विवाहपूर्व संबंधांमध्ये स्पष्टता, जबाबदारी आणि सावधगिरी आवश्यक असल्याचे न्यायालयाने नमूद केले. संमतीने प्रस्थापित नातेसंबंधातील प्रत्येक वाद किंवा तुटलेले नाते गुन्हेगारी खटल्यात रूपांतरित करणे आवश्यक नसते, असेही त्यांनी सूचित केले. कायदेशीर बांधिलकी नसताना पूर्ण विश्वास ठेवण्याचे धोकेही अधोरेखित करण्यात आले. या भूमिका महिलाविरोधी आहेत, असे सरसकट म्हणणे योग्य ठरणार नाही. आधुनिक नातेसंबंध अधिक मुक्त झाले असले तरी ते तितकेच गुंतागुंतीचे आणि अस्थिरही झाले आहेत, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. सर्वच तक्रारी खोट्या नसतात; काही प्रकरणांत सुरुवातीपासूनच फसवणुकीचा हेतू असू शकतो आणि अशा वेळी कठोर कारवाई आवश्यकच आहे. मात्र प्रत्येक अपयशी नातेसंबंधाला

बलात्काराचे स्वरूप देणे न्यायाच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत ठरू शकते.

जीवनात व्यवसायात, राजकारणात, मैत्रीत आणि विवाहातही वचने मोडली जातात. साखरपुडा झाल्यानंतरही अनेक विवाह होत नाहीत; विवाहानंतर घटस्फोटाची कायदेशीर तरतूद आहे. घटस्फोट म्हणजे वैवाहिक नात्याचा अंत, परंतु त्याला बलात्कार म्हणता येत नाही. त्याचप्रमाणे, संमतीने सुरू झालेले नाते तुटल्यावर ते थेट गुन्हेगारी चौकटीत बसवणे ही धोकादायक प्रवृत्ती ठरू शकते. या चर्चेत प्रौढ व्यक्तींच्या वैयक्तिक जबाबदारीचाही विचार व्हायला हवा. दोन सज्ञान व्यक्तींनी संमतीन शारीरिक संबंध ठेवले असतील, तर विवाह ही शक्यता आहे, हमी नाही याची जाणीव दोघांनाही असणे आवश्यक आहे. भावनिक गुंतवणूक ही मानवी स्वभावाचा भाग असली, तरी तिच्या अपयशाचे निराकरण फौजदारी शिक्षेत शोधणे व्यवहार्य ठरत नाह ठोस पुराव्याविना दाखल होणाऱ्या गुन्ह्यांमुळे आरोपीचे सामाजिक आयुष्य, करिअर आणि कुटुंबीयांची प्रतिष्ठा यांवर अपरिवर्तनीय परिणाम होऊ शकतात.

त्याचबरोबर महिलांच्या संरक्षणासाठी निर्माण केलेल्या कायद्यांबद्दलही समाजात संशय निर्माण होऊ शकतो. हुंडा प्रथेच्या कायद्याच्या संदर्भात न्यायालयांना हस्तक्षेप करून मार्गदर्शक तत्त्वे

द्यावी लागली, कारण प्रत्येक तक्रार खरी नसते, हे अनुभवातून स्पष्ट झाले. त्याच धर्तीवर लग्नाच्या आश्वासनाशी संबंधित प्रकरणांबाबतही स्पष्ट निकष आखणे आवश्यक आहे. फसवणुकीचा सुरुवातीपासूनचा गुन्हेगारी हेतू सिद्ध होतो का, की केवळ नातेसंबंध अपयशी ठरला ही सीमारेषा स्पष्ट करणे गरजेचे आहे.


# बदलते नाते, बदलती समाजरचना : आधुनिक काळातील वैवाहिक नात्यांचा वेध

(दै. संध्या)

परंपरेने भारतीय समाजात विवाह ही केवळ दोन व्यक्तींची नव्हे, तर दोन कुटुंबांची, दोन संस्कृतींची आणि दोन पिढ्यांची जोड मानली जात होती. नाते जपणे, तडजोड करणे, सहनशीलता आणि कुटुंबाचा सन्मान राखणे ही मूल्ये वैवाहिक जीवनाचा पाया होती. आज मात्र या संकल्पनेत मोठा बदल होताना दिसतो आहे. विवाह हा हळूहळू सामाजिक संस्थेपेक्षा भावनिक समाधान, वैयक्तिक स्वातंत्र्य आणि परस्पर समजुतीवर आधारित संबंध म्हणून पाहिला जात आहे.

**बदलत्या अपेक्षा आणि आधुनिक जीवनशैली**

आजची जीवनशैली वेगवान, स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण आहे. नोकरीचे तास, करिअरची धावपळ, आर्थिक अस्थिरता आणि वेळेचा अभाव यांचा थेट परिणाम नात्यांवर



होत आहे. पूर्वी संयुक्त कुटुंबपद्धतीत जबाबदाऱ्या विभागल्या जात; आज विभक्त कुटुंबात सर्व भार दोन व्यक्तींवर येतो. परिणामी, नात्यांमधील संवाद कमी होतो आणि मानसिक थकवा वाढतो.

आजच्या तरुण पिढीच्या अपेक्षाही बदलल्या आहेत. जोडीदार समजूतदार, भावनिकदृष्ट्या सक्षम, करिअरमध्ये यशस्वी, आधुनिक आणि तरीही पारंपरिक मूल्ये जपणारा असावा, अशी अपेक्षा असते. या अपेक्षांचा ताळमेळ न बसल्यास मतभेद वाढतात.

**'एक घर, दोन मौन' – संवाद हरवलेली नाती**

अनेक घरांमध्ये बाहेरून सर्व काही सुरळीत दिसते; पण आतून संवाद हरवलेला असतो. थकवा, कामाचा ताण आणि भावनिक अंतर यामुळे पती-पत्नी एकमेकांशी बोलणे कमी करतात. न बोललेले प्रश्न, दडपलेला राग आणि अपूर्ण अपेक्षा हळूहळू नात्यात दुभंग निर्माण करतात. अनेक समुपदेशक सांगतात की, घटस्फोटाच्या उंबरठ्यावर आलेली जोडपी प्रत्यक्षात खूप आधीच मानसिकदृष्ट्या दूर गेलेली असतात.

**आर्थिक स्वावलंबन आणि स्त्रीची बदलती भूमिका**

स्त्रियांचे शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबन ही समाजाच्या प्रगतीची मोठी पायरी आहे. यामुळे अनेक स्त्रियांना असमाधानी नात्यातून बाहेर पडण्याचे धैर्य मिळाले आहे. पूर्वी आर्थिक अवलंबित्वामुळे अनेक स्त्रिया नाते टिकवत असत; आज त्या स्वाभिमानाने निर्णय घेतात. मात्र या बदलामुळे नात्यातील पारंपरिक सत्ता संतुलन बदलले आहे. काही पुरुषांना हा बदल स्वीकारणे कठीण जाते, तर काही स्त्रियांना जुन्या अपेक्षांमध्ये स्वतःला बसवणे अवघड वाटते. संवादाअभावी हे मतभेद तीव्र होतात.

**प्रेमविवाह, ठरवलेले विवाह आणि वास्तव**

प्रेमविवाहामुळे घटस्फोट वाढतात, अशी धारणा समाजात आहे; पण प्रत्यक्षात दोन्ही प्रकारांत नाती तुटताना दिसतात. फरक इतकाच की, प्रेमविवाहात अपेक्षा जास्त असतात. लग्नानंतर आर्थिक जबाबदाऱ्या, कुटुंबीयांचा हस्तक्षेप, पालकत्व आणि वास्तवातील अडचणी समोर आल्यावर नात्याची खरी परीक्षा सुरू होते. प्रेम पुरेसे नसते, परिपक्वता आणि जबाबदारी आवश्यक असते.

**मुलांवर होणारा परिणाम**

घटस्फोटाचा सर्वाधिक परिणाम मुलांवर होतो. पालकांमधील तणाव, तुटलेले घर आणि असुरक्षिततेची भावना त्यांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम करते. मात्र सतत भांडणाऱ्या घरात वाढण्यापेक्षा शांत वातावरणात, जरी वेगळ्या पालकांसोबत असले तरी, काही वेळा मुलांसाठी ते अधिक आरोग्यदायी ठरते. म्हणूनच प्रश्न घटस्फोटाचा नसून तो कसा हाताळला जातो याचा आहे.

**घटस्फोट म्हणजे अपयश का?**

अजूनही अनेकांच्या मनात घटस्फोट म्हणजे वैयक्तिक अपयश किंवा चारित्र्यदोष अशी भावना आहे. प्रत्यक्षात तो अनेकदा परिस्थिती, चुकीची जुळवाजुळव किंवा न सुटलेल्या मतभेदांचा परिणाम असतो. काही नाती टिकवणे हे धैर्य असते, तर काही नाती सन्मानाने सोडणे हेही तितकेच धैर्याचे असते. मात्र केवळ सोपे वाटते म्हणून नातं तोडणे ही प्रवृत्ती वाढत असेल, तर त्यावर विचार होणे आवश्यक आहे.

**संवादाचा अभाव – सर्वात मोठी समस्या**

आज संवादाची साधने वाढली असली तरी प्रत्यक्ष संवाद कमी झाला आहे. मोबाईल, सोशल मीडिया आणि डिजिटल जग यामध्ये गुंतलेल्या जोडप्यांना एकमेकांसाठी वेळ मिळत नाही. न बोललेले प्रश्न वाढत जातात आणि शेवटी नातं तुटण्याच्या टप्प्यावर येते. नातं टिकवण्यासाठी संवाद, समजूतदारपणा आणि भावनिक गुंतवणूक आवश्यक आहे.

**पुढचा मार्ग : नाती अधिक सुदृढ कशी होतील?**

नाती टिकवण्यासाठी केवळ कायदे किंवा सामाजिक दबाव पुरेसा नाही. विवाहपूर्व समुपदेशन, भावनिक साक्षरता, संवाद कौशल्ये आणि वास्तववादी अपेक्षा यांची गरज आहे. शाळा, महाविद्यालये आणि कुटुंब पातळीवर नात्यांविषयी खुली चर्चा होणे आवश्यक आहे. 'परिपूर्ण नातं' या कल्पनेऐवजी 'समजूतदार नातं' ही संकल्पना स्वीकारावी लागेल.

**बदलत्या समाजाची नवी जाणीव**

घटस्फोटांचे वाढते प्रमाण समाज बिघडल्याचे नव्हे, तर समाज बदलत असल्याचे लक्षण आहे. व्यक्तीचे मानसिक, भावनिक आणि मानवी स्वास्थ्य महत्त्वाचे मानणारा समाज निर्माण होत आहे. विवाह टिकवणे महत्त्वाचे आहे; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे नात्यातील व्यक्तींचा सन्मान आणि आनंद जपणे.

शेवटी, नातं टिकवण्याइतकेच नातं सन्मानाने सोडण्याची परिपक्वता समाजात विकसित झाली, तर वैवाहिक नाती केवळ सामाजिक बंधन न राहता जाणीवपूर्वक स्वीकारलेली जबाबदारी ठरतील. बदलत्या समाजात नाती टिकवण्यासाठी समजूतदारपणा, संवाद आणि परस्पर सन्मान हीच खरी किल्ली ठरेल.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### थकबाकीदारांवर बारामती नगरपरिषदेकडून कारवाई; जप्ती व नळ कनेक्शन खंडित

बारामती (दैनिक संध्या) : बारामती नगरपरिषद मालमत्ता कर विभागाकडून २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी थकबाकीदारांवर कठोर कारवाई सुरू करण्यात आली आहे. नगरपरिषद हद्दीतील (मूळ व वाढीव) मिळकतधारकांना यापूर्वीच थकबाकीसह मालमत्ता कर भरण्याबाबत अधिपत्र देण्यात आले होते. मात्र, त्यानुसार प्रतिसाद न मिळाल्याने २५ फेब्रुवारी २०२६ पासून जप्ती कारवाईला सुरुवात करण्यात आली. या अंतर्गत एकूण चार मिळकतींवर जप्तीची कारवाई करण्यात आली असून पाणीपुरवठा विभागाच्या पथकाने पाच नळ कनेक्शनही खंडित केले आहेत. ही कारवाई नगरपरिषद मालमत्ता कर विभाग प्रमुख आणि वसुली लिपीक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. दरम्यान, कारवाई सुरू होताच थकबाकीदारांकडून मालमत्ता कर भरण्यास प्रतिसाद मिळू लागला असून आजपर्यंत रोख व धनादेशाद्वारे एकूण १४ लाख रुपयांची वसुली करण्यात आली आहे. नगरपरिषदेकडून ही मोहीम पुढेही सुरू राहणार असून नागरिकांनी थकबाकीचा मालमत्ता कर तातडीने भरावा, अन्यथा जप्ती व अन्य कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. तसेच नगरपरिषदेमार्फत होणारी पुढील कटु कारवाई टाळण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### बारामतीत अजितदादांच्या पुण्यस्मरणानिमित्त विविध श्रद्धांजली कार्यक्रमांचे आयोजन

बारामती (दैनिक संध्या) : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुण्यस्मरणानिमित्त बारामती येथे श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून कार्यक्रमास सकाळी ६.०० वाजता भजनाने सुरुवात होणार आहे. त्यानंतर सकाळी ७.०० वाजता भक्तिगीत, सकाळी ८.०० वाजता सर्वधर्मीय प्रार्थना आणि सकाळी ८.४५ वाजता श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार आहे.सदर कार्यक्रम तिरंगा सर्कल, नटराज कला दालन, बारामती येथे आयोजित करण्यात आला आहे.अजितदादांच्या कार्याला अभिवादन करण्यासाठी व त्यांना आदरांजली वाहण्यासाठी तमाम बारामतीकर बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मित्राला वाढदिवसानिमित्त ममता सदन अनाथ आश्रमाला धनादेश देऊन दिल्या शुभेच्छा

भिगवण (दैनिक संध्या) : वाढदिवस वृद्धाश्रम, अनाथ आश्रम येथे जाऊन त्यांच्या सहवासात किंवा एखाद्या मंदिर परिसरात जाऊन तेथे वृक्षपणाने  ब्लडबँकेत रक्तदान करून तसेच शाल पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन किंवा केक कापून साजरा केले जातात. भिगवण येथील डॉ. जयप्रकाश खरड यांचा वाढदिवस मंगळवार (ता. २४) रोजी होता यावेळी त्यांचे मित्र इंदापूर अर्बन बँकेचे संचालक अशोक शिंदे यांनी या गोष्टीला फाटा देऊन सिंधुताई सपकाळ यांच्या ममता सदन या अनाथाश्रमाला ६६६ रुपयांचा धनादेश देऊन साजरा केला. शिंदे यांच्या उपक्रमाचे भिगवण परिसरात कौतुक होत आहे.



### भोसलेवाडी हद्दीतील पाणंद रस्ता खुला; तंटामुक्त अध्यक्षांचा पुढाकार

जेजुरी (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्यातील कोथळे येथील आदर्श तंटामुक्त समितीचे अध्यक्ष सूर्यकांत जगताप व भोसले वाडी येथील पोलीस पाटील स्वाती भोसले यांच्या पुढाकारातून पुरंदर तालुक्यातील भोसलेवाडी हद्दीतील पाणंद रस्ता खुला करण्यात आला. गेल्या एक वर्षापासून पूर्वी हा रस्ता बंद करण्यात आला होता. पुरंदरचे तहसीलदार विक्रम राजपूत , नायब तहसीलदार संदिप पाटील, यांच्या आदेशानुसार मंडल अधिकारी  व तलाठी  तसेच जेजुरी पोलीस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक दीपक वाकचौरे वाघचौरे  ,हवालदार तात्यासाहेब खाडे , आणि  तंटामुक्त समितीचे अध्यक्ष व पोलीस पाटील यांच्या देखरेखीखाली हा रस्ता खुला करण्यात आला. हा रस्ता खुला करण्यात आल्याने कोथळे व भोसलेवाडी येथील 56 शेतकरी असलेल्या जवळपास 300 एकर क्षेत्राला लाभ झाला आहे. हे शेतकरी या रस्त्याने ऊस वाहतूक व विविध फळ पिकांची वाहतूक करत होती. अखेर एक वर्षाने या शेतकरी बांधवांना न्याय मिळाल्यामुळे शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी बांधवांनी याबाबत प्रशासनाचे आभार मानले.

### सदर महाल पॅलेसमध्ये शिवजयंती उत्साहात



पुणे (दैनिक संध्या) : तामिळनाडूतील तंजावर येथे तामिळनाडू मराठा असोसिएशनच्या वतीने हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची ३९६ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मराठा परंपरेचा अभिमान जपत स्थानिक मराठा बांधवांनी मोठ्या श्रद्धेने या जयंती सोहळ्यात सहभाग घेतला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त २२ फेब्रुवारी रोजी सदर महाल पॅलेसमध्ये पारंपरिक उत्साहात कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या वेळी संघटनेचे तामिळनाडू अध्यक्ष विश्वजीत घाडे राव, तंजावर अध्यक्ष अलेक्झांडर भोसले, तसेच संघटनेचे पदाधिकारी आणि मराठा समाजातील मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याला अभिवादन केले. या प्रसंगी प्रतापसिंह सरफोजीराजे भोसले यांनी जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रम, दूरदृष्टी आणि लोककल्याणकारी प्रशासनाची आठवण करून देत त्यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. मराठा परंपरा आणि इतिहास पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्पही यावेळी व्यक्त करण्यात आला.

# उरुळी कांचनसह परिसरात समाधानाचे वातावरण

**रामभाऊ तुपे यांच्या प्रयत्नाला यश**

उरुळी कांचन (दै. संध्या)

ग्रामीण भागातील नागरिकांना दिलासा देणारा महत्त्वाचा निर्णय घेत प्रादेशिक परिवहन विभागाने पक्के लायसन्सच्या कोठ्यात वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या पक्क्या लायसन्सच्या प्रक्रियेला वेग मिळणार असून नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. उरुळी कांचन येथे पुणे प्रादेशिक परिवहन विभाग यांच्या वतीने महिन्यातून तीन वेळा कॅम्प भरविण्यात येतो. या कॅम्पमध्ये दुचाकी, तीनचाकी व चारचाकी वाहनांच्या लायसन्स व ट्रायलची प्रक्रिया पूर्ण केली जाते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून ग्रामीण भागातील लोकसंख्या वाढ आणि अर्जदारांची संख्या वाढल्याने पूर्वीचा कोटा अपुरा पडत होता. त्यामुळे लर्निंग लायसन्सनंतर पक्के लायसन्स मिळवण्यासाठी आलेल्या नागरिकांना वारंवार हेलपाटे मारावे लागत होते.

नागरिकांच्या गैरसोयीबाबत राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे शहराध्यक्ष रामभाऊ निवृत्ती तुपे यांनी प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला होता. केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेत प्रशासनाने आठ दिवसातच कोट्यात वाढ केली. दरम्यान ड्रायव्हिंग स्कूल असोसिएशन च्या वतीने रामभाऊ तुपे यांचा सत्कार करण्यात आला.

या कामासाठी रोहित पवार (कर्जत-जामखेड आमदार) तसेच अशोक पवार (शिरूर-हवेली माजी आमदार) यांच्या वतीने व रामभाऊ तुपे आणि ड्रायव्हिंग स्कूल असोसिएशनचे शंकर कुंभारकर, राजू बगाडे, अक्षय खंडागळे, चारुदत्ता गोरे आदींनीही लायसन कोटा वाढीसंदर्भात प्रयत्न केले होते.

प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी कोट्यात वाढ करण्याचा निर्णय घेतल्याने लायसन्स धारकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

कोटा वाढीमुळे आता ग्रामीण भागातील नागरिकांना वेळेत लायसन्स मिळणार असून प्रशासनाच्या या निर्णयाचे सर्व स्तरांतून स्वागत केले जात आहे.



“लायसन्ससाठी येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत असल्याचे लक्षात घेऊन पूर्वीचा १८० चा कोटा वाढवून त्यात १२० ची भर घालण्यात आली आहे. त्यामुळे आता एकूण ३०० लायसन्सचा कोटा उपलब्ध झाला आहे.” या निर्णयामुळे अनेक प्रलंबित अर्जदारांना दिलासा मिळाला असून लायसन्स प्रक्रिया अधिक सुरळीत होणार आहे.

**- स्वप्निल भोसले, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी पुणे.**

"कॅम्प सुरळीत पार पाडण्यासाठी ग्रामविकास सेवा विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि. उरुळी कांचन या सोसायटी ची जागा के डी कांचन, राजाराम कांचन, महादेव कांचन यांनी सहकार्य करत उपलब्ध करून दिल्याने कॅम्प भरण्यासाठी मोठे सहकार्य झाले आहे."

**- रामभाऊ तुपे, उरुळी कांचन शहराध्यक्ष राष्ट्रवादी.**

## क्रिकेट हंगामामुळे महानगरांशिवाय इतर शहरांमध्ये पर्यटनाला चालना

- प्रमुख आयोजक शहरांमध्ये मुक्कामासाठी जागांचा शोध वाढू लागल्याचे चित्र
- भारतातील सुमारे ६०% जेन  झी २०२६ मध्ये थेट क्रिकेट सामने पाहण्यासाठी प्रवास करण्याची योजना आखत आहेत.

पुणे (दै. संध्या)

भारतातील आगामी क्रिकेट हंगामात देशांतर्गत प्रवासात लक्षणीय वाढ होत आहे. नवीन एअरबीएनबी माहितीनुसार मागील काही वर्षांत सामन्यांचे आयोजक असलेल्या विशेषतः महानगरांपलीकडील शहरांमध्ये मागणीनुसार शोध आणि बुकिंगमध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे दिसते आहे.

एप्रिल आणि मे या कालावधीत महत्त्वाच्या स्पर्धांना सुरूवात होत असताना प्रवासासाठी मुक्कामाच्या ठिकाणांची मागणी रांची, तिरुवनंतपुरम, जयपूर आणि लखनऊ अशा उदयोन्मुख क्रिकेट केंद्रांमध्ये वाढू लागली आहे. त्यातून खेळाचे प्रमुख क्षण भारताच्या पर्यटन नकाशात कशा रितीने बदल घडवतात हे दिसते.

एअरबीएबीच्या अंतर्गत माहितीनुसार क्रिकेट हंगामात अनेक क्रिकेट सामन्यांच्या आयोजक शहरांसाठी भारतीय प्रवाशांनी केलेल्या शोधांत मागील वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत रांचीमध्ये १२० टक्के, तिरुवनंतपुरममध्ये ११० टक्के, जयपूर ७० टक्के  आणि लखनौमध्ये ६० टक्क्यांपेक्षा जास्त लक्षणीय वाढ झाली आहे.

भारत विरुद्ध पाकिस्तान सामन्याच्या सप्ताहात (१४-१७ फेब्रुवारी २०२६) यजमान शहर कोलंबोमध्ये भारतीयांनी मुक्कामासाठी केलेल्या शोधांमध्ये ३२५ टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाली. तसेच, क्रिकेट विश्वचषक शेवटच्या टप्प्यापूर्वी (७-१० मार्च २०२६) अहमदाबादमधील शोधांमध्ये जवळजवळ १७० टक्के वाढ झाल्याचे दिसले. त्यामुळे महत्त्वाच्या सामन्यांदरम्यान महत्वाचे क्रिकेट स्थान म्हणून या शहराचे स्थान मजबूत झाले.

एअरबीएनबीच्या सर्वेक्षणात असे दिसून आले की भारतातील सुमारे ६० टक्के जेन झीच्या मते ते २०२६ मध्ये थेट क्रिकेट सामन्यांना उपस्थित राहण्यासाठी प्रवास करण्याची योजना आखत आहेत आणि ७० टक्के मित्र किंवा कुटुंबासह उपस्थित राहणे पसंत करतात. क्रिकेट भारताच्या जेन  झीला विशिष्ट शहराकडे आकर्षित करत असले तरी, त्यांचा प्रवास सामान्यतः सामन्याच्या दिवसापलीकडे विस्तारला जातो. छोट्या, एकमेव उद्देशाच्या भेटींसोबतच हे प्रवास पर्यटनासाठीही आयोजित केले जातात. सुमारे निम्मे पर्यटक (५३ टक्के ) स्थानिक संस्कृती, पाककृती आणि स्थानिक लोकांचा अनुभव घेण्यासाठी सामन्याच्या दिवसांसोबत इतर दिवसांसाठी सहलींचे नियोजन करतात. क्रिकेट सामन्यासाठी सामान्यतः ३-४ दिवस प्रवास केला जातो. त्यातून संस्कृती समजून घेणे आणि अनुभव घेणे महत्त्वाचे मानले जाते असे दिसते. एअरबीएनबीचे भारत आणि आग्नेय आशियाचे राष्ट्रीय प्रमुख अमनप्रीत सिंग बजाज म्हणाले की , "क्रिकेट हा देशातील जनतेचा आत्मा ठरला आहे.

## कार्यालयीन व्यवस्थापनातील उत्कृष्टतेबद्दल रामचंद्र टेंगले यांचा गौरव

कोरेगावमुळ (दै. संध्या)

जागतिक मराठी भाषा दिनानिमित्त अमृतानुभव फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने आयोजित ‘विश्व मराठी भाषा कर्तृत्व संमेलन २०२६’ अंतर्गत श्री गोपीनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वरवंड येथील वरिष्ठ लिपिक रामचंद्र मकाजी टेंगले यांची ‘महाराष्ट्र उत्कृष्ट कार्यालयीन व्यवस्थापन पुरस्कार'साठी एकमताने निवड करण्यात आली आहे. मराठी भाषा, संस्कृती, समाज व राष्ट्रासाठी त्यांनी केलेल्या उल्लेखनीय, प्रेरणादायी आणि आदर्श कार्याची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात आल्याची माहिती आयोजकांनी दिली. शालेय प्रशासनातील शिस्तबद्धता, कार्यतत्परता आणि परिणामकारक कार्यालयीन व्यवस्थापन यामुळे टेंगले यांनी संस्थेच्या कार्यपद्धतीत लक्षणीय सुधारणा घडवून आणली आहे. त्याचबरोबर मराठी भाषेच्या संवर्धन, प्रचार व प्रसारासाठी त्यांनी सातत्याने पुढाकार घेत विविध उपक्रम राबविले आहेत. मराठी भाषेच्या जतनाबरोबरच समाजघडणीच्या दृष्टीने त्यांनी केलेले योगदान भावी पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. हा पुरस्कार सुप्रसिद्ध पार्श्वगायक ज्ञानेश्वरजी मेश्राम (सारेगमप फेम) यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात येणार आहे. सन्मान सोहळा शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी २ वाजता पत्रकार भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर, साहित्यिक, कलाकार व समाजसेवक उपस्थित राहणार असून, मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून मराठी भाषेच्या गौरवाचा संदेश देण्यात येणार आहे. मराठी भाषेच्या जतन व संवर्धनासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्र येण्याची गरज असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात येणार आहे.

## कारागृहात मोबाईलचा वापर; कैद्यांकडून झडतीत पाच मोबाईल जप्त

पुणे (दै. संध्या)

पुणे - कारागृहात मोबाईल वापरास बंदी असतानाही काही कैदी मोबाईल वापरत असल्याचे उघड झाले आहे. येरवडा कारागृह प्रशासनाने राबविलेल्या विशेष तपासणी मोहिमेत बराकीतून पाच मोबाईल, दोन पॉवर बँक आणि चार्जिंग वायर जप्त करण्यात आल्या. या प्रकरणी संबंधित कैद्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी साहाय्यक तुरुंगाधिकारी सुनील गायकवाड (वय-५५) यांनी येरवडा पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार कैदी नौशाद बद्रुद्दीन शेख आणि इतर कैद्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी (ता. २१) सायंकाळी कारागृहात गस्त घालत असताना साहाय्यक तुरुंगाधिकारी गायकवाड यांनी भिंतीजवळील स्वच्छतागृहाजवळ एका कैद्याची संशयास्पद हालचाल पाहिली. चौकशी केली असता त्याने जमिनीवर मोबाईल पडल्याचे सांगितले आणि उडवाउडवीची उत्तरे देत तो बराकीत निघून गेला. या प्रकाराची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आल्यानंतर विशेष तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. रविवारी येरवडा कारागृहात विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. बराक क्रमांक एकमधील नौशाद शेखची झडती घेतली असता एक मोबाईल, बॅटरी, सिमकार्ड आणि चार्जिंग वायर सापडले. तसेच, बराक क्रमांक सहामध्ये तपासणीत चार मोबाईल, बॅटरी आणि दोन पॉवर बँक जप्त केल्या.

## राज्यात ‘महा जन आरोग्य केंद्र’ सुरु करा !

- बहुजन नेते, माजी नगरसेवक डॉ.हुलगेश चलवादी यांची मागणी
- सर्वसामान्यांसाठी 'महा जन आरोग्य योजना' राबवण्याचे आवाहन

पुणे (दै. संध्या)

पुण्यनगरीतील लोकसंख्या ४० लाखांच्या पुढे गेली असतांना महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य सुविधांची संख्या अत्यंत मर्यादित आहे. राज्यातील इतर महानगर पालिकांमध्ये देखील काहीशी अशीच स्थिती आहे. सर्वसामान्यांसाठी त्यामुळे 'महाराष्ट्र जन आरोग्य योजना' राबवत देशातील इतर राज्यांना दिशा देण्याचे काम महाराष्ट्राने करावे, असे आवाहन बहुजन नेते, माजी नगरसेवक डॉ.हुलगेश चलवादी यांनी बुधवारी (ता.२५) केले. दर १० हजार लोकसंख्येमागे एक 'महा जन आरोग्य केंद्र' सुरू करावे, तर १ लाख लोकसंख्येमागे महापालिकेने एक सुसज्जित रुग्णालय योजनेअंतर्गत उभारावे, अशी मागणी देखील डॉ.चलवादी यांनी केली. येत्या ६ मार्च रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्याचा अर्थसंकल्प मांडतील. अर्थसंकल्पातून या योजनेची घोषणा मुख्यमंत्र्यांनी करावी, याकरिता त्यांच्यासोबत पत्रव्यवहार देखील करणार असल्याचे डॉ.चलवादी म्हणाले. सर्वसामान्यांवरील उपचार खर्चाचा वाढता ताण लक्षात घेता केंद्र, राज्य सरकारच्या आरोग्य योजनेसह महापालिकांची स्वतंत्र योजना आवश्यक आहे. आरोग्य हा राज्यांच्या अखत्यारित असलेला विषय असला तरी केंद्र सरकारने सुसज्जित पालिका रुग्णालये उभारण्यासाठी निधी द्यावा, असे आवाहन देखील डॉ.चलवादी यांनी केले. प्रशासनाच्या मदतीने लोकवर्गणी गोळा करून थेट नागरिकांच्या सहकार्याने रुग्णालये उभारत सामाजिक दायित्वाचे कर्तव्य देखील पार पाडले जाऊ शकते,अशी संकल्पना त्यांनी मांडली. सर्वसामान्य, गोरगरीब, वंचित, पीडितांना याचा थेट फायदा त्यामुळे होवू शकतो.सार्वजनिक आरोग्य सुविधेच्या बाबतीत पुणे शहर एक मॉडेल ठरेल,असे डॉ.चलवादी म्हणाले. शहरात हजारो कोटींची विकासकामे होत असताना प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या वाढवण्याकडे दुर्लक्ष होत आहे. सध्या गंभीर रुग्णांवरचा ताण ससूनसारख्या मोठ्या सरकारी रुग्णालयांवर आहे, तर खासगी रुग्णालयांचे बिल सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहे.



कोरोनानंतर तपासण्या, औषधे आणि रुग्णालयीन खर्च ३० ते ५० टक्क्यांनी वाढले आहे. गरिब, वंचित आणि मध्यमवर्गीय नागरिक लाखो रुपयांचे कर्ज काढून उपचार घेत आहेत. ही परिस्थिती थांबवायची असेल तर स्थानिक पातळीवर सुसज्ज, मोफत व किफायतशीर आरोग्य सुविधा उभारणे सरकारसह समाजाची जबाबदारी आहे, असे डॉ.चलवादी यांनी स्पष्ट केले. आरोग्य हाच खरा विकासाचा पाया असून, ‘महा जन आरोग्य योजनेचे' मॉडेल तातडीने राबवावे, असे आवाहन डॉ.चलवादी यांनी केले.

# केंद्र सरकारच्या कामगारविरोधी धोरणांविरोधात ‘सरकार जगाव आंदोलन’



पुणे (दै. संध्या)

भारतीय मजदूर संघ, पुणे जिल्ह्याच्या वतीने आज दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे “सरकार जगाव आंदोलन” अंतर्गत तीव्र निदर्शने करण्यात आली. कामगारांच्या प्रलंबित व ज्वलंत प्रश्नांकडे शासनाचे तात्काळ लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आले होते.

राज्यातील तसेच देशातील कंत्राटी व इतर क्षेत्रातील कामगारांवर अन्याय होत असून लेबर कोडमधील अन्यायकारक तरतुदी, बेकायदेशीर वेतन कपात, रोजगार अस्थिरता, सामाजिक सुरक्षेचा अभाव तसेच ईएसआय व पेन्शन संदर्भातील प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित असल्याचा आरोप भारतीय मजदूर संघाचे पूर्व राष्ट्रीय महामंत्री रवींद्र हिमते यांनी यावेळी केला. शासनाकडून वारंवार आश्वासने दिली जात असली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत कामगारांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या आंदोलनात औद्योगिक आस्थापनांतील कामगार, संरक्षण क्षेत्रातील कर्मचारी, वीज क्षेत्रातील कंत्राटी कामगार, आउटसोर्स कर्मचारी, पुणे मेट्रो प्रकल्पातील कामगार, सामाजिक क्षेत्रातील कर्मचारी, रेल्वे कर्मचारी, अंगणवाडी सेविका व मदतनीस, शेतमजूर, बीडी कामगार, सेवानिवृत्त कर्मचारी, टेक्निशियन तसेच विद्यापीठातील करारनिहाय कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

२५ फेब्रुवारी २०२६ रोजी देशभरातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांवर निदर्शने करण्याचा निर्णय भारतीय मजदूर संघाच्या जगन्नाथ पुरी येथे झालेल्या अधिवेशनात घेण्यात आला होता. त्यानुसार पुण्यासह देशभरात आंदोलन पार पडले.

या आंदोलनात रवींद्र हिमते (पूर्व राष्ट्रीय महामंत्री), सचिन मेंगाळे (सरचिटणीस, अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघ), बाळासाहेब भुजबळ (संघटनमंत्री), झानेश्वर जाधव, शिल्पा देशपांडे, श्रीमती आश्विनी देव आदी मान्यवर उपस्थित होते.

### आंदोलनातील प्रमुख मागण्या

- असंघटित क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षा लाभ तात्काळ देण्यात यावेत.
- कंत्राटदार मुक्त रोजगार धोरण लागू करण्यात यावे.
- कायम व कंत्राटी कामगारांना रोजगार स्थैर्याची हमी देण्यात यावी.
- समान कामास समान वेतन तत्त्वाची अंमलबजावणी करण्यात यावी.
- कंत्राटी कामगारांच्या बेकायदेशीर वेतन कपातीवर बंदी घालून दोषींवर कडक कारवाई करावी.
- पुणे मेट्रोतील सर्व कामगारांना महाराष्ट्र शासन निर्णयाची अंमलबजावणी फरकासह करण्यात यावी.
- Employees' State Insurance Corporation (ESIC) अंतर्गत वेतन मर्यादा ₹४२,००० प्रतिमाह करण्यात यावी तसेच रुग्णालये, दवाखाने व मेडिकल दुकाने वाढविण्यात यावीत.
- शैक्षणिक संस्था, धर्मादाय ट्रस्ट अंतर्गत संस्था व संरक्षण उद्योगातील संशोधन संस्थांना औद्योगिक विवाद अधिनियमांतर्गत लाभ देण्यात यावेत.
- Employees' Provident Fund Organisation (EPFO) अंतर्गत किमान ₹५,००० व महागाई भत्त्यासह पेन्शन वाढविण्यात यावी.
- असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी केंद्रीय व राज्य बजेटमध्ये किमान ३% तरतूद करण्यात यावी.

महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे अध्यक्ष निलेश खरात व सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी कामगारांचे प्रश्न मार्गी लागेपर्यंत संघर्ष सुरूच राहील, असा इशारा दिला. तसेच सागर पवार (जिल्हा सचिव), राजेश मुळे, बाळासाहेब पाटील, विजय पाटील, संजय कांबळे, सुरेश जाधव, अनिल पारधी, विवेक ठकार, निखील टेकवडे, केदार कदम, राहुल बोडके, यश निंबाळकर, बेबी राणी डे आदी पदाधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले.

कामगारांच्या न्याय्य मागण्या तात्काळ मान्य न झाल्यास पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा ठाम इशारा यावेळी देण्यात आला.

भारतीय मजदूर संघाच्या मागण्यांचे निवेदन मा. पंतप्रधान व मा. केंद्रीय कामगार मंत्र्यांना मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्या मार्फत देण्यात आले. निवेदनाचा स्वीकार मा. निवासी जिल्हाधिकारी श्रीमती ज्योती कदम यांनी करून पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्याचे आश्वासन दिले.